# हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहिवसल्लम) यांचा परिचय

समाजातील एक वर्ग, ह.मुहम्मद (स.अ.) यांचा मनापासून तिरस्कार करतो.

तर दुसरा वर्ग, ह.मुहम्मद (स.अ.) यांच्यावर प्राणार्पण करण्यासाठी सदोदीत तयार असतो.

असे का?

जाणून घेऊया काही सत्य आणि तथ्य, ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या आदर्श जीवनाविषयी.

# हजरत
# मुहम्मद (स.)
# यांचा परिचय

लेखक : क्यू. एस. ख़ान
B.E (Mech)

**Printed by**
**Farid Book Depot (Pvt.) Ltd.**
**2158-59, M.P Street, Pataudi House, Darya Ganj, New Delhi-2**
**Phone-011-23289786, 23280786, Fax- 011-23279998**
**E-mail- farid@ndf.vsnl.net.in**
**Website:- faridexport.com. / faridbook.com**

## No Copyright

या पुस्तकाचे मालकी हक्क क्यू.एस.खान यांच्याकडे आहेत. आपण या पुस्तकात जर कोणत्याही प्रकारची अतिशयोक्ती न करता आपणास सदर पुस्तक छापण्याची पूर्ण परवानगी आहे. जर या पुस्तकात काही चुका आढळल्यास आम्हाला त्याची सूचना द्या, जेणेकरून पुढील आवृत्तीसाठी आम्हाला त्यामध्ये योग्य बदल करता येतील.

# हजरत मुहम्मद (स.) यांचा परिचय

ISBN No. 978-93-80778-23-5

प्रकाशक

**तनवीर पब्लिकेशन**

हायड्रो इलेक्ट्रिक मशीनरी प्रिमाइसेस

ए-13, राम-रहीम उद्योग नगर, बस स्टॉप लेन,

एल.बी.एस. मार्ग, सोनापूर, भांडुप (पश्चिम), मुंबई 400078

फोनः 022-2596 5930

मोबाइलः 932006 4026

ई-मेलः hydelect@vsnl.com, hydelect@mtnl.net.in

वेब-साइटः www.tanveerpublication.com

प्रथम आवृत्ती : २०१४

किंमतः 30/- रु.

**THIS BOOK COULD BE FREE DOWNLOADED FROM**
**www.freeeducation.co.in**

# प्रस्तावना

परमेश्वराने या विश्वाची निर्मिती सुमारे ४५० कोटी वर्षापूर्वी केली आहे. विश्वाच्या आणि मानवजातीच्या निर्मितीआधी आपणा सर्वांचे आत्मे परमेश्वराने बनवले आहेत. (पवित्र कुरआन ७:११) अर्थात या विश्वात आम्ही फार पूर्वीपासून आहोत आणि आत्मा अमर असल्यामुळे अनंतकाळापर्यंत येथेच राहणार आहोत. येणा-या अनंत कालात, आपण सुखी समाधानी राहणार आहोत किंवा कसे हे आपल्या या पृथ्वीतलावरील ६०-७० वर्षांच्या आयुष्यावर अवलंबून राहणार आहे. आपण कोणती जीवनशैली अंगीकारावी जेणेकरून आम्हास मृत्यूपश्चात सुख-समाधान लाभेल हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे.

याचा शोध स्वतःलाच घ्यावा लागेल, त्यासाठी आवश्यक ते वैचारिक मंथन आपणास करावे लागेल. आपल्या आधी अनेक बुध्दीजीवींनी याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे, या पुस्तकाच्या १० व्या प्रकरणात त्यांचे विचार उध्दृत करण्यात आले आहेत.

महर्षी व्यास, महाकवी तुलसीदास, संत तुकाराम, येशू ख्रिस्त आणि इतर अनेक बुध्दीजीवींनी ह.मुहम्मद (स.अ.) यांची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. आपण ह.मुहम्मद (स.अ.) यांची शिकवण पारखली आणि तद्नंतर आपल्या श्रध्दा कोणत्या असाव्यात याचा विचार केला तर या पृथ्वीतलावरील वास्तव्य आणि येणारे कधीच न संपणारे मृत्यूपश्चात आयुष्य, या दोहोमध्ये सफल होण्याची मोठी संधी लाभते.

हे पुस्तक याच हेतूने लिहिण्यात आले आहे. आपण केवळ ऐकीव गोष्टींवर विसंबून न राहता प्रत्येक धार्मिक बाब पडताळावी, त्याचा शोध घ्यावा, तौलनिक अभ्यास करावा आणि योग्य निर्णयाप्रत पोहोचण्याचा प्रयत्न करावा. धर्म आणि श्रध्दा यांच्या प्रती आपली उदासिनता मृत्यूपश्चात जीवन ध्वस्त करू शकते. हा अत्यंत गंभीर विषय आहे म्हणूनच अत्यंत गांभीर्याने योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

सध्या देशात जे सांप्रदायिक दंगे होत आहेत, समाजात जो व्देष पसरवण्यात येत आहे, मला आशा आहे, या पुस्तकामुळे त्यास अटकाव बसेल.

सदर पुस्तक इतर अनेक मान्यवरांच्या पुस्तकांचे अध्ययन करून, त्यावर मनन करून, लिहिले आहे. माझ्या समजण्यात आणि लिखाणात काही चुक झाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पुस्तकामुळे कोणाच्या भावना दुखावल्या गेल्या असतील अथवा कोणाचा अपमान झाला असेल, तर त्याबद्दल मी क्षमा मागतो. पुस्तकात काही त्रूटी आढळल्यास आपण माझ्या निदर्शनास आणाव्यात जेणेकरून त्या दुरूस्त करता येतील अशी माझी आपणा सर्वांना नम्र विनंती आहे.


आपला बंधू,

**क्यू.एस.खान**

hydelect@vsnl.com

# अनुक्रमणिका


| नं. | विषय | पेज नं. |
|---|---|---|
| 1. | हज़रत मुहम्मद (स.) यांचे पूर्वज | 05 |
| 2. | हज़रत मुहम्मद (स.) यांचा परिवार | 10 |
| 3. | हज़रत मुहम्मद (स.) यांचे प्रेषित बनन्याआधीचे जीवन | 12 |
| 4. | हज़रत मुहम्मद (स.) यांचे प्रेषित बनन्यानंतरचे जीवन | 14 |
| 6. | हज़रत मुहम्मद (स.) याच्याविषयी बुद्धिजीवींचे मत | 22 |
| 7. | हज़रत मुहम्मद (स.) यांचे आचरण कसे होते ? | 28 |
| 8. | हज़रत मुहम्मद (स.) यांचे उपदेश | 36 |
| 9. | एक ईश्वराचे अस्तित्व आहे याचा पुरावा | 43 |
| 10. | प्रेषित कोण ? | 46 |
| 11. | प्रेषितांचे शत्रू कोण ? | 50 |
| 12. | हज़रत मुहम्मद (स.) हिंसेचे समर्थक होते काय ? | 54 |
| 13. | हज़रत मुहम्मद (स.) यांची 12 पत्नि का होत्या ? | 65 |
| 14. | अग्नीचे रहस्य काय आहे ? | 72 |
| | हजरत मुहम्मद (स.) यांचे जीवन एका नजरेतुन | 76 |

# प्रकरण क्रमांक-१
# ह.मुहम्मद (स.) यांचे पूर्वज

**हजरत आदम (अ.स.) :-**

- आदम आणि हव्वा यांना ओल्या मातीपासून विष्णूने निर्माण केल्याचे कथन भविष्य पुराणात आहे. प्रदान नगर (स्वर्ग) च्या पुर्वभागात ईश्वर निर्मित ४ कौस लांबीचे एक मोठे जंगल होते. (कौस हे एक किलोमीटर पेक्षा खूप मोठे आहे.) आपली पत्नी हव्वा यांना पाहण्यास अधिर झालेले आदम पापवृक्षाखाली गेले. तेव्हा सापाच्या रूपात तेथे कली (सैतान) प्रकट झाला. त्या कावेबाज शत्रूने आदम आणि हव्वा यांना फसवले. त्या विषवृक्षाची फळे आदम यांनी खाल्ली आणि विष्णूचे आदेश मोडले. परिणामी, त्यांना भुतलावर पाठविण्यात आले. त्या दोघांना विपुल अपत्यप्राप्ती झाली. आदम यांचे आयुष्य ९३० वर्षाचे होते. (भविष्य पुराण)

- हेच तथ्य कुरआन आणि बायबल मध्ये नमूद करण्यात आले आहे.

- सनातन धर्मात प्रेषितांना मनु या नावाने संबोधण्यात येते. हिंदू धर्मग्रंथात चौदा मनुंचा उल्लेख आहे आणि प्रथम मनु आदम होत. सातव्या मनुंच्या जीवनकालात मोठा जलप्रलय झाला, आणि त्यांनीच मनुस्मृती लिहीली. संपूर्ण मानवजात हजरत आदम यांची संतान आहे असे ऋग्वेदामध्ये नमूद करण्यात आले आहे.

- जन मनुजात (ऋग्वेद १:४५:१)
  अर्थात, मनुष्य मनुंची संतान आहे.

हेच पवित्र कुरआन मध्ये खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे. 'लोकहो आम्ही तुम्हांस एक पुरूष आणि एका स्त्रीपासून जन्माला घातले.' (पवित्र कुरआन ४९:१३)

अशाप्रकारे हजरत आदम (अ.स.) माझे, तुमचे, हजरत मुहम्मद (स.अ.) आणि सर्वांचे प्रथम पूर्वज आहेत.

**हजरत नूह (अ.स.) (मनु) :-**

मनु यांच्या आयुष्यात मोठा प्रलय आल्याचे मार्कण्डेय पुराण, भविष्य पुराण, मत्स्य पुराणामध्ये नमूद करण्यात आले आहे. या प्रलयात केवळ मनु आणि एकाच ईश्वरास मानणा-या व्यतिरिक्त संपूर्ण मानवजात नष्ट झाली होती.

नूह (अ.स.) (मनु) यांनी स्वतःच्या हातांनी एक नौका तयार केली होती ज्यात ते स्वतः स्वार झाले, एका ईश्वरास मानणा-यांना तसेच प्राणी जगतातील प्रत्येक प्राण्यांच्या दोन जोड्यांना त्या नौकेत सामावुन घेतले. त्या प्रलयात केवळ नूह (अ.स.) यांच्या नौकेत स्वार झालेले लोक बचावले. बाकी सर्व जीवसृष्टी या प्रलयात डूबुन नष्ट झाली.

पवित्र कुरआन (११-२५-४८) आणि बायबल (जेनिसीस-८) मध्येही या घटनेचा उल्लेख आहे.

हजरत नूह (अ.स.) हे, हजरत आदम (अ.स.) यांचे नववे वंशज आहेत. हजरत आदम (अ.स.) यांच्यापासून हजरत नूह (अ.स.) यांच्यापर्यंतची वंशावळ खालीलप्रमाणे आहे.

आदम-शीश-अनुश-कैनन-महलैल-यारीद-अंकुश(इडविल)-मुटूशल्क-लूनिक-नूह (मनु). (www.wikipedia.org)

हजरत नूह (अ.स.) किंवा मनु (अ.स.) माझे तुमचे हजरत मुहम्मद (स.) आणि सर्वांचे दुसरे प्रसिद्ध पूर्वज आहेत.

**हजरत इब्राहीम (अ.स.) (अबीराम) :-**

परमेश्वराची अनेक नावे आहेत उदा. अल्लाह, मालिक, रहीम, रहेमान इ. परमेश्वराची एकूण १०० नावे आहेत. आणि यातील काही नावे परमेश्वराचे विशेष गुण व्यक्त करतात. जसे 'खालिक' याचा अर्थ जीवन देणारा. परमेश्वरा शिवाय इतर कोणीही जीवन देणारा नाही. मालिक अर्थात स्वामी. परमेश्वराशिवाय या विश्वाचा कोणीही स्वामी नाही.

ईश्वराची काही नावे त्याच्या स्वभावाचे वर्णन करतात. उदा.रहीम म्हणजे अत्यंत दया करणारा. गफूर म्हणजे क्षमाशील.

ईश्वराने आपली गुणात्मक नावे काही प्रेषितांसाठी वापरली आहेत. ज्यांच्या व्यक्तिमत्वात, त्या नावाप्रमाणे गुण ओतप्रोत भरलेले होते. पवित्र कुरआन (९:१२८) मध्ये, हजरत मुहम्मद (स.अ.) यांना रहीम आणि गफूर या नावाने संबोधित केले आहे, कारण हजरत मुहम्मद (स.अ.) हे पराकोटीचे दयाळू आणि क्षमाशील होते.

अशाच प्रकारे हिंदू धर्मग्रंथात परमेश्वराने अनेक प्रेषितांना स्वतःच्या विशेष नावाने संबोधित केले आहे. उदा. हरीवंश पुराणात ब्रम्हाने आपल्या शरीराचे दोन भाग केले. त्यातुन एक भाग स्त्रीचा आणि दुसरा पुरूषाचा केला असा उल्लेख आहे.

हाच उल्लेख हदीस शरीफ (हजरत मुहम्मद ( स.अ.) यांचे कथन) आणि बायबल मध्ये ही आहे की, हजरत आदम (अ.स.) यांच्या डाव्या बरगडीपासून जगातील पहिली स्त्री हव्वा (अ.स.) यांना उत्पन्न केले. अर्थात हरीवंश पुराणात ज्यांचा ब्रम्हा असा उल्लेख आहे ते स्वतः ईश्वर नसून हजरत आदम (अ.स.) आहेत.

अथर्ववेदामध्ये हजरत इब्राहीम (अ.स.) यांना ब्रम्हा म्हणण्यात आले आहे, आणि त्यांनी स्वतःचा पुत्र, अथर्व यांचा बळी (कुरबानी) दिली असे नमूद करण्यात आले आहे. हजरत इब्राहीम (अ.स.) यांनी त्यांचे पुत्र हजरत इस्माईल (अ.स.) यांची कुर्बानी दिली होती. याचा उल्लेख पवित्र कुरआन (३७:१०५) आणि बायबल (जेनिसीस-२२) मध्ये ही आहे. अथर्ववेदात ज्यांचा उल्लेख ब्रम्हा असा करण्यात आला आहे ते ईश्वर नसून हजरत इब्राहीम (अ.स.) आहेत.

मुस्लिम, ख्रिश्चन आणि यहूदी हे सर्वच हजरत इब्राहीम (अ.स.) हे एक महान प्रेषित आहे असे मानतात आणि हजरत इब्राहीम (अ.स.) हे हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे पूर्वज होत.

हजरत इब्राहीम (अ.स.) हे, हजरत नूह (अ.स.) यांचे दहावे वंशज होत, दोहोंमधील वंशावळ खालीलप्रमाणे आहे.

नूह(मनु)-साम-अरफकशद-शालीख-अबीर-फालिख-अब्रागु-शाहरू-ताहरू-तारीह (अझहूर)-इब्राहीम (www.wikipedia.org)

**हजरत इस्माईल (अ.स.) (अथर्व) :-**

- अथर्ववेदामध्ये हजरत इब्राहीम (अ.स.) (ब्रम्हा) यांनी आपले पुत्र हजरत इस्माईल (अ.स.) यांचा बळी देण्याच्या प्रसंगाचा जो उल्लेख आहे, त्याला 'पुरूषमेधा' असे म्हणण्यात येते. पुरूषमेधाबाबत अथर्ववेदामध्ये खालील दोन श्लोक आहेत.

मूर्धानमस्य संसीव्याथर्वा हृदयं च यत् क्ष
मस्तिश्कादूर्ध्व पैरयत् पवमानोधि शीर्शतः
तद् वा अथर्वराः शिरो देवकोशः समुब्जितः
तत् प्रारो अभि रक्षति शिरो अन्नमथो मनः
(अथर्ववेद १०:२:२६)

अर्थात, अथर्व यांचा बळी देण्यासाठी ब्रम्हा यांनी जे स्थान निश्चित केले तेथे देवदूत निवास करतात आणि ईश्वर त्यांची रक्षा करतो असा वरील श्लोकाचा अर्थ आहे.

उपरोक्त श्लोक, ज्यामध्ये अथर्वण असा नामोल्लेख करण्यात आला आहे त्यांना अरबी

भाषेत, हजरत इस्माईल (अ.स.) असे संबोधण्यात येते आणि ते हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे ६१ वे पूर्वज होते.

हजरत इस्माईल (अ.स.) आणि हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या दरम्यान प्रसिद्ध लोकांची नावे खालीलप्रमाणे आहेत,

(अथर्वा)इस्माईल-सबाफ-यासाब-नाकर-अदनान-माअद-नाजर-नासर-इल्यास-कनाना-नफ्र-मालिक-फिक्र-गालिब-लोवई-काब-मुरा-खिलाब-कोसाय-अब्द मनाफ-हाशिम-अब्दुल मुत्तलिब-अब्दुल्लाह-पैगंबर हजरत मुहम्मद (स.अ.)

(www.victorynewsmagazine.com/Ancestryofprophetmuhammeds.htm)

**मक्कावासियांची वैशिष्ट्ये :-**

- आजरोजी भारतीय बाजारपेठेत मारवाडी समुदायाचा वरचष्मा आहे. राजस्थानात अत्यंत कमी पाऊस पडतो. परिणामी शेती खुपच कमी होते. अशा भौगोलिक परिस्थितीमध्ये तेथील जनतेचा भुकबळी जाणे अपेक्षित आहे, परंतु असे न घडता तोच समुदाय देशाच्या आर्थिक व्यवस्थेत आघाडीवर का आहे?

कारण यांचे पुर्वज शेती कधीच करत नव्हते. त्यामुळे पावसाकडे डोळे लावून बसणे आणि तो बरसला तर खाणे अन्यथा उपासमार सहन करणे ही त्याची जीवनशैली मुळीच नव्हती. त्यांचे जीवन पर्जन्याधारित नव्हते तर आपल्या मनगटाच्या जोरावर ते सैन्यात जात अथवा बुध्दिचा वापर करून व्यापार-उदिम करत आणि जीवन समृध्द बनवत.

ईश्वराने स्वतःचे घर अर्थात काबा, धरतीच्या केंद्र बिंदूवर स्थापित केले आहे, जेथे वातावरण वाळवंटापेक्षाही प्रतिकुल आहे. तेथे शेती मुळीच शक्य नाही. तसेच गरीब शेतकरी आणि मानसिक गुलाम वसण्याचीदेखील शक्यता नाही. अशा भिषण परिस्थितीत ज्यांनी तेथे वास्तव्य केले ते मारवाड्यापेक्षा उच्च कोटीचे व्यापारी आणि राजपुतापेक्षा पराक्रमी होते.

**मक्का शहर कसे वसले?**

हजरत इस्माईल (अ.स.) यांचा जन्म झाल्यानंतर हजरत इब्राहीम (अ.स.) (ब्रम्हा-अबिराम) यांनी हजरत इस्माईल (अ.स.) यांना त्यांची माता हजरत हाजरा (अ.स.) यांच्यासह काबा शरीफ येथे नेऊन वसवले. परमेश्वराने त्या ठिकाणी जमजम नावाचा पाण्याचा झरा निर्माण केला, त्या पाण्याची विशेषता अशी होती की ज्या उद्देश्याने त्याचे सेवन करील त्याचे उद्देश सफल होत होते. जो कोणी भुक भागवण्याच्या उद्देश्याने या पाण्याचे सेवन करील त्याची भुक भागत होती, जो रोग मुक्तीसाठी जमजम या झ-याचे पाणी प्राशन केल्यास त्याचे रोगनिवारण होत असे. हजयात्री परत येताना याचे पाणी जरूर आपल्यासोबत आणतात आणि आप्तेष्टांना याची भेट देतात. जमजम झ-याच्या पाण्याच्या महतीमुळे दूरवरून कबिले येत गेले आणि मक्का शहर नावारूपास आले. हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या काळी मक्का शहराची लोकसंख्या सुमारे ६० हजार होती.

काबाचे निर्माण देवदूतांनी फार पूर्वीच केले होते तथापि ह.नूह (अ.स.) यांच्या कालावधीमध्ये आलेल्या प्रलयात याची पडझड झाली होती.

- हजरत इस्माईल (अ.स.) (अथर्व) जेव्हा मोठे झाले तेव्हा त्यांनी आणि हजरत इब्राहीम (अ.स.) (ब्रम्हा) यांनी मिळून काबाचे पुर्ननिर्माण केले. तेव्हापासून आजतागायत हजरत इस्माईल आणि त्यांचे वंशज या वास्तुचे विश्वस्त (Trustee) आहेत.
- काबाचे पुर्ननिर्माण हजरत इब्राहीम (अ.स.) आणि हजरत इस्माईल (अ.स.) यांनी

केल्यामुळे त्याबाबतचे प्रशंसोद्‌गार अथर्ववेदात (१०-२-२९ ते ३३ पर्यंत) खालीलप्रमाणे उध्दृत करण्यात आले आहेत.

तस्मिन हिररायये कोशे त्र यरे त्रिप्रतिष्ठते ‡ तस्मिन यद यक्षमात्मन्वत तद वै ब्रम्हविदो विदु: ‡ (Rif Painding)

- अर्थात प्रार्थना पूजनीय असणा-या त्या परमेश्वराच्या घराला तीन स्तंभ आणि तीन तुळ्या आहेत आणि हेच घर शाश्वत जीवनाचे केंद्र आहे.



(www.youtube.com link http:youtu.be/dHTZbn3OZrw) वर दिलेले चित्र काबाचा अंतर्भाग दर्शवतो ज्यामध्ये आपण तीन स्तंभ आणि तीन तुळ्या स्पष्टपणे पाहू शकता.



***Inside view***

इंटरनेटच्या माध्यमातून आपण उपरोक्त छायाचित्रे पाहू शकता

- पद्‌म पुराणात काबा शरीफचा उल्लेख आदिपुष्कर तिर्थ असा करण्यात आला आहे 'आणि संपूर्ण तिर्थांमध्ये आदिपुष्कर तिर्थ सर्वांत प्राचीन असून पुष्कर तिर्थात स्नान केल्यास मुक्ती मिळते.' असे नमूद करण्यात आले आहे. (पद्‌म पुराण, कल्याण, ऑक्टोबर १९४४, पेज नं ९६, गोरखपूर येथून प्रकाशित)

- या श्लोकामध्ये स्नानाचे जे वर्णन आहे ते जमजमच्या पाण्याने स्नान करण्याबाबतचे आहे.

- हजरत इस्माईल (अ.स.) यांच्या मृत्यूपश्चात लोकांनी एक ईश्वराच्या पूजेचा त्याग करून असंख्य देवी-देवतांना पूजण्यास आरंभ केला. काबा शरीफ मध्ये ३६० मूर्त्या ठेवण्यात आल्या. या पापाचरणामुळे ईश्वराने आपली कृपा तेथून हटवली. परिणामी जमजम हा झरा पूर्णपणे आटला. हा झरा मोठ्या कालावधीपर्यंत आटलेला होता आणि काळानुसार त्याचे अस्तित्वदेखील नष्ट झाले.

**हजरत मुहम्मद (स.) यांचे आजोबा :-**

हजरत मुहम्मद (स.) यांच्या आजोबांचे नाव आमिर होते. तथापि ते अब्दुल मुत्तलिब या नावाने सुपरिचीत होते. ते अत्यंत समजदार, ज्ञानी आणि उमद्या व्यक्तिमत्वाचे धनी आणि त्यांच्या कबिल्याचे सरदार होते. ते एकेश्वरवादी होते आणि हजयात्रेसाठी येणा-या भविकांची भोजन व्यवस्था करत होते. हजरत अब्दुल मुत्तलिब पवित्र रमजानच्या संपूर्ण महिन्यात हिरा नावाच्या एका गुहेमध्ये ईश्वराची प्रार्थना करत आणि परत आल्यानंतर गोरगरिबांना भोजन देत होते.

काबा शरीफ जवळ जमजम नावाचा चमत्कारी झरा अस्तित्वात होता. लोकांच्या मूर्तिपूजेने क्रोधित होऊन ईश्वराने त्यातील पाणी आटवले व झरा कोरडा झाला. काही काळानंतर तो झरा जमिनीस समांतर झाला.

हजरत अब्दुल मुत्तलिब जमजम झ-याविषयी आपल्या पुर्वजामार्फत जाणुन होते आणि परमेश्वराने कृपा करून पुन:श्च जमजम झरा जिवीत करावा अशी त्यांची मनोकामना होती.

एके रात्री परमेश्वराने स्वप्नात त्यांना जमजम झ-यांचे ठिकाण दाखवले, जे त्या काळच्या दोन प्रसिध्द मूर्त्या, 'इस्नाफ' आणि 'नाइला' यांच्या स्थानाच्या दरम्यान होते. या ठिकाणी उंटाचा बळी देण्याचा प्रघात होता. त्यामुळे लोक तेथे खोदकाम करने उचित समजत नव्हते म्हणून इतरांनी त्या ठिकाणी खोदकामात सहभाग घेतला नाही.

हजरत अब्दुल मुत्तलिब यांनी त्यांचे ज्येष्ठ पुत्र हजरत हारिस यांना सोबत घेऊन त्या स्थळी खोदकाम केले आणि जमजम झ-याचे पाणी पुनःश्च वाहू लागले.

जमजम झ-याचा शोध घेतल्यामुळे त्यांचा सन्मान अधिक वृध्दिंगत झाला.

हजरत अब्दुल मुत्तलिब यांना झ-याच्या खोदकामात कोणीही मदत केली नाही. त्यांना केवळ स्वतःच्या पुत्रासोबत खोदकाम करावे लागले, त्या प्रसंगानंतर त्यांनी परमेश्वराची प्रार्थना केली आणि दहा पुत्रांची याचना केली, सोबतच दहा पुत्र तरूण झाल्यास त्यापैकी एकाचा बळी देण्याचा नवस केला.

परमेश्वराने त्यांची मनोकामना पूर्ण केली आणि त्यांना दहा पुत्र झाले. त्यांच्या पुत्रांनी तारूण्यात पदार्पण केल्यानंतर बळी द्यायच्या पुत्राचे नाव सोडतीव्दारे (लॉटरी) काढण्यात आले आणि त्यांचे सर्वात कनिष्ठ पुत्र, हजरत अब्दुल्ला याचे नाव समोर आले. हजरत अब्दुल्ला सर्वांचे आवडते आणि त्यांच्या बंधुमध्ये सर्वात सरस होते. हजरत अब्दुल्ला यांच्या भगिनींनी रडून रडून बळी न देण्याबाबत हजरत अब्दुल मुत्तलिब यांच्यावर दबाव टाकण्यात यशस्वी झाल्या.

विद्वानांनी या समस्येवर हजरत अब्दुल्ला आणि त्यांच्याऐवजी बळी देण्यासाठी दहा उंट यांच्यामध्ये सोडत काढण्याचा सल्ला दिला आणि पुनःश्च हजरत अब्दुल्ला यांचेच नाव आल्यास प्रत्येक सोडतीत आणखी दहा उंट वाढविण्याचा उपाय सुचविला.

अशाप्रकारे या सोडतीच्या ब-याच फे-या झाल्यानंतर १०० उंटांच्या मोबदल्यात हजरत अब्दुल्ला यांचे नाव निघाले नाही आणि त्यांचा प्राण वाचलो.

हेच हजरत अब्दुल्ला ज्यांना हजरत इस्माईल (अ.स.) (अथर्व) यांच्याप्रमाणे बळी जायचे होते, तेच हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे पिता होते.

हजरत अब्दुल्ला हे एका पवित्र पित्याचे पवित्र आणि अत्यंत उमद्या व्यक्तिमत्वाचे पुत्र होते. त्यांच्या माथ्यापासून एक पवित्र ज्योत दृश्यमान होत होती, जिच्याकडे पाहून एका ज्योतिषी महिलेने (उम्मे कताल बिन नोफी) त्यांच्याबरोबर लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली. परंतु हजरत अब्दुल्ल मुत्तलिब यांनी हजरत अब्दुल्ला यांचा विवाह मदीना येथील बनु जोहरा या आदरणीय कबिल्याचे सरदार वहब बिन अबद मुनाफ यांची कन्या हजरत आमना यांच्याशी केला.

लग्नप्रसंगी हजरत अब्दुल्ला यांचे वय २५ वर्षे आणि हजरतआमना यांचे वय २० वर्षे होते.

विवाह सोहळ्यानंतर हजरत अब्दुल्ला यांनी तीन दिवस मदीना येथे मुक्काम केला, त्यानंतर काही महिने मक्का येथे हजरत आमना सोबत त्यांनी वास्तव्य केले. त्यासमयी एक व्यापारी तांडा (Carvan) सिरीया देशाकडे रवाना होत होता. त्या तांड्यासोबत हजरत अब्दुल्ला व्यापारासाठी सामिल झाले. परतीच्या प्रवासात मदीनाजवळ त्यांची तब्येत बिघडली तेव्हा मदीनास्थीत आजोळी त्यांनी मुक्काम केला. एक महिन्याच्या आजारपणानंतर त्यांचे देहावसान झाले.

हजरत अब्दुल्ला यांच्या निधनानंतर सात महिन्यांनी हजरत मुहम्मद (स.अ.) यांचा जन्म झाला. २०/२२ एप्रिल ५७० AD मध्ये Lunar Calander प्रमाणे ही तारीख १२ रबीउल अव्वल होती. म्हणजेच (12 th day of moon )

*********

## प्रकरण क्रमांक-२

# ह.मुहम्मद (स.) यांचा परिवार

- हजरत मुहम्मद (स.) यांना नऊ चुलते होते.

१) हारिस २) कसम ३) अबू लहब ४) हजरत अबू तालिब ५) हजरत अब्बास ६) हजरत हमजा ७) जुबैर ८) मकुम ९) साफर / गीदाक

**हजरत अबू तालिब:** यांनी हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे संगोपन आपल्या मुलाप्रमाणे केले आणि वयाच्या ५० वर्षापर्यंत त्यांचे मक्कावासियांपासून रक्षण केले.

**हजरत अब्बास:** अत्यंत श्रीमंत होते आणि ते हजरत मुहम्मद (स.) यांच्यावर निस्सीम प्रेम करत होते. इस्लामचा स्वीकार त्यांनी विलंबाने केला. तथापि हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या पश्चात अब्बासी घराण्यातील जे नामांकित सम्राट झाले ते सर्व हजरत अब्बास यांचेच वंशज होते.

**हजरत हमजा:** हे हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे समवयस्क आणि अत्यंत शुर लढवय्ये होते. त्यांना उहदच्या लढाईमध्ये हौतात्म्य प्राप्त झाले.

**अबू लहब**: याचे व्यक्तिमत्व अत्यंत आकर्षक होते. त्याने हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या जन्माची खुशखबर देणा-या दासीला प्रसन्न होऊन गुलामगिरीतून मुक्त केले होते. हजरत मुहम्मद (स.अ.) प्रेषित बनल्यानंतर हा त्यांचा सर्वात मोठा शत्रू बनला.

त्याने आणि इतर पाच चुलत्यांनी इस्लामचा स्वीकार केला नाही.

- हजरत मुहम्मद (स.अ.) यांना तीन पुत्र आणि चार कन्या अशी एकूण सात अपत्ये झाली.

या सातपैकी सहा अपत्ये, हजरत खदीजा (रजि.) यांच्यापासून झाली आणि सर्वात लहान पुत्र हजरत इब्राहीम हे हजरत मारिया (रजि.) यांच्यापासून मदीना येथे जन्मले. तीन्हीं पुत्रांची नावे हजरत कासिम, हजरत अब्दुल्ला (ताहिर/तय्यब) आणि हजरत इब्राहीम अशी होती. या सर्वांचा मृत्यू बालपणातच झाला.

- हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या कन्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

१) हजरत जैनब (रजि.) २) हजरत रुकैया (रजि.) ३)हजरत उम्मे कुलसूम (रजि.) ४) हजरत फातिमा (रजि.)

**ह.जैनब (रजि.) :-** हजरत जैनब (रजि.) ह्या सर्वात ज्येष्ठ कन्या होत, त्यांचा विवाह हजरत अबुल आस यांच्यासोबत झाला होता. त्यांच्या पुत्राचे नाव अली बिन अबुल आस (रजि.) आणि कन्येचे हजरत उमामा बिन्ते अबुल आस (रजि.) होते. मक्केहून मदीनेस रवाना होत असताना अबू जहलचा मुलगा अकरमा याने हजरत जैनब (रजि.) ज्या उंटावर स्वार झाल्या होत्या त्या उंटास जखमी केले, त्या खाली पडल्या आणि गंभीर जखमी झाल्या. या प्रसंगी हजरत जैनब (रजि.) गर्भवती होत्या, या दुर्घटनेमुळे काही वर्षानंतर त्यांचे निधन झाले.

**ह.रुकैया (रजि.) :-** या हजरत जैनब (रजि.) यांच्यापेक्षा कनिष्ठ होत्या आणि ह.रुकैया (रजि.) यांचा विवाह अबू लहबचा मुलगा उतबा याच्यासोबत झाला होता, पण पाठवणी झाली नव्हती. अबू लहब हा इस्लामचा मोठा शत्रू होता, त्याने हा विवाह मोडला तेव्हा हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी हजरत रुकैया (रजि.) यांचा विवाह हजरत उस्मान (रजि.) यांच्यासोबत केला. ह.रुकैया (रजि.) यांनी हजरत उस्मान (रजि.) यांच्या सोबत इथियोपिया येथे स्थानांतरण केले आणि नंतर मदीना येथे वास्तव्य केले. यांच्या पुत्राचे नाव अब्दुल्ला होते आणि सहा वर्षाच्या बालवयातच त्यांचा मृत्यू झाला. हजरत रुकैया यांचे निधन चेचकच्या आजाराने इ.स. ६२४ मध्ये झाले.

**ह.उम्मे कुलसुम (रजि)** :- या हजरत रुकैया (रजि.) यांच्यापेक्षा लहान होत्या आणि त्यांचा विवाह अबू लहबचा दुसरा मुलगा अतिबासोबत झाला होता (पाठवणी झाली नव्हती.) अबू लहबने हा विवाह देखील मोडीत काढला.

हजरत रुकैया (रजि) यांच्या निधनानंतर त्यांचे पती हजरत उस्मान (रजि) खुप उदास राहू लागले. हजरत उस्मान (रजि) अत्यंत पवित्र विचारसरणीचे, लाजाळू आणि ज्यांना भुतलावरच स्वर्गप्राप्तीची खुशखबर मिळाली होते अशा मोजक्या लोकात समावेश होता. हजरत उस्मान (रजि.) यांनी हजरत रुकैया (रजि.) यांच्या सोबत वैवाहिक जीवन अत्यंत प्रेमाने व्यतित केले होते. त्यामुळे हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी हजरत उम्मे कुलसुम (रजि.) यांचा विवाह हजरत उस्मान (रजि.) सोबत केला. विवाहाच्या सहा वर्षानंतर (६२१ AD मध्ये) त्यांचे निधन झाले त्यांना संतान नव्हते.

**ह.फातिमा (रजि.)** :- हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या कनिष्ठ कन्या होत. यांचा विवाह हजरत अली (रजि.) यांच्या सोबत (६२४ AD मध्ये) झाला. यांना सहा अपत्ये झाली, यापैकी दोघांचे निधन बालवयातच झाले. उर्वरित चार अपत्ये मोठी झाल्यानंतर प्रसिध्द व्यक्ती बनल्या, त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

हजरत फातिमा (रजि.) यांचे निधन ६३३ AD मध्ये झाले.

१) हजरत हसन बिन अली (रजि.)
२) हजरत हुसैन बिन अली (रजि.)
३) हजरत उम्मे कुलसुम बिन्ते अली (रजि.)
४) हजरत जैनब बिन्ते अली (रजि.)

- हजरत मुहम्मद (स.अ.) यांचा पहिला विवाह वयाच्या २५ व्या वर्षी ह.खदीजा (रजि.) यांच्या सोबत इ.स.५९६ मध्ये झाला. हजरत खदीजा (रजि.) यांचे निधन इ.स.६१८ मध्ये झाले. त्यांच्या निधनानंतर आपल्या लहान मुलींची काळजी घेण्यासाठी हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी हजरत सौदा (रजि.) यांच्या सोबत विवाह केला. विवाहसमयी हजरत सौदा (रजि.) या वयाने खूप मोठ्या, उंच आणि स्थुल होत्या. हजरत खदीजा (रजि.) यांच्या निधनानंतर हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी हजरत सौदा (रजि.) यांच्यासोबत चार वर्षांचा कालावधी व्यतित केला, या कालावधीमध्ये त्यांनी दुसरा विवाह केला नाही.

- हजरत सौदा (रजि.) यांच्या पश्चात हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी वेगवेगळ्या कारणांसाठी ज्यांच्या बरोबर विवाह केले त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत,

३) हजरत आएशा (रजि.)
४) हजरत हफ्सा (रजि.)
५) हजरत जैनब बिन्ते खजिमा (रजि.)
६) हजरत उम्मे सलमा (रजि.)
७) हजरत उम्मे हबीबा (रजि.)
८) हजरत जैनब बिन्ते हजश (रजि.)
९) हजरत जुवैरिया (रजि.)
१०) हजरत सूफिया (रजि.)
११) हजरत रेहाना (रजि.)
१२) हजरत मैमूना (रजि.)

- हजरत जैद (रजि.) गुलाम होते. हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी त्यांना स्वातंत्र्य दिल्यानंतर आपले पुत्र मानले होते, त्यामुळे हजरत जैद यांचे नाव "जैद बिन मुहम्मद" असे झाले होते. परमेश्वराने नैसर्गिक पित्याच्या नावाऐवजी इतराचे नाव लावण्यास मनाई केल्यानंतर हजरत जैद (रजि.) यांचे नामकरण " जैद बिन हारिस " (रजि.) असे झाले, कारण ह.हारिस (रजि.) हे त्यांचे नैसर्गिक पिता होते. ह.जैद (रजि.) यांच्या पुत्राचे नाव ह.उसामा (रजि.) होते. ह.मुहम्मद (स.अ.) या पिता-पुत्रांवर असिम प्रेम करत आणि ते त्यांच्या परिवाराचे सदस्य झाले होते.

*********

# प्रकरण क्रमांक-३
# हजरत मुहम्मद (स.) यांचे प्रेषित बनण्याआधीचे जीवन

- आधुनिक काळात मुलांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी त्यांना उत्तम बोर्डिंग स्कूलमध्ये ठेवले जाते. त्याचप्रमाणे १५०० वर्षापूर्वी अरब जगतामध्ये लहान मुलाचे पालनपोषण ग्रामीण भागात करण्याची प्रथा होती, जेणेकरून मुलं स्वच्छ वातावरणात वाढेल, शुध्द भाषा शिकेल तसेच मेहनती आणि शूर बनेल.

  याच कारणांमुळे केवळ वयाच्या चौथ्या महिन्यापासून पाच वर्षापर्यंत हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे पालनपोषण हजरत हलिमा (रजि.) यांनी ग्रामीण भागात केले.

- हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे वय सहा वर्षे असताना त्यांच्या माता हजरत आमना (रजि.) त्यांना सोबत घेऊन आपल्या माहेरी मदीना येथे गेल्या होत्या. एक महिना मदीना येथे वास्तव्य करून परत येताना अबुवा नामक ठिकाणी त्या अत्यवस्थ झाल्या आणि तेथेच त्यांचे निधन झाले (इ.स.५७७). त्यावेळी हजरत उम्मे ऐमन (रजि.) नामक सेविका (Maid) त्यांच्यासोबत होत्या, त्यांनी हजरत मुहम्मद (स.अ.) यांना मक्का येथे आणले आणि हजरत अब्दुल मुत्तलिब यांच्या हवाली केले.

- हजरत अब्दुल मुत्तलिब हे हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे आजोबा होते आणि ते हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्यावर निस्सीम प्रेम करत होते. त्यांनी हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे पालनपोषण अत्यंत प्रेमाने केले होते. हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे वय ८ वर्षे असताना त्यांच्या आजोबाचा मृत्यू झाला.

- आपल्या निधनापूर्वी हजरत अब्दुल मुत्तलिब यांनी हजरत मुहम्मद (स.अ.) यांना हजरत अबू तालिब, जे त्यांचे पुत्र आणि हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे सख्खे चुलते होते यांच्याकडे सोपवले. हजरत अबू तालिब हे हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्यावर प्राणापेक्षा अधिक प्रेम करत. त्यांनी हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या वयाच्या ५० वर्षापर्यंत त्यांचा सांभाळ आणि रक्षण केले होते.

- हजरत अबू तालिब गहू आणि अत्तराचा व्यापार मक्का आणि सीरीया दरम्यान करत होते. हजरत अबू तालिब यांच्यापासून हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी व्यापार आत्मसात केला व वयाच्या २५ वर्षापासून भागीदारीमध्ये व्यापारास सुरूवात केली.

- हजरत अबू तालिब यांचा परिवार मोठा असल्याने त्यांचा खर्च देखील जास्त होता. त्यामुळे हजरत मुहम्मद (स.अ.) यांना व्यापारासाठी ते अधिक मदत करू शकत नव्हते. या कारणामुळे हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी स्वतःचे शारीरिक कष्ट आणि इतरांचे भांडवल असा भागीदारीतील व्यवसाय सुरू केला.

  हजरत मुहम्मद (स.अ.) उपजतच प्रामाणिक, इमानदार आणि शब्दाचे पक्के होते, या गुणामुळे लोक आपणास अमीन या टोपणनावाने संबोधित असत. अमीन या शब्दाचा अर्थ सच्चा असा आहे. स्वाभाविकच आपणासोबत भागीदारीत व्यवसाय करण्यास अनेक व्यापारी उत्सुक होते.

- हजरत खदीजा (रजि.) या एक अत्यंत पवित्र आचरणाच्या आणि श्रीमंत महिला होत्या. त्या स्वतः व्यापारी सफरीवर जात नव्हत्या. तथापि इतरांना व्यवसायासाठी भांडवल उपलब्ध करून देत आणि भागीदारीत व्यवसाय करत होत्या.

  हजरत खदीजा (रजि.) यांनी जेव्हा हजरत

मुहम्मद (स.अ.) यांचा प्रामाणिकपणा, सचोटी आणि व्यावसायिक नैपुण्याबाबत चर्चा ऐकली तेव्हा त्यांनी हजरत मुहम्मद (स.अ.) यांना व्यापारासाठी धन देऊन आपल्या मैसरा नावाच्या गुलामासोबत सीरीया देशास पाठविले. या व्यापारी सफरीमध्ये हजरत खदीजा (रजि.) यांना अपेक्षेपेक्षा जास्त नफा झाला.

- हजरत मुहम्मद (स.अ.) अत्यंत पवित्र, इमानदार, सच्चे आणि आश्वासनाचे पक्के आहेत याबाबत सामान्य जनतेच्या मनात कोणतीही शंका नव्हती, सर्वसामान्य जनता आपणास अमीन आणि सादीक या नावाने संबोधित असे. ज्या व्यक्ती हजरत मुहम्मद (स.अ.) सोबत अहोरात्र होत्या ते काही विचित्र घटना घडताना पाहत, उदाहरणार्थ जेव्हा हजरत मुहम्मद (स.अ.) एखाद्या वृक्षाच्या छायेत विश्रांतीसाठी येत, तेव्हा जर आपणांवर सूर्याची किरणे येत असतील तर त्या वृक्षाच्या फांद्या आपोआप अशाप्रकारे वळत की आपणावर व्यवस्थित छाया येत होती. जेव्हा हजरत मुहम्मद (स.अ.) प्रखर उन्हात तापलेल्या वाळवंटातून वाटचाल करीत, तेव्हा एक अदृश्य शक्ती आपणावर छाया करत असे. हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या घामास दुर्गंधी येत नव्हती.

  हजरत खदीजा (रजि.) यांचे गुलाम मैसरा यांनी या अनुभवांचे कथन त्यांच्याजवळ केले.

- हजरत खदीजा (रजि.) यांचे वय ४० वर्षे होते आणि या कालावधीमध्ये त्यांना २ वेळेस वैधव्य आले होते. त्यामुळे त्यांच्या जीवनात विरक्ती होती. त्यांनी जेव्हा हजरत मुहम्मद (स.अ.) यांचा प्रामाणिकपणा, सचोटी, आदरणीय खानदान आणि त्यांना लाभणारी ईश्वरी सुरक्षा याबाबत माहिती घेतली तेव्हा त्यांच्या मनात एक आनंदी आणि सौख्यपूर्ण वैवाहिक आयुष्याची मनोकामना उत्पन्न झाली. त्यांनी आपली सखी नफिसा यांच्याव्दारे हजरत मुहम्मद (स.अ.) यांना विवाहाचा निरोप पाठवला. ह.ख़दीजा (रजि.) यांच्या पित्याचे निधन झाल्यामुळे त्यांचे चुलते उमरो बिन असद यांनी ह.अबू तालिब आणि हजरत हमजा (रजि.) यांच्याशी बोलणी करून आपणा दोघांचा विवाह सन ५९५ मध्ये केला.

- विवाहानंतर १५ वर्षापर्यंत आपण (हजरत मुहम्मद) एक आदर्श पती, प्रेमळ पिता आणि समाजातील सुख दुःखाची चिंता करणारे एक आदर्श पुरूष म्हणून जीवन व्यतित केले. प्रेषितांना समाजासमोर एक आदर्श पुरूषाच्या रूपात प्रदिर्घ कालावधीपर्यंत ठेवण्याची ही एक ईश्वरीय परंपरा आहे. याचे कारण असे आहे जेव्हा हे आदर्श पुरूष म्हणतात मी ईश्वराचा प्रेषित आहे तेव्हा जनता जाणून असते की जीवनात कधीच आदर्श पुरूष खोटे वदले नाहीत. आज देखील त्यांच्या मुखातून सत्य वचनच बाहेर पडत आहे. जेव्हा प्रेषित असहाय्य जनतेची मदत करण्याचा आदेश देतात, तेव्हा कोणीही म्हणु शकत नाही की यांनी ४० वर्षांच्या आयुष्यात अन्याय केला आणि आता आम्हांस न्यायाचे पाठ देत आहेत. प्रेषितांच्या सर्वश्रेष्ठ खानदानास, त्यांच्या सर्वश्रेष्ठ आचरणांस सर्वसाधारण जनता पूर्णपणे जाणुन असते. म्हणून प्रेषितांना नाकारण्यासाठी ही जनता कोणतेही कारण अथवा दोष पुढे ठेऊ शकत नाही.

  नेमके हेच हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या बाबतीत घडले. मक्कावासियांनी अहंकार, हटधर्म आणि घमेंडपोटी हजरत मुहम्मद (स.अ.) यांची शिकवण स्वीकारली नाही. पण ते हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या आचरणास आक्षेप घेऊ शकले नाहीत. त्यांनी नेहमीच मनोमन स्वीकारले होते की हजरत मुहम्मद (स.अ.) एक आदर्श पुरूष आहेत.

*********

# प्रकरण क्रमांक-४
# हजरत मुहम्मद (स.) यांचे प्रेषित बनल्यानंतरचे जीवन

- वयाच्या ३७ व्या वर्षापासून ४० वर्षांपर्यंत हजरत मुहम्मद (स.अ.) खरी स्वप्ने पहात होते. हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे मन लोकांपासून दूर एकांतात ईश्वर स्मरणात तल्लीन होत होते. हजरत मुहम्मद (स.अ.) घरुन खाण्याच्या वस्तुसोबत घेऊन मक्का जवळील पर्वताच्या हिरा नामक गुहेत कित्येक दिवस वास्तव्य करत होते आणि ईश्वर स्मरणात रममाण होत होते.

  (मक्कावासीयांची एका ईश्वरावर श्रद्धा तर होती परंतु त्याचबरोबर ते अनेक देवतांची पूजा देखील करत होते. या मूर्तिपूजेस अटकाव करण्यासाठीच ईश्वराने हजरत मुहम्मद (स.अ.) यांना प्रेषित बनवले होते.)

  हिरा गुहेमध्येच ईश्वराचे स्मरण करत असतानाच हजरत मुहम्मद (स.अ.) यांना वयाच्या ४० व्या वर्षी ईश्वराने हजरत जिब्रील (अ.स.), जे एक शक्तिशाली फरिश्ते आहेत, यांच्यामार्फत हजरत मुहम्मद (स.अ.) प्रेषित असल्याची आणि त्यांना लोकांना मार्गदर्शन करावयाचे असल्याची खुशखबर दिली. हजरत मुहम्मद (स.अ.) वयाच्या ४० व्या वर्षापासून ६३ वर्षापर्यंत म्हणजेच २३ वर्षे ईश्वराचा संदेश लोकांपर्यंत पोहोचवत होते.

  २३ वर्षांचा हा असा कालावधी आहे ज्यामध्ये बरेच लोक हजरत मुहम्मद (स.अ.) यांना समजण्यात काही गल्लत करतात. हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे प्रेषित बनल्यापासूनचे २३ वर्षाचे जीवन सारांश रूपात सांगण्याचा मी (लेखक) प्रयास करू इच्छितो.

- ४० व्या वर्षी ईश्वराने हजरत मुहम्मद (स.अ.) यांना पवित्र कुरआनचे ज्ञान द्यावयास सुरूवात केली आणि पुढील २३ वर्षे ईश्वर हे ज्ञान देत होता.

  ईश्वराकडून सुरूवातीची तीन वर्षे केवळ मित्र आणि आप्तेष्टांमध्येच धर्मप्रचाराची अनुमती देण्यात आली होती. या तीन वर्षांच्या कालावधीत धर्मप्रचारामुळे केवळ ४० लोकांनी इस्लामचा स्वीकार केला.

- चौथ्या वर्षी (इ.स.६१४) आपणांस सर्वसाधारण जनतेत धर्मप्रचार करण्याचा आदेश ईश्वराकडून मिळाला. मूर्तिपूजेस विरोध, जनतेच्या पचनी पडला नाही आणि संपूर्ण मक्का शहर हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे शत्रू बनले.

- पाचव्या वर्षापासून १३ वर्षापर्यंत हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे वास्तव्य मक्का शहरामध्येच होते, तथापि इस्लाम धर्माचा ज्यांनी स्वीकार केला होता, त्यांचा अतोनात छळ करण्यात येत होता. त्यामुळे ते सर्व एकूण ८० लोक मक्का सोडून इतरत्र निघुन गेले होते.

- हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे खानदान अत्यंत आदरणीय आणि शक्तिशाली होते. त्यांच्या खानदानातील बहुतेकांनी इस्लामचा स्वीकार केला नव्हता, तरीही ते हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे रक्षण करीत. जेव्हा मक्कावासियांना हजरत मुहम्मद (स.अ.) यांना छळण्याची कोणतीच संधी मिळेनाशी झाली तेव्हा त्यांनी हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या संपूर्ण खानदानावरच सामाजिक बहिष्कार टाकला. (इ.स.ऑक्टो ६१५ ते इ.स.६१८ पर्यंत) हा तीन वर्षाचा काळ पूर्ण खानदानासाठी अत्यंत कठिण होता.

- तीन वर्षांनंतर हा सामाजिक बहिष्कार उठविण्यात आला. पण याच वर्षी आपल्या आदरणीय पत्नी, हजरत खदीजा (रजि.) आणि खंबीर साथ देणारे प्रिय चुलते, हजरत

अबू तालिब या दोघांचे देहावसान झाले.

- हजरत अबू तालिब यांच्या पश्चात अबू लहब आपल्या कबिल्याचा सरदार बनला, जो हजरत मुहम्मद (स.अ.) यांचा कट्टर शत्रू होता. त्याने आपल्या खानदानाव्दारे हजरत मुहम्मद (स.अ.) यांना संरक्षण देण्यास नकार दिला आणि हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्यावर यातनांचे डोंगर कोसळले.

- मक्का शहराच्या नकारात्मक प्रतिसादाने निराश होऊन जवळच्या ताएफ नावाच्या शहरास हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी भेट (जून ६१९ AD मध्ये) दिली आणि तेथील सरदारांना, प्रमुखांना ईश्वराचा संदेश द्यायचा प्रयत्न केला. तथापि ताएफच्या जनतेने हजरत मुहम्मद (स.अ.) यांना अत्यंत घृणास्पद वागणूक दिली. त्यांनी प्रेषित हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्यावर चोहोबाजुंनी सातत्याने असा काही दगडांचा वर्षाव केला की हजरत मुहम्मद (स.अ.) रक्तबंबाळ झाले, त्यांच्या पादत्राणांमध्ये रक्त साकळले.

- पत्नी आणि चुलत्यांचे निधन, मक्कामधील प्रत्येक व्यक्ती कट्टर शत्रू, यासोबतच ताएफमधील असफलता, या परिस्थितीमुळे हजरत मुहम्मद (स.अ.) खुप दुःखी झाले. परमेश्वराने एके रात्री हजरत जिब्रील (अ.स.) यांच्या सोबत "बुर्राक" नामक दैविक घोडा पाठवला (जूलै 620 AD मध्ये), ज्याच्यावर आपणास (हजरत मुहम्मद (स.अ.)) बसविण्यात येऊन, प्रथम जेरूसलेम (इस्राईल) येथे नेण्यात आले. तेथे त्यांनी या भुतलावर अवतीर्ण झालेल्या एकूणएक प्रेषितांच्या नमाजचे नेतृत्व केले. तेथून आपणांस, परमेश्वराने आकाशात (आसमान) बोलावून संपूर्ण स्वर्गलोकीची सफर घडविली. मृत्यूपश्चात येणारे जीवन, हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले, परिणामी आपली निराशा, दुःख कमी झाले आणि आपले मनोबल उंचावले. अरब मूर्तिपूजक होते तथापि या विश्वाची निर्मिती केवळ अल्लाहने केली आहे, हे ते जाणून होते. हजरत इब्राहीम (अ.स.) यांनी हजयात्रा करण्याबाबत जो संदेश दिला होता त्यानुसार ते हजयात्रा करीत होते.

- हजयात्रेमध्ये संपूर्ण अरब जगतामधून लोक मक्का येथे एकत्र येत होते. या यात्रेमध्ये हजरत मुहम्मद (स.अ.) ईश्वराच्या सत्यधर्माविषयी यात्रेकरूंचे प्रबोधन करत. यहुदी आणि ख्रिश्चन धर्मग्रंथात एक प्रेषित अवतीर्ण होणार असल्याचे भाकित नमूद होते आणि हा समुदाय त्या प्रेषितांच्या प्रतिक्षेत होता. हे दोन्ही समुदाय अरबांना धमकी देत होते आणि म्हणत प्रेषित अवतीर्ण झाल्यानंतर आम्ही अधिक शक्तिशाली बनु आणि तुम्हा सर्वांना पराजित करू.

म्हणुन प्रेषित अवतीर्ण होणार आहेत हे अरब जाणुन होते. इ.स.६२० मध्ये मदीना येथून आलेल्या हजयात्रींनी जेव्हा हजरत मुहम्मद (स.अ.) यांचा संदेश ऐकला तेव्हा त्यांना उमजले की हे तेच प्रेषित आहेत ज्यांची चर्चा यहुदी आणि ख्रिश्चन करतात. यहुदी आणि ख्रिश्चन यांनी इस्लामचा स्वीकार करण्याआधी आपण प्रथम इस्लामचा स्वीकार करावा असा त्यांनी निश्चय केला आणि ते सर्व मुस्लिम बनले. अशाप्रकारे त्या वर्षी एकुण ६ लोकांनी इस्लामचा स्वीकार केला. पुढील वर्षी, इ.स.६२१ मध्ये आपल्यासोबत आणखी यात्रेकरू त्यांनी आणले व ते सर्व मुस्लिम बनले. इ.स.६२२ मध्ये हजयात्रेमध्ये ७५ मदीनावासियांनी इस्लामचा स्वीकार केला. पवित्र कुरआन शिकवण्यासाठी या समुदायाने एका शिक्षकाची मागणी हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्याकडे केली असता त्यांनी हजरत मुसैब बिन उमैर (रजि.) यांना त्यांच्यासोबत पाठवले, हजरत मुसैब बिन उमैर (रजि.) यांनी मदीना येथे इस्लामचा प्रसार अत्यंत वेगाने केला.

- काबा शरीफ मध्ये ठेवण्यात आलेल्या ३६० मूर्त्यांचे दर्शन घेण्यासाठी वर्षभर यात्रेकरूंची रिघ लागलेली असल्यामुळे मक्कावासियांचा व्यापार तेजित चालत होता. इस्लामच्या प्रसारा बरोबर मूर्तिपूजा आणि मक्कावासियांचा भरभराटीस आलेला व्यापार बंद पडेल अशी त्यांना भीती वाटत होती. यामुळे इस्लामच्या प्रसाराची बातमी जेव्हा मक्कावासियांना कळाली तेव्हा ते अत्यंत क्रोधित झाले आणि हजरत मुहम्मद (स.अ.) यांना संपवण्याचा निश्चय त्यांनी केला. हजरत मुहम्मद (स.अ.) यांना जेव्हा याची खबर मिळाली तेव्हा इ.स.६२२ सप्टेंबरच्या १२-१३ तारखेच्या रात्री हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी मक्काहून मदीनेस प्रस्थान केले. ही घटना प्रेषित बनल्यानंतर १३ व्या वर्षी घडली आणि या घटनेस "हिजरत" असे म्हटले जाते. याच दिवसापासून इस्लामी कालगणना "हिजरी"ची सुरवात झाली आहे.

- मक्का शहरामध्ये केवळ हजरत मुहम्मद (स.अ.) आणि दोन चार मुस्लिमां व्यतिरिक्त इतर सर्व मूर्तिपूजक होते. परिणामी हजरत मुहम्मद (स.अ.) यांची मक्का येथील शिकवण प्राथमिक स्वरूपाची होती. उदाहरणार्थ, या विश्वाचा निर्माता केवळ एक ईश्वर असून त्याच्या शिवाय इतर कोणीही पूजनिय नाही, ही ती शिकवण होती. मदीना येथे बहुसंख्य मुस्लिम बनले होते आणि इतर शहरातील मुस्लिम सुध्दा मदीना येथे शरण घेत होते. हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी पुढील १० वर्षे मदीना येथे वास्तव्य केले, या कालावधीमध्ये अनेक मशिदी बांधण्यात आल्या आणि इस्लामी समाजाची निर्मिती झाली. हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी मदीना येथे वास्तव्य केल्यानंतर तेथे मुस्लिमांची संख्या वेगाने वाढू लागल्याने मक्कावासियांनी मदीना येथील मुस्लिमांचा नायनाट करण्याचा निश्चय केला. या युध्दासाठी आवश्यक पैसा जमा करण्यासाठी प्रत्येक मक्कावासियाने व्यापारात भांडवल गुंतवले आणि मिळणारा नफा युध्दासाठी दान देण्याचे ठरवले होते.

**प्रेषित बनल्यानंतरचे १५ वे वर्ष**

- मक्काचा व्यापार सीरिया आणि येमेन देशाबरोबर होता आणि सीरिया व मक्का मार्गाच्या दरम्यान मदीना हे शहर आहे. हजरत मुहम्मद (स.अ.) यांना जेव्हा ही योजना ज्ञात झाली तेव्हा त्यांनी मक्कावासियांचा सीरियाबरोबर व्यापार करून पैसा जमविण्याआधी सीरियाचा मार्ग बंद करण्याची योजना आखली. मक्कावासियांना आपण आता सीरियाबरोबर सुरक्षित व्यापार करू शकत नाही याची जाणिव झाली.

- या परिस्थितीत सीरियाहून परतणा-या एका काफिल्याच्या संरक्षणासाठी मक्क्याहून १३०० सैनिक पाठविण्यात आले होते.

  हा काफिला मदीना शहरास वळसा घालून सुरक्षितपणे मक्का येथे पोहोचला,तेव्हा केवळ ३०० सैनीकच मक्कामध्ये परतले होते उर्वरीत १००० सैनिकांचा मदीनावर आक्रमणाचा विचार होता. हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी आपल्या केवळ ३१३ सोबत्यांसोबत बदर नामक ठिकाणी यांचा प्रतिकार करून विजय संपादन केला. ही घटना हजरत मुहम्मद (स.अ.) हे प्रेषित बनल्यानंतर १५ वर्षांनी घडली.

**प्रेषित बनल्यानंतरचे १६ वे वर्ष**

मक्कावासियांनी युध्दासाठी आवश्यक धन एकत्रित केले होते आणि ते आरंभापासूनच इस्लामला नेस्तनाबूत करू इच्छित होते. आता यासोबतचा बदर येथे झालेला पराभवाचा कलंक पुसायचा होता, यासाठी ३००० सैनिकासोबत त्यांनी मदीनावर आक्रमण केले. उहद नामक ठिकाणी इस्लामी लष्कराबरोबर त्यांचा सामना झाला.

मुस्लिमांनी प्रारंभी विजय मिळवला तथापि एका सैनिक तुकडीच्या चुकीच्या निर्णयामुळे या विजयाचे पराजयात रूपांतर झाले, परिणामी मुस्लिमांना प्रचंड हानी सोसावी लागली.

### प्रेषित बनल्यानंतरचे १८ वे वर्ष

उहद येथील लढाईत मुस्लिम पराजित झाले होते तरीही मुस्लिमांना पूर्णपणे नामशेष करण्यासाठी मक्कावासियांनी संपूर्ण अरबस्तानातून १०००० सैनिकांनिशी दोन वर्षानंतर पुन्हा मदीना शहरावर हल्ला केला. या लष्कराचा मुकाबला एकाच वेळी करणे शक्य नसल्यामुळे मदीनास्थित मुस्लिमांनी शहराभोवती मोठा खंदक (Trench) खोदला आणि स्वतःचा बचाव केला.

हे युध्द एक महिना चालले पण आक्रमक सैनीक खंदक पार करण्यात यशस्वी झाले नाहीत. शेवटी परमेश्वराने प्रचंड मोठे वादळ पाठवून आक्रमक सेनेची वाताहत केली आणि त्यांनी माघार घेतली.

आक्रमक सैन्य विजयी झाले असते तर एकही मुस्लिम जिवंत राहिला नसता आणि अंतिम सत्याची ज्योत देखील तेवत राहिली नसती.

ही घटना आपण प्रेषित बनल्यानंतर १८ व्या वर्षी इ.स. ६२७ मध्ये घडली. या घटनेचा उल्लेख अथर्ववेदात खालीलप्रमाणे आहे.

सेत्त्रा अमदन तानि वृष्राया ते सोमासी वृत्रहत्युंषु स्त्पतें

यत कारवे दश वृत्रायपति वर्हिष्मते नि सहस्त्रानि वर्हयः॥6॥ (Rif)

(भावार्थ : सत्यवादी विरांनी ईश्वर स्तवन करत दहा हजार शत्रू सैन्यास न लढता पराजित केले.) (Muhammed in World Scripture by A.H. Vidyarthi, Page no. 118)

- या घटनेनंतर जेव्हा संपूर्ण अरबस्तान एकवटून मदीना शहरावर आक्रमणाची तयारी करत होता, तेव्हा हजरत मुहम्मद (स.अ.) यांना याची माहिती होती पण ते असहाय होते. अरबस्तानच्या कानाकोप-यात पोहचून ते त्यांना थांबवू शकत नव्हते. खंदकामुळे आपला बचाव करण्यात ते एकदा यशस्वी ठरले होते पण मोठ्या संख्येने पुन्हा आक्रमण झाल्यास खंदक खोदून देखील बचाव करता येणार नाही याची त्यांना जाण होती. म्हणुन यानंतर हजरत मुहम्मद (स.अ.) यांना अरबस्तानात कोणत्याही ठिकाणी सैन्य एकवटण्याची खबर मिळे तेव्हा आपल्या सोबत्यांना तेथे पाठवून त्यांना इतस्ततः करत, या नीतीचा अवलंब आपण अनेक वेळा केला आणि मदीना शहराचे रक्षण केले.

### प्रेषित बनल्यानंतरचे १९ वे वर्ष

एके रात्री हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी स्वप्नात पाहिले की आपण उमरा (हज यात्रे व्यतिरिक्त इतर वेळेस मक्कास्थित काबा शरीफ येथील जी यात्रा केली जाते त्यास उमरा असे म्हणतात) ही यात्रा करत आहात.

या स्वप्नाचा उल्लेख हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी आपल्या सोबत्या समोर केला तेव्हा सोबत्यांच्या मनात आपले मूळ ठिकाण आणि ईश्वराचे घर पाहण्याची इच्छा उचंबळून आली.

हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी १४०० सोबत्यां बरोबर उमरा करण्यासाठी मक्का शहराकडे प्रस्थान केले. तथापि मक्कावासियांनी आपणांस शहरात प्रवेश करण्यास प्रतिबंध केला आणि युध्दास सज्ज झाले. या परिस्थितीवर चर्चेव्दारे तोडगा काढण्यात आला आणि दोन्ही पक्षामध्ये एक तह झाला ज्याला “सुलह हुदैबिया” असे म्हणतात.

या तहानुसार दोन्ही पक्ष आपापसात तसेच त्यांच्या मित्रपक्षाबरोबर युध्द करणार नाहीत आणि हजरत मुहम्मद (स.अ.) या वर्षी उमरा न करता पुढील वर्षी उमरा करतील असे

ठरले.

**प्रेषित बनल्यानंतरचे २० वे वर्ष**

अरब जगतात, ज्यु (यहुदी) समुदाय अत्यंत श्रीमंत आणि शिक्षीत होता, ते स्वतःला अरबांपेक्षा श्रेष्ठ समजत. इस्लामच्या उदयामुळे त्यांचे श्रेष्ठत्व नष्ट झाले. या कारणांमुळे ते मुस्लिमांचा आत्यंतिक व्देष करत आणि अरबांना मुस्लिमाविरूध्द चिथावणी देत. त्यांच्या षडयंत्रापासून मुक्ति मिळवण्यासाठी हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी त्यांच्यासोबत उमरा यात्रेसाठी आलेल्या १४०० सोबत्यांच्या साहाय्याने त्यांचा खैबर येथे असणा-या किल्ल्यास वेढा घातला. किल्ल्यामध्ये वीस हजार यहुदी होते तरीही त्यांचा प्रतिकार अत्यंत क्षीण होता, त्यांनी पराजय मान्य केला आणि मुस्लिमांसोबत एक शांती करार केला.

या करारानिमित्त त्यांनी मुस्लिमांना जेवणासाठी निमंत्रित केले आणि भोजनामध्ये जहाल विष घातले.

हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या एका सोबत्याचा या जेवणाचा एक घास खाताक्षणी मृत्यू झाला. हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी एक घास आपल्या मुखामध्ये घेतला होता पण आपणास हे ज्ञात होताच तो घास आपण थुंकला तथापि त्या विषाचा थोडाफार परिणाम आपणांवर झाला. या घटनेनंतर हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे निधन पाच वर्षांनंतर झाले. या कालावधीत विषाच्या झालेल्या परिणामाने आपण वारंवार आजारी होत असत. अंततः याच विषामुळे हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे निधन झाले.

- मक्कावासी हजरत मुहम्मद (स.अ.) यांना निरंतर त्रास देत ते एक डोके दुःखी बनले होते. हुदैबिया येथे झालेल्या शांती करारामुळे एक शांतिपर्व अवतरले होते. याच कालावधी हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी देशोदेशींच्या राजांना इस्लाम स्वीकारण्याविषयी आमंत्रित केले. आपण रोम, इराण, इजिप्त, इथियोपिया, येमेन आणि सिरीयाच्या राजांना पत्रे लिहिली.

रोमच्या राजाने आपणास प्रेषित मानले तथापि इस्लामचा स्वीकार केला नाही. इराणचा राजा अत्यंत नाराज झाला आणि आपले पत्र त्याने फाडून टाकले. इजिप्तच्या राजाने पत्र आणणा-या दूताचा आदर-सत्कार केला आणि उपहार देऊन रवानगी केली.

येमेनच्या राजाने सत्तेमध्ये वाटा दिल्यास इस्लाम स्वीकारण्याची अट घातली. इस्लाम सत्तेसाठी अवतीर्ण झाला नसल्याने हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी त्यास नकार दिला.

इथियोपियाच्या राजाने आपल्या दूताचा मोठा आदर-सत्कार केला आणि स्वतः इस्लामचा स्वीकार केला.

सीरियाच्या सीमेवर शरजिल बिन उमरू नावाच्या रोमन साम्राज्याच्या अंकीत सरदाराची सत्ता होती. तो पत्र वाचून क्रुध्द झाला, दूताची हत्या केली आणि मदीना शहरावर आक्रमण करण्याचा आदेश दिला.

- शरजिल बिन उमरू याचा सामना करण्यासाठी हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी ३००० ची फौज पाठवली. शरजिल सुरूवातीपासूनच आक्रमणाची तयारी करीत असल्याने दोन लाख सैनिक जमा केले.

दोन लाख सेनेच्या समोर केवळ तीन हजार मुस्लिम सैनिक होते पण त्यांनी मोठया हिंमतीने प्रतिकार केला. मुस्लिम सेनेचे तीन सेनापती पहिल्या दिवशी पाठोपाठ शहिद झाले. युध्दाच्या दुस-या दिवशी हजरत खालिद बिन वलिद (रजि.) सेनापती बनले. त्यांनी युध्दभूमीवर ३००० सैनिकांना अशा प्रकारे उभे केले की शत्रू पक्षाला पहिल्या दिवसाचे जखमी सैनिक न दिसता आताचा रणांगणावर उतरलेले ताजेतवाने सैनिक दिसत होते. यानंतर त्यांनी अत्यंत धिम्या गतीने आपल्या सेनेस मागे हटविण्यास

सुरूवात केली. रोमन सैन्यास वाटले की ही मुस्लिम सेनेची ही एक चाल असून ते आपणांस वाळवंटात नेऊन लढवू इच्छितात. रोमन सेनेने सावध पवित्र घेतला अणि मुस्लिम सेनेचा पाठलाग केला नाही, त्यामुळे मुस्लिम सेना सुरक्षित परतली. ही घटना मुअत्ता येथे घडली, आज देखील तेथे शहिदांचे स्मारक आपण पाहू शकतो.

**प्रेषित बनल्यानंतरचे २१ वे वर्ष (इ.स.६३०)**

मक्कावासियांसोबत शांती करार होता पण ते त्याचे पालन करत नसत. मक्का शहर ईश्वराने शांतीचे आणि सर्वांसाठी शरण घेण्याचे शहर बनवले आहे. या शहरामध्ये वृक्ष, झाडे तोडणे, अकारण पशु पक्षांची हत्या करण्यास मनाई आहे. अशा पवित्र ठिकाणी कोणत्याही प्रकारचा उपद्रव होता कामा नये. मक्कावासियांनी अशा कोणत्याही धार्मिक नियमाचे पालन केले नाही आणि हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्यासोबत झालेल्या शांती कराराचा देखील आदर केला नाही. हजरत मुहम्मद (स.अ.) याच्या मित्र कबिल्याचे लोक मक्कामध्ये आले असताना त्यांची काबा शरीफ समोर हत्या करण्यात आली. हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी निर्वाणीचा इशारा दिला, हत्येचा दंड दया अथवा शांती करार मोडीत काढा. मक्कावासियांनी घमेंडीत शांती संधी भंग केली.

शांती करार मोडीत निघाल्यामुळे आता पुनःश्च मक्कावासियांच्या आक्रमणाचा मोठा धोका होता. हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी त्यांच्या आक्रमणा आधिच स्वतः दहा हजारांची सेना सोबत घेऊन मक्का शहरास वेढा घातला.

मक्कावासी या आक्रमणासाठी मुळीच तयार नव्हते. लढाई न करताच त्यांनी आपला पराभव मान्य केला. ही घटना आपण प्रेषित बनल्यानंतर २१ व्या वर्षी घडली.

मक्कावासियांनी या २१ वर्षाच्या कालावधीमध्ये हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्यावर अतोनात अत्याचार केले. हजरत मुहम्मद (स.अ.) यांचा वध करण्याचा प्रयत्न केला. गरीब निशस्त्र मुस्लिमांवर अन्वनित अत्याचार केले, अमानुष मारहाण केली, अत्यंत क्रूर पध्दतीने मुस्लिमांची हत्या केली, असे अगणित अपराध मक्कावासियांनी केले होते. हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी जेव्हा पूर्णपणे मक्का ताब्यात घेतले तेव्हा त्यांनी सर्व समावेशक माफीची घोषणा केली. ह्या असिम दयाळूपणा आणि क्षमाशिलतेमुळे पूर्ण मक्का शहर अत्यंत प्रभावित झाले आणि त्या सर्वांनी विनाविलंब इस्लामचा स्वीकार केला.

- हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्यासोबत १०००० सैनिक होते. त्यांनी विजयी झाल्यानंतर कोणासही हानी पोहोचविली नाही, यामुळे त्यांना गायीची उपाधी अथर्ववेदात बहाल करण्यात आली आहे.

एश इशाय मामहे शतं निष्कान् दश स्त्रजः।
त्रीणि शतान्यर्वतां सस्त्रादश गोनाम॥
(भावार्थ : परमेश्वराने मामेह ऋषी यांना १०० हार, १० सुवर्णमुद्रा, ३०० घोडे आणि १०००० गायी दिल्या.)

या श्लोकामध्ये १०० हार म्हणजे असहाबे सुफ्फा होत, १० सुवर्णमुद्रा म्हणजे अशरा-ए-मुबश्शरा (अशा १० व्यक्ती ज्यांना भूतलावरच स्वर्गप्राप्तीची खुशखबर देण्यात आली आहे) होत. ३०० घोडे म्हणजे ज्यांनी पहिल्या बदरच्या युध्दात भाग घेतला होता ते सैनिक आणि १०००० गायी म्हणजे ते सैनिक ज्यांनी इतरांना (मक्कावासियांना) मुळीच हानी पोहोचवली नाही असे.

त्वमेतां जनराज्ञो व्दिर्दशाबन्धुना सुश्रवसोपजग्मुषः।
षर्ष्टि सहसा।
नवर्ति नव श्रुतो नि चक्रेरा रथ्या दुष्पदावराक॥

दुस-या श्लोकामध्ये नमूद करण्यात आले आहे की, हजरत मुहम्मद (स.अ.) यांची

परमेश्वर, ६००९९ शत्रूपासून रक्षा करेल. हे ६००९९ म्हणजे मक्कावासी होत (त्या काळी मक्का शहराची लोकसंख्या सुमारे ६०००० होती ).

(Mohammed in word Scriptures, Page No. 127, Atheraved 20:21-3)

- हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी अचानक मक्का शहरास वेढा घातला होता, मक्कावासी युध्द करू शकले नाहीत आणि पराजित झाले. यामुळे इतर कबिले मक्का शहरावरील आक्रमणामुळे सजग झाले. त्यांना युध्दाच्या तयारीसाठी आवश्यक अवधी मिळाल्यामुळे त्यांनी १२००० सैनिकांची फौज उभी केली आणि युध्दासाठी रवाना झाले.

यांचा मुकाबला हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या सोबत्या बरोबर हुनैन या ठिकाणी झाला. ते अत्यंत धैर्याने लढले पण पराभूत झाले. हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी त्यांना पराभूत करून बंदी बनविल्यानंतर सर्वांना आम माफी दिली, मुक्त केले. आपणास परमेश्वराने संपूर्ण विश्वासाठी दयाळू (Blessing of Mankind) बनवून पाठवले होते. हा दयाळूपणा आणि उदारता शत्रू सेनेस भावली आणि त्यांनी इस्लामचा स्वीकार केला. अशाप्रकारे पूर्ण अरबस्तानामधून इस्लाम विरोधकांचा पूर्णपणे नायनाट झाला.

**प्रेषित बनल्यानंतरचे २२ वे वर्ष**

- संपूर्ण अरब इस्लाममय झाल्याने रोमन साम्राज्याला त्याची चिंता वाटू लागली आणि त्यांनी एका मोठ्या युध्दाची मोहिम आखली.

हजरत मुहम्मद (स.अ.) यांना याची खबर मिळताच आपण स्वतः ३०००० सैन्यासोबत १००० कि.मी. चा प्रवास करून रोमन साम्राज्याच्या सीमेवर पोहोचले.

मुअतता नामक ठिकाणी ३००० सैनिकांची मुस्लिम सेना २ लाख रोमन सैन्याला भिडली होती याची जाण त्यांना होती. यावेळी ३०००० सैन्य आणि सोबत स्वतः प्रेषित असल्यामुळे रोमन सेनेची युध्द करण्याची हिंमत झाली नाही आणि ते जवळपासच्या गावात आश्रयाला गेले. तबुक नामक ठिकाणी एक महिना आपण त्यांची प्रतिक्षा करीत होता पण रोमन सेनेच्या पलायनामुळे आपणास युध्दाविना परतावे लागले.

अशाप्रकारे अरब जगतामध्ये शांतिपर्व सुरू झाले आणि बहुसंख्य जनतेने इस्लामचा स्वीकार केला.

ही घटना प्रेषित बनल्यानंतर २२ वर्षे घटली.

**प्रेषित बनल्यानंतरचे २३ वे वर्ष**

परमेश्वराने प्रेषित बनल्यानंतर २२ व्या वर्षी हज यात्रा अनिवार्य केली. तथापि काही कारणामुळे हजरत मुहम्मद (स.अ.) त्या वर्षी हज करू शकले नाहीत. पुढील वर्षी आपण हज यात्रा करण्याची घोषणा केली तेव्हा हज यात्रेचे नियम शिकण्यासाठी, आपल्या सहवासाचा लाभ घेण्यासाठी, एक लाख चाळीस हजार लोक मक्का येथे जमले आणि आपणांसोबत हज यात्रा पूर्ण केली.

या प्रसंगी हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी केलेला उपदेश सुवर्णाक्षरांनी लिहिण्याजोगा आहे, प्रकरण ६ मध्ये या भाषणाचा सारांश दिलेला आहे.

- मक्का शहर, हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे जन्मस्थान आहे, आपण या शहरावर नितांत प्रेम करत. हज यात्रेनंतर मक्का शहर सोडताना आपण अत्यंत दुःखी झालात, आपले अश्रू वाहू लागले.

- मदीना येथे पोहोचल्यावर ७५ दिवसानंतर आपणास डोकेदुखी, ताप याचा त्रास सुरू झाला. ज्यु समुदायाने आपल्यावर जो विषप्रयोग केला होता त्याचाच हा परिणाम होता. आपण १५ दिवस आजारी राहिलात

आणि ८ जून ६३२ रोजी आपले निधन झाले.

- आपण, हजरत मुहम्मद (स.अ.) यांना ६३ वर्षांचे आयुष्य लाभले. आपल्या जीवनाचा अभ्यास केला असता, आपणास सुखाचा जो काही कालावधी मिळाला, तो आपण प्रेषित बनण्यापूर्वी मिळाला, या कालावधी व्यतिरिक्त आपले जीवन अत्यंत संघर्षमय होते.

- जन्मापूर्वी पित्याचे छत्र हरपले, ६ वर्षाचे असताना मातेचा मृत्यू झाला, ८ व्या वर्षी आजोबांचे निधन झाले, आपण अनाथ होता. आयुष्याच्या सुरूवातीची २५ वर्षाचा आपला काळ अशा परिवारात व्यतित झाला जो समृध्द नव्हता. आपण उपजिवीकेसाठी तप्त वाळवंटात शेळ्यांची राखण केली, थोडे मोठे झाल्यानंतर काकासोबत वाळवंटात व्यापारासाठी दूरदूरच्या सफरी केल्या.

- प्रेषित बनल्यानंतर धर्मप्रचार अत्यंत कठिण कार्य होते. जेव्हा जेव्हा पवित्र कुरआन आपणांवर अवतरीत होत असे, तेव्हा आपणास तिव्र वेदना होत आणि आपण कडाक्याच्या गारठ्यात देखील घामाघूम होत.

- आपण धर्माचे केवळ दोन शब्द एखाद्या मित्रास ऐकवताच तो आपला कट्टर शत्रू बनत असे.

- आपले काका, अबू तालिब यांच्या निधनानंतर लोकांनी आपणास एवढा त्रास देण्यास सुरूवात केली की आपण घराबाहेर पडणे कमी केले होते. कोणी शिवीगाळ करी, कोणी थुंके, कोणी आपणास वेडा म्हणे, कोणी आपले कपडे फाडे, कोणी आपल्या डोक्यावर माती टाके तर कोणी आपल्या रस्त्यामध्ये काटे अंथरून ठेवी. आपण एकदा म्हणालात, मला जेवढा त्रास देण्यात आला, तेवढा कोणत्याही प्रेषिताला देण्यात आला नाही. (मुस्लिम, तिरमीजी)

- आपणास जेव्हा प्रेषिताची जबाबदारी सोपविण्यात आली तेव्हा आपणाजवळ २५ किलो सोन्याएवढे धन होते, ते धन आपण ईश्वराचा संदेश लोकापर्यंत पोहोचवण्यासाठी पूर्णपणें खर्ची घातले.

- जेव्हा आपण मदीना येथे वास्तव्य केले तेव्हा अन्य ठिकाणाहून मदीनेस येणा-या लोकांची भोजन व्यवस्था आपणच करत. या लोकांच्या जेवणासाठी स्वतः आणि आपला परिवार उपाशी रहात असे. तीन-तीन महिने आपल्या घरात चूल पेटत नसे. आपण आणि आपला परिवार केवळ खजूर आणि पाणी यावर गुजराण करीत. (बुखारी, मुस्लिम)

- प्रेषित बनल्यानंतर दहा वर्षापर्यंत आपल्या जिवास गंभीर धोका होता.

- मदीना येथील वास्तव्यात हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी दोन वेळेस पोटभर कधीच भोजन केले नाही. (बुखारी, मुस्लिम)

- मदीना येथे आपण गव्हाची पोळी कधीच खाल्ली नाही, केवळ सातूची रोटी आपण खात. (बुखारी, मुस्लिम)

- आपले निवासस्थान अत्यंत कच्चे होते. अंथरण्यासाठी खजूराच्या पानाच्या चटई व्यतिरिक्त कोणतेही आरामदायी साहित्य नव्हते.

- एका ईश्वरास मानण्यास लोक जेव्हा विरोध करत तेव्हा आपणास खूप दुःख होत असे, कारण अशी व्यक्ती १०० टक्के नरकात जाणार असल्याने कोणाचाही नरकाच्या दिशेने होणारा प्रवास आपणास एवढे दुःखी करे की, आपण संपूर्ण रात्र उभे राहून नमाज पडत आणि ईश्वराची करूणा भाकत. रात्र रात्र उभे राहून आपल्या पायावर सूज येत असे.

- हजरत मुहम्मद (स.अ.) यांना ईश्वराने संपूर्ण ब्रम्हांडाचा प्रेषित नियुक्त केले होते. हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या ह्रदयात लोक कल्याणासाठी अशी काही तडप होती की, ज्या ईश्वराने लोकांना धर्माची दीक्षा देण्याचा आदेश दिला होता, त्याला विषद करावे लागले, " पवित्र कुरआन आम्ही यांच्यासाठी आपणांवर अवतीर्ण केले नाही की ज्याच्यामुळे आपण स्वतः त्रासात पडाल. " (पवित्र कुरआन २०:२) ईश्वराने देखील म्हटले, "हे प्रेषित, हे लोक सत्यमार्ग स्वीकारत नाहीत म्हणून कदाचित आपण प्राणाचा त्याग कराल ".(पवित्र कुरआन २६:३)

ईश्वर आपणावर आणि आपल्या परिवारावर कृपा करो.

*********

प्रकरण-५

# ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या विषयी बुध्दिजीवींचे मत.

**महर्षि व्यास यांची भविष्यवाणी**

महर्षि श्री वेद व्यास हे हिंदू धर्मातील महान विद्वान आहेत. महाभारत आपनच लिहिले आहे. श्री कृष्णाचे आदेश जे त्यांनी अर्जुनाला दिले होते त्यांनाच पुस्तक स्वरूपात तुम्हीच लिहिले आहे. याच पुस्तकास गीता म्हटले जाते. चारही वेदांमध्ये ऋचा आणि सुक्तची मांडणी तुम्हीच केली आहे. तुम्ही १७ पुराण लिहिले आहेत. त्यातील एका पुराणाचे नाव भविष्य पुराण आहे. विद्वान मानतात कि भविष्यपुराणाचे बोल ईश्वरीय आहेत. फक्त श्री व्यासजींनी ते लिहिले आहेत.

श्री व्यास यांचे ४००० वर्षापूर्वीच निधन झाले. हजरत मुहम्मद (स.) यांचे निधन १४०० वर्षापूर्वी झाले आहे. श्री व्यास यांनी हजरत मुहम्मद (स.) यांच्या जन्मापूर्वीच २६०० वर्षाआधीच त्यांच्या संदर्भातील भविष्यवाणी भविष्यपुराणात केली होती.

भविष्य पुराण के प्रतिसर्ग पर्व ३, अध्याय ३, खंड ३, कलियुगी इतिहास संग्रहात २७ श्लोक इस्लाम धर्म आणि हजरत मुहम्मद (स.) यांच्या बाबतीत आहेत. त्या भविष्यवाणींचा सारांश खालील प्रमाणे आहे.

- भारतवर्षात लोक धर्माची शिकवण विसरतील.
- भारत देशापासून दूर वाळवंटात (अरब देश), हजरत मुहम्मद (स.अ.) यांचा जन्म होईल.
- ईश्वर त्यांना ब्रम्हा ही उपाधी बहाल करेल आणि ते मानवजातीस पुनःश्च धार्मिक शिकवण देतील.
- भारतवर्षात, आर्य धर्मात सुधारणा घडून येईल आणि सर्व लोक मुस्लिम बनतील.
- महर्षी व्यास यांनी हजरत मुहम्मद (स.अ.) यांना शरण जाण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

भविष्य पुराणात अनेक श्लोकात हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या विषयी भविष्य वर्तवण्यात आले आहे. त्यापैकी काही श्लोक खाली दिले आहेत.

**एतस्मिन्नन्तिरे म्लेच्छ आचार्य्येरा समन्वित :।**
**महामद इति रव्यात शिष्यशाखासमन्वित ।।५।**

**अयोनि : स वरो मत्त : प्राप्तवान्दैत्यवर्ध्दन :।**
**महामद इति ख्यात पैशाचकृनितत्पर ।।१२।।**

**इति श्रुत्वा नृपश्र्चैव स्वदेशानपु नरागमनतः।**
**महामदश्र्च तैः सार्ध्दे सिंधुतीरमुपाययौ ।।१४।।**

**तच्छू त्वा कालिदासस्तु रूषा प्राह महामदम।**
**माया ते निर्मिता धूर्त नृपमोहनहेतवे ।।१८।।**

**विना कौलं चं पशवस्तेषां भश्रया मता ममा**
**मुसलैनैव संस्कारः कुशैरिव भविष्यति ।।२६।।**

(संदर्भ :Muhammed in World Scriptures by A.H.Vidyarthi. Bhavishya Puran by Venkateshwar Press Mumbai )

**महाकवी गोस्वामी तुलसीदास यांची भविष्यवाणी**

- महाकवी गोस्वामी तुलसीदास यांनी संग्राम पुराणाचा अनुवाद केला आहे. या पुराणामध्ये अंतिम प्रेषितांच्या आगमनाबाबत पूर्वसूचना मिळते. 'अंतिम ईश्वरदूत' या पंडित धर्मवीर उपाध्याय यांच्या सुप्रसिध्द पुस्तकात संग्राम पुराणाचा अनुवाद खालीलप्रमाणे आहे.

**यहां न पक्षपात कछु राखहुं।**
**वेद, पुराण, संत मत भाखहुं।।**

**संवत विक्रम दोऊ अनड़ ।**
**महाकोक नस चतुर्पतड़।**

**राजनिती भव प्रीति दिखावै।**
**आपन मत सबका समझावै।**

**सुरन चतुसुदर सतचारी।**
**तिनको वंश भयो अति भारी ।**

**तब तक सुंदर मद्दिकोया ।**
**बिना महामद पार न होया ।**

**तबसे मानहु जन्तु भिखारी ।**
**समरथ नाम एहि व्रतधारी ।**

**हर सुन्दर निर्माण न होई ।**
**तुलसी वचन सत्य सच होई ।**

(संग्राम पुराण, स्कंद १२, कांड ६ : पद्यानुवाद गोस्वामी तुलसीदास)

- पंडीत धर्मवीर उपाध्याय यांनी याचा अनुवाद अशाप्रकारे केला. तुलसीदास कथन करतात, मी कोणताही पक्षपात न करता संत, वेद आणि पुराणांची मते येथे उध्दृत करत आहे. सातव्या शताब्दी मध्ये चार सूर्यांच्या प्रकाशासोबत ते जन्माला येतील. प्रेमाने अथवा धाकाने ते आपले मत सर्वांना पटवून देतील. त्यांच्यासोबत चार अनुयायी असतील, ज्यांच्या साहाय्याने त्यांच्या अनुयायांची संख्या प्रचंड वाढेल. जोपर्यंत सुंदर वाणी (पवित्र कुरआन) धरतीवर असेल, तोपर्यंत हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्याविना मुक्ती मिळणार नाही. मनुष्य, पशु, कृमी-किटक या व्रतधारीचे नाव घेताच, ईश्वराचे भक्त बनतील. त्यांच्यानंतर त्यांच्यासारखा कोणीच जन्मणार नाही (कोणताही प्रेषित अवतरणार नाही).

संग्राम पुराणाची गणना जरी अर्वाचिन पुराणांमध्ये करण्यात येत असली तरीही याचा आधार प्राचीन हिंदू धर्मग्रंथ आहेत.

- उपरोक्त माहिती डॉ.एम.ए.श्रीवास्तव यांचे पुस्तक' हजरत मुहम्मद (स.अ.) और भारतीय धर्मग्रंथ' या पुस्तकातून संकलित करण्यात आली आहे.

- 'अंतिम ईश्वरदूत' हे पुस्तक १९२७ मध्ये नॅशनल प्रिंटींग प्रेस, दरियागंज, दिल्ली यांनी प्रकाशित केले होते.

**संत तुकाराम महाराज** (१५७७-१६५०) हे महाराष्ट्रातील एक महान संत आहेत. आपला जन्म देहू गावी झाला. यांनी गरीबांवर होत असलेल्या अत्याचाराविरूद्ध नेहमी लढा दिला. यांनी लिहिलेले अंभग प्रसिद्ध आहेत त्यातील काही सादर करत आहोत;

**अल्ला देवे अल्ला दिलावे ।**
**अल्ला दारू (दाता) अल्ला खिलावे ।**
**अल्लाबिगर नही कोय। अल्ला करे सोहि होय।१।**

भावार्थः- ईश्वर देणारा आणि देवविणारा आहे. ईश्वर जेऊ घालणारा आहे. ईश्वराच्या आज्ञेशिवाय काहीच होऊ शकत नाही. जे ईश्वर इच्छिल तेच होईल.

**अव्वल नाम अल्ला बडा लेते भूल न जाये ।**
**इलाम त्याकाल जमुपरताही तुंब बजाये ।१।**

**भावार्थ:-** सर्वप्रथम नाव ईश्वराचे आहे जो सर्वात महान आहे. त्याचे नाव घेण्यास विसरू नका. त्याचे तुंब वाजवित (म्हणजेच त्याच्या नावाचा जयघोष करत रहा) प्रार्थना करीत रहा.

**अल्ला एक तुं नब एक तुं ।**
**काटतें सिर पावों हाते नही जीव डराये ।२।**
**प्यार खुदाई प्यार खुदाई प्यार खुदाई ।**
**प्यार खुदाई बाबा जिकिर खुदाई । २।**

**भावार्थ :-** ईश्वर एकच आहे. त्याचा पैगंबर (हजरत मुहम्मद (स.)) ही एकच आहे. ईश्वर आणि त्याच्या पैगंबरांना सत्य मानल्यानंतर सत्याच्या मार्गावर चालताना शीर किंवा पाय कापण्याचे भय राहत नाही

**अल्ला करे सो होय बाबा करतारका सिरताज ।**
**जिकर करो अल्लाकी बाबा सबल्यां अंदर भेस ।**
**कहे तुका जो नर बुझे सो हि भया दरवेस । ३ ।**

**भावार्थः-** ईश्वराने जर इच्छिले तर कोणत्याही व्यक्तीचा आदर हा डोक्यातील मुकुटासमान होईल म्हणुन (या गोष्टीस समजा आणि) मनापासून ईश्वराची स्तुती करा. जो हे सत्य जाणुन घेईल तोच

ज्ञानी (दरवेश किंवा संत) ठरेल.

**बाट खाना अल्लाह कहना एकबारा तोही ।**
**अपना नफा देख कहे तुका सो ही सखा हाक अल्ला एक ।६ ।**

**भावार्थ:-** ईश्वराने जे काही तुम्हाला दिले आहे त्यातुन गरीबांना दान करा आणि एकदा का होईना ईश्वराचे स्मरण करा.

तुकाराम महाराज जो तुमचा मित्र आहे तो म्हणतोय की, ईश्वर एक आहे असे म्हटल्यानंतरच नफा आहे.

(संदर्भ : सार्थ श्री.तुकारामाची गाथा, संपादक, विष्णूबुवा जोग महाराज, पान नं ८९२,८९३,८९४)

## महामति प्राणनाथी यांचा उपदेश

वैष्णव पंथामध्ये प्राणनाथी हा एक महत्त्वाचा सांप्रदाय आहे, ज्याचे संस्थापक महामति प्राणीनाथ होत. यांनी एकेश्वरत्व आणि निराकार ईश्वराच्या भक्तीचे समर्थन केले. यांनी परमेश्वराच्या प्रेषितांचे देखील समर्थन केले. यासंबंधी प्राणनाथी यांचे विचार खालीलप्रमाणे आहेत.

**कै बडे कहे पैगंबर,**
**पर एक महामद पर खतम ।**

(भावार्थ : धर्मग्रंथामध्ये अनेक प्रेषितांना मोठे म्हटले आहे. तथापि प्रेषितांची श्रृखंला हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्यापाशी येऊन पूर्ण झाली.)

**रसूल आवेगा तुमपर, ले मेरा फुरमान**
**आए मेरे अरस की, देखी सब पेहेचान ।**

(भावार्थ : परमेश्वर नमूद करतो, माझे प्रेषित हजरत मुहम्मद (स.अ.) तुमच्यापाशी माझा संदेश घेऊन येतील. हजरत मुहम्मद (स.अ.) हे माझ्या आदेशांना आणि माझ्या धर्माला अत्यंत बारकाईने जाणतात.)

(संदर्भ : मारफत सागर, पृ.१९, श्री.प्राणनाथ मिशन, नवी दिल्ली)

(हजरत मुहम्मद और भारतीय धर्मग्रंथ, डॉ. एम. ए. श्रीवास्तव)

## इति अल्लोपनिषदमधील श्लोक

**आदल्ला बुक मेककम**
**अल्लबूक निखादकम ।।४।।**

या श्लोकाचा अनुवाद करता आला नाही.

**अला यज्ञन हुत हुत्वा अल्ला सूर्य चंद्र सर्व नक्षत्रा ।५।**

(परमेश्वराची युगा-युगांपासून भक्ती आणि प्रार्थना करण्यात येत आहे. सूर्य, चंद्र आणि तारे, सारे काही परमेश्वराचीच निर्मिती आहे.)

**अल्लों ऋषीणां सर्व दिव्यां इन्द्रायपूर्व माया परमन्तरिक्षा ।६।**

(परमेश्वर, संतांचा (त्यास मानणा-यांचा) रक्षणकर्ता आहे. तो सर्वात महान आहे. परमेश्वर अनादि-अनंत आहे)

**अल्ल पृथिव्या अन्तक्ष्ङिं विश्वरूपम् ।७ ।**

(परमेश्वराच्या दिव्यत्वाची प्रचिती, पृथ्वी, आकाश, तारका आणि विश्वाकडे पाहून येते)

**इल्लांकबर इल्लांकबर इल्लां इल्लल्लेती इल्लला ।८।**

(परमेश्वर सर्वात महान आहे, त्याच्यासारखा कोणीही नाही)

**ओम अल्ला इल्लला अनदि ।**

(परमेश्वराची सुरूवातही नाही आणि अंतही नाही. प्रत्येक कुकर्मापासून दूर राहण्यासाठी आम्ही या परमेश्वराची प्रार्थना आणि भक्ती करतो)

**हे स्वरूपाय अथर्वण ष्यामा हुही जनान पशून सिध्दान।**

**जलवरान् अदृश्टं कुरू कुरू फट ।**

(हे परमेश्वरा, दूर्जन, गुन्हेगार आणि लोकांना पथभ्रष्ट करणा-या भोंदूंचा नाश कर आणि पाण्यातील हानिकारक किटाणूंपासून आमची रक्षा कर.)

**असुरसंहारिणी हुं ही अल्लो रसूल महमदकबरस्य अल्लो ।**

(परमेश्वर सैतानी प्रवृत्तीचा नाश करणार आहे आणि ह्यरञ्च मुहम्मद (स.अ.) परमेश्वराचे प्रेषित आहेत.)

**अल्लाम इल्लल्लेती इल्लल्ला ।**

(परमेश्वर सर्वशक्तीमान आहे, त्याच्यासारखा कोणीही नाही.) **(अल्लोपनिषद ४-१०)**

### संत तुकडोजी महाराज

यावली, महाराष्ट्रात (सन १९०९-१९६९) जन्मलेले तुकडोजी महाराज, एक महान अध्यात्मिक संत होते. त्यांच्या हिंदी आणि मराठीत ३००० हून अधिक रचना आहेत. संत तुकडोजी महाराजांच्या या महान योगदानामुळे राष्ट्रपती डॉ.राजेंद्रप्रसाद यांनी त्यांना राष्ट्रसंत ही उपाधी बहाल केली आहे. त्यांची एक मराठीतील रचना खाली देण्यात येत आहे.

**मुहम्मदाने केली प्रार्थना ।**
**विखुरला इस्लाम कराया शहाणा ।**

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी परिश्रम घेतले ज्यामुळे इस्लाम जगात पसरला आणि लोक जागृत (ज्ञानी) झाले.

**संघटीत केले त्याने स्वजना तया काळी । ९० ।**
**लोक प्रतिमापूजक नसावे ।**
**त्यांनी एका ईश्वरासि प्रार्थावे ।।**

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्या काळी लोकांना या शिक्षेवर संघटीत केले की मूर्तिपूजा करू नये आणि केवळ एकाच ईश्वराची उपासना करावी.

**हा मुहम्मदांचा उपदेश ।**
**नव्हे एकाच देशासाठी । ९ ।**

पैगंबर मुहम्मद (स.) यांचा हा उपदेश केवळ अरबवासीयांसाठी नसून संपूर्ण विश्वासाठी आहे.


(संदर्भः राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित ग्रामगीता)

### बायबलमध्ये हजरत मुहम्मद (स.अ.) यांचा उल्लेख

हजरत मुहम्मद (स.अ.) केवळ अरबांमध्ये धर्मप्रचारासाठी अथवा मुस्लिमांना मुक्ती देण्यासाठी अवतीर्ण झाले नसून समस्त मानवजातीच्या कल्याणासाठी परमेश्वराने त्यांना पाठवले होते. हेच तथ्य, हजरत इसा (अ.स.) यांनी बरनाबास बायबलमध्ये नमूद केले आहे.

### बरनाबास बायबल काय आहे?

सहा प्रकारचे बायबल आहेत. पहिल्या बायबलला 'ओल्ड टेस्टॅमेंट' म्हटले जाते, जे हजरत मूसा (अ.स.) यांच्यावर अवतरित झाले. हजरत इसा (अ.स.) यांच्या जन्माआधी 'Old Testament' अवतीर्ण झाल्यामुळे, हजरत इसा (अ.स.) यांच्याविषयी कोणताही उल्लेख यामध्ये नाही.




हजरत इसा (अ.स.) या धरतीवरून निघून गेल्यानंतर, ७० वर्षानंतर, किंबहुना त्यानंतर Mark, Matthuew, Luck आणि योहाना या चौघांनी हजरत इसा (अ.स.) यांची वेगवेगळी जीवनगाथा लिहिली, ज्याला बायबल म्हणण्यात येते. काही कालावधीनंतर या चार बायबलांचे एकत्रिकरण करण्यात येऊन त्यास 'New Testament' असे नाव देण्यात आले. या चारही बायबलमध्ये हजरत इसा (अ.स.) यांना परमेश्वराचा पुत्र बनविण्यात आले आहे. (परमेश्वर आम्हास क्षमा करो)

सहावे बायबल, हजरत इसा (अ.स.) यांचे अनुयायी, बरनाबास यांनी लिहिले आहे, ज्यामध्ये, केवळ एका परमेश्वराचा आणि हजरत इसा (अ.स.) परमेश्वराचे प्रेषित असल्याचे नमूद करण्यात आले आहे. हे खिश्चन धर्माच्या पूर्णतः विरूध्द होते, त्यामुळे इ.स. ३६७ मध्ये पोप Ahanasins, इ.स.३८२ मध्ये पोप Damasius आणि इ.४९५ मध्ये पोप Gelasius, या सर्वांनी याला Apocryphal (धर्मविरोधी) असे घोषित केले. ही घोषणा ढ्द्यऱ्द्ध मुहम्मद (स.अ.) यांच्या जन्माआधी ७५ वर्षे करण्यात आली आहे.

हे धर्मविरोधी पुस्तक घरामध्ये ठेवणे देखील पाप समजण्यात येत असे आणि पुस्तक बाळगणा-यास शिक्षा दिली जात असे. अशा परिस्थितीमुळे बरनाबास बायबल १७०० वर्षे लोकांच्या नजरेआड होते, १७०९ मध्ये याची

इटालियन भाषेतील प्रत अमॅस्टरडॅम येथील एका ग्रंथालयात मिळाली. १८ व्या शतकात स्पॅनिश भाषेतील आणखी एक प्रत मिडली येथे डॉ.मेहलमन यांना मिळाली. यानंतर मोठ्या प्रमाणात याचे भाषांतर, प्रचार आणि वितरण करण्यात आले. या बायबलमध्ये फक्त एका परमेश्वराची आराधना करण्याचा उपदेश आहे आणि हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या आगमनाची स्पष्ट भविष्यवाणी आहे. या बायबलमधील काही अध्याय खाली देण्यात येत आहेत.

**बरनाबास बायबल अध्याय नं.१२**

हजरत इसा (अ.स.) यांनी नमूद केले, आम्ही ईश्वराची प्रशंसा करतो, ज्याने सर्व महापुरूष (प्रेषित) आणि प्रेषितांचे मुकुटमणी, हजरत मुहम्मद (स.अ.) यांना सर्वांच्या आधी निर्माण केले, जेणेकरून त्या सर्वांना मानवजातीच्या कल्याणासाठी पाठवता येईल. (अध्याय १२, बरनाबास की बाईबल)

**बरनाबास बायबल अध्याय नं.३९**

- जेव्हा परमेश्वराने मनुष्याच्या (हजरत आदम (अ.स.)) यांच्या शरीरात आत्मा दाखल केला, तेव्हा देवदूत आनंदाने म्हणाले, "हे परमेश्वरा, तुझे पवित्र नाव खुप महान आहे" आणि जेव्हा हजरत आदम (अ.स.) उठून उभे राहिले, तेव्हा त्यांनी सूर्यासारखे एक तेजस्वी लिखाण पाहिले, ज्यामध्ये लिहिले होते "परमेश्वर एकच आहे आणि हजरत मुहम्मद (स.अ.) परमेश्वराचे प्रेषित आहेत". हजरत आदम (अ.स.) यांनी परमेश्वरास विचारले, "हे माझ्या निर्माणकर्त्या, मला या वाक्याचा अर्थ सांग, माझ्या आधी कोणी मनुष्य निर्माण केला आहेस काय?" परमेश्वराने उत्तर दिले, "हे आदम, तूच पहिला मनुष्य आहेस, ज्याची निर्मिती मी केली आहे आणि ज्यांचे नाव लिहिलेले तू पाहिले, ते भुतलावर ब-याच वर्षानंतर येणारे तुझे पुत्र आहेत, ते माझे प्रेषित असतील, त्यांच्या आगमनाबरोबर हे विश्व प्रकाशमान होईल. हे विश्व मी त्यांच्यासाठीच निर्माण केले आहे. त्यांचा आत्मा विश्व निर्माण करण्याआधी ६० हजार वर्षोपूर्वी निर्माण केला होता आणि माझ्या दिव्य खजिन्यामध्ये ठेवला होता."

**बरनाबास बायबल अध्याय नं.४४**

हजरत इसा (अ.स.) म्हणाले, प्रेषित हजरत मुहम्मद (स.अ.) परमेश्वराची शान आहे आणि ज्यांना ज्यांना परमेश्वराने निर्माण केले आहे, त्या सर्वांना मुक्ती प्रदान करतील. परमेश्वराने त्यांना बुध्दी, शक्ती, न्याय, सदाचार, धैर्य इत्यादी इतरांपेक्षा तिप्पट प्रदान केले आहे. तो सर्वात शुभ दिवस असेल, ज्या दिवशी त्यांचा जन्म होईल. जसा प्रत्येक प्रेषित त्यांना पहातो, त्याप्रमाणे मी त्यांना पाहिले आहे. कारण त्यांच्या आत्मापासूनच परमेश्वराने प्रत्येक प्रेषितास प्रेषिताचा दर्जा दिला आहे, त्यांना पाहताच माझा आत्मा अत्यंत संतुष्ट झाला आणि म्हणाला, "हे मुहम्मद, परमेश्वर तुम्हासोबत सदैव राहो आणि मला तुमच्या सेवेची संधी मिळो जेणेकरून मी एक मोठा प्रेषित आणि परमेश्वराचा प्रिय होऊ शकेन".

**बरनाबास बायबल अध्याय नं.९७/B**

हजरत इसा (अ.स.) यांना पुरोहितांनी विचारले, ते प्रेषित कोणत्या नावाने ओळखले जातील आणि त्यांच्या आगमनाचा कोणता संकेत आहे? हजरत इसा (अ.स.) यांनी उत्तर दिले, त्या प्रेषितांचे नाव, प्रशंसा योग्य असेल, कारण त्यांचे नामकरण स्वतः परमेश्वराने त्यांना निर्माण केले, तेव्हा केले होते आणि त्यांच्या आत्म्याला परमेश्वराने दिव्य खजिन्यामध्ये ठेवले होते.

त्यांना निर्माण केल्यानंतर परमेश्वराने म्हटले, "हे मुहम्मद प्रतिक्षा करा, मी तुझ्यासाठी

स्वर्ग, धरती आणि मोठ्या संख्येने प्राणी निर्माण करून त्यांची भेट देऊ इच्छितो. यामधील जे तुला शुभ मानतील ते स्वतः शुभ ठरतील आणि जे तुला नाकारतील, त्यांच्यावर प्रकोप होईल. मी तुला पृथ्वीवर पाठवेन तर सर्वांना मुक्ती देणारा बनवून पाठवेन. तुझी शिकवण एवढी सत्य असेल की, धरती, आकाश जागा सोडतील पण तुझी शिकवण कदापिही ढळणार नाही. अशा पवित्र अस्तित्वाचे नाव मुहम्मद आहे". तेव्हा हजरत इसा (अ.स.) यांच्या समवेत असणा-यांनी उंच स्वरात परमेश्वरास साकडे घातले. "हे परमेश्वरा, आमच्याकडे आपला प्रेषित पाठव. हजरत मुहम्मद (स.अ.) आपण मानवजातीच्या उध्दारासाठी त्वरीत अवतिर्ण व्हा".

**सारांश :**

महर्षी व्यास, ज्यांनी १७ पुराणे लिहिली, येशु ख्रिस्त, ज्यांच्या अनुयायांची संख्या जगामध्ये सगळ्यात जास्त आहे, त्यांनी हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे अनुयायी बनण्याची मनिषा व्यक्त केली आहे. हजरत मुहम्मद (स.अ.) यांचा जन्म या दोन्ही महान व्यक्तीनंतर झाल्यामुळे त्यांची इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. आम्हाला त्यांचे अनुयायी बनण्याचे सौभाग्य लाभले आहे, कारण आपण त्यांच्यानंतर जन्मलो आहोत. एवढी मोठी संधी लाभल्यानंतर आम्ही त्यांच्या शिकवणीस नाकारले तर ते आमचे मोठे दुर्भाग्य ठरेल.

हजरत मुहम्मद (स.अ.) आणि इस्लाम यांच्या बाबत अनेक बुध्दिजीवींनी आपले विचार व्यक्त केले आहेत, त्या सर्वांचा उल्लेख करणे येथे शक्य नाही. खालील पुस्तकात आपणांस याबाबत समग्र माहिती मिळू शकेल. सदर पुस्तक आमच्या www.freeeducation.co.in या वेबसाईटवर मोफत डाऊनलोड करू शकता.

१. संत, महात्मा, विचारवंत आणि इस्लाम, संदेश प्रकाशन, पुणे-०५

२. पैगम्बरे-इस्लाम गैर-मुस्लिमोंकी नजरमे, फरीद बुक डेपो, नवी दिल्ली.

या प्रकरणाची समाप्ती अथर्ववेद मधील खालील श्लोकाने करण्यात येत आहे.

इन्द्र क्रतुं न आ भर पिता पुत्रेभ्यो यथा।
शिक्षाणो अस्मिन् पुरूहूत यामनि जीवा ज्योतिर शीमहि । (अथर्ववेद १८:३:६७)

(भावार्थ : परमेश्वर आम्हांस सत्य मार्गाचे ज्ञान देवो, म्हणजे आम्ही सत्याकडे वाटचाल करू शकू.)

*********

## प्रकरण क्रमांक-६

# हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे आचरण कसे होते?

- "हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे आचरण कसे होते?" अशी विचारणा हजरत आएशा (रजि.) यांना करण्यात आली असता त्या उत्तरल्या "हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे आचरण पवित्र कुरआन होते." (हदिस : मुस्लिम)

  अर्थात मानवजातीस ज्याप्रमाणे आचरणाचा आदेश पवित्र कुरआनमध्ये दिला आहे, अगदी तंतोतंत त्याप्रमाणे हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे आचरण होते.

- हजरत मुहम्मद (स.अ.) आपले आचरण सर्वश्रेष्ठ आहे. (पवित्र कुरआन ६८-४) या शब्दात परमेश्वराने हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या आचरणाची प्रशंसा केली आहे.

- हजरत इमाम मालिक यांनी आपले पुस्तक 'मुअतता'यात नमूद केले आहे, ह.मुहम्मद (स.अ.) यांनी म्हटले "मानवजातीस सर्वश्रेष्ठ आचरणाची शिकवण देण्यासाठी मला प्रेषित बनवले आहे ".

**हजरत मुहम्मद (स.अ.) अत्यंत नम्र स्वभावाचे होते.**

- हजरत अनस (रजि.) नमूद करतात, मी स्वतः दहा वर्षे ह.मुहम्मद (स.अ.) यांची सेवा केली. या कालावधीमध्ये मला कधीही हजरत मुहम्मद (स.अ.) रागावले अथवा माझ्यावर नाराज झाले नाहीत. माझी चूक झाल्यास त्याबाबत अशी चूक का केली अशी विचारणा आपण कधीही केली नाही. मला एखादे काम करणे आवश्यक असताना मी ते न केल्यास आपण कधीही विचारले नाही की ते काम का केले नाही.

- हजरत आएशा (रजि.) नमूद करतात, हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी आपल्या स्वतःच्या हाताने कधीही कोणास मारले नाही, ना आपण कधी कोणा पत्नीस मारले, ना कोणत्या नोकरास मारले आणि ना कोणत्याही व्यक्तिस मारले. तथापि ईश्वराच्या आदेशाने युध्दामध्ये शत्रूस जरूर मारले. आपणास त्रास देणा-या कोणाचाही बदला आपण कधीही घेतला नाही. (मुस्लिम, जादेराह-३४६)

**हजरत मुहम्मद (स.अ.) यांची भाषा अत्यंत मधुर होती.**

- हजरत अब्दुल्ला बिन उमरू बिन आस (रजि.) नमुद करतात, हजरत मुहम्मद (स.अ.) रागीट नव्हते आणि अपशब्दांचा वापर आपण कधीच करत नसत. (बुखारी, मुस्लिम, जादेराह – ७४)

- हजरत मुहम्मद (स.अ.) बहुतांश वेळ स्तब्ध असत. (सूरह अल् सना)

- हजरत मुहम्मद (स.अ.) अशाप्रकारे संवाद साधत की श्रोता प्रत्येक शब्द मोजू शकेल अथवा लिहून घेऊ शकेल. (बुखारी, मुस्लिम, मारफुलहदिस, Vol-8, Page-238)

- हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी उच्चारलेले प्रत्येक वाक्य साहित्यिक दृष्टिकोनातून अप्रतिम आहे आणि आजही त्या वाक्यांचा पुनरूच्चार केला जातो. 'जामिउलकलाम' या पुस्तकामध्ये ह.मुहम्मद (स.अ.) यांची विधानं संग्रहित करण्यात आली आहेत.

**हजरत मुहम्मद (स.अ.) पराकोटीचे आत्मसंयमी होते.**

- एकदा एक खेडूत मदीना येथे आला आणि हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी जी शाल आपल्या शरीराभोवती लपेटलेली होती ती

एवढ्या जोरात त्याने ओढली की आपल्या मानेवर ओरखडे उमटले. यानंतर तो म्हणाला "हे मुहम्मद (स.अ.), परमेश्वराने जे तुम्हाला दिले आहे त्यामधील मला देखील काही तरी दया". त्याच्या या दुर्व्यवहारामुळे हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे सोबती अत्यंत क्रुध्द झाले, तथापी हा प्रसंग आपण अत्यंत संयमाने घेतला. आपण स्मितहास्य केले आणि आपल्या सोबत्यांना त्या खेडूतास धान्य देण्यास सांगितले. (बुखारी, मारूफूल हदिस, Vol-8, Page-232)

- एका गरीब मुस्लिम गृहस्थाची मदत करण्यासाठी हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी एका ज्यु व्यक्तीकडून काही पैसे उधार घेतले होते. तो जेव्हा पैसे मागण्यासाठी आला तेव्हा त्याला देण्यासाठी हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्यापाशी काहीच नव्हते. पैसे घेतल्याशिवाय माघारी जाणार नाही असे म्हणत त्याने मस्जिदमध्येच ठाण मांडले. मध्यान्हपूर्वी तो आला होता आणि दुस-या दिवसाच्या सकाळपर्यंत जो तेथेच बसून राहिला, हजरत मुहम्मद (स.अ.) त्याचे ऋणको असल्याने त्याच्या सोबतच मस्जिदमध्ये बसून राहिले. आपल्या सोबत्यांना त्याचे कर्ज चुकते करण्यापासून आपण मनाई केली. काही सोबती त्याला तेथून घालवून देऊ इच्छित होते, अशा प्रकारच्या कोणत्याही दुर्व्यवहारास आपण मनाई केली. त्या ज्यु व्यक्तिने त्याच्या धर्मग्रंथात अध्ययन केले होते की अंतिम प्रेषित अत्यंत संयमी आणि धैर्यवान असतील, जेव्हा त्याला याची प्रचिती आली तेव्हा तो म्हणाला आपण खरे प्रेषित आहात आणि माझे सारे धन आपल्या चरणी अर्पण करतो, त्याचा आपणास हवा त्याप्रमाणे विनीयोग करावा. (मिश्कात, मारूफूल हदिस, Vol-2, Page-109).

**हजरत मुहम्मद (स.अ.) आश्वासनाचे काटेकोरपणे पालन करत.**

- एका व्यवहारामध्ये हजरत मुहम्मद (स.अ.) आणि एक ज्यु व्यापारी अब्दुलाह बिन अबील हामा, यांनी एका विशिष्ट ठिकाणी भेटण्याचे ठरवले. निर्धारीत वेळेत ह.मुहम्मद (स.अ.) त्या ठिकाणी पोहोचले. तथापि त्या ज्यु व्यापा-याला याचे विस्मरण झाल्यामुळे तो पोहोचू शकला नाही. ठरावानुसार हजरत मुहम्मद (स.अ.) लागोपाठ तीन दिवस वेळेवर त्या ठिकाणी जात होते. तिस-या दिवशी त्याला जेव्हा आठवण झाली तेव्हा तो धावतपळत तेथे पोहोचला आणि जेव्हा आधीपासून हजरत मुहम्मद (स.अ.) त्याची प्रतिक्षा करत असल्याचे त्याला दिसून आले. खजिल होऊन त्याने क्षमायाचना केली, यावर हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी नाराजी प्रकट करताना एवढेच म्हणाले की मला तुम्ही खूप त्रास दिलात कारण गेले तीन दिवस मी तुमची वाट पाहात आहे. (शिफा पृ. ५६)

**मुस्लमेंतराबरोबर आपला व्यवहार**

- हजरत आस्मा बिन्ते अबू बक (रजि.) यांच्या मक्का निवासी माता ज्यांनी इस्लाम धर्म स्वीकारला नव्हता, आपल्या कन्येस भेटण्यासाठी मदीनेस आल्या. हजरत आसमा (रजि.) यांनी हजरत मुहम्मद (स.अ.) यांना विचारले की माझी आई मुस्लिम नाही तेव्हा मी त्यांच्याशी कसे वर्तन करावे? हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी उत्तर दिले, उत्तम वर्तन करा, जसा एक मुलगी आपल्या आई बरोबर करते. केवळ इस्लाम विरूध्द त्यांनी काही सांगितल्यास त्यावर अंमल करू नये. (बुखारी, मुस्लिम, मुन्तखब अबवाब, Vol-1, Page-981)

- हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी नमूद केले आहे, एखाद्या मुस्लिम सत्ताधा-याने मुस्लिमेतरावर अन्याय केल्यास प्रलयदिनी परमेश्वराच्या दरबारात त्या मुस्लिमेतराकडून सत्ताधारी मुस्लिमाविरूध्द मी स्वतः खटला

लढवेन. (अबू दाउद, सफिना निजात १५१ )

- हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी म्हटले आहे, इतर समाजाचा कोणी आदरणीय व्यक्ती तुम्हाला भेटण्यास आल्यास त्याचा यथोचित आदर सत्कार करा. (जामिउल कलाम)

- हजरत आएशा (रजि.) नमूद करतात, एके दिवशी एक ज्यु गृहस्थ आपणांस भेटण्यास आले. हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी अत्यंत आत्मीयतेने त्यांच्याशी वार्तालाप केला. ते गेल्यानंतर आपण म्हणालात, हा गृहस्थ सज्ज्न नव्हता. यावर हजरत आएशा (रजि.) यांनी आश्चर्याने विचारले, मग आपण त्यांच्याशी एवढ्या आत्मियतेने संवाद का साधला? हजरत मुहम्मद (स.अ.) उत्तरले परमेश्वरासमीप ती व्यक्ती अत्यंत निंदनीय आहे जिच्या दुर्व्यवहारामुळे लोक तिच्यापासून अंतर ठेऊन वागतात आणि मी अशी व्यक्ती बनू इच्छित नाही. (तिर्मीजी, बैहकी)

- हजरत मुहम्मद (स.अ.) आपल्या घरून काबा शरीफमध्ये नमाज पडण्यास जात, त्या वाटेवर एक वृध्दा राहत असे जी आपणावर केरकचरा नेमाने टाकत असे. काही दिवस आपणावर वृध्देच्या घरातून कचरा टाकण्यात आला नाही, आपण याचे कारण जाणून घेतले असता, ती वृध्दा आजारी असून बिछान्यावर पडून असल्याचे समजले. हजरत मुहम्मद (स.अ.) तिच्या प्रकृतीची विचारणा करण्यासाठी तिच्या घरी पोहोचले. हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या या सौहार्दपूर्ण स्वभावामुळे ती वृध्दा प्रभावित झाली आणि तिने इस्लाम धर्म स्वीकारला.

**ह.मुहम्मद (स.अ.) सनातनी नव्हते.**

- हजरत आएशा (रजि.) नमूद करतात, हजरत मुहम्मद (स.अ.) नेहमीच आपल्या अनुयायांचे जीवन सुलभतेने व्यतीत व्हावे यासाठी प्रयत्नशील असत. यामुळे जेव्हा दोन पर्यायांमधून एकाची निवड करावयाची झाल्यास, आपण गुन्हा अथवा चूक होणार नसल्यास, दोहोंपैकी जो सोपा आणि सुलभ पर्याय आहे, तोच पसंत करत. (बुखारी, हदिसे नबवी)

- हजरत आएशा (रजि.) नमूद करतात ह.मुहम्मद (स.अ.) माझ्या कक्षामध्ये दाखल झाले त्यावेळेस एक महिला माझ्यासोबत तिथे उपस्थित होत्या. हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी त्या कोण आहेत अशी विचारणा केली तेव्हा मी उत्तरले, या त्याच आहेत ज्यांची नमाज अत्यंत प्रसिध्द आहे. त्या महिला साधारण व्यक्तिपेक्षा कसोशीने जास्त नमाज पढत असत. यावर हजरत मुहम्मद (स.अ.) म्हणाले असे करू नका, तुम्ही तेवढेच करा जेवढे तुम्ही सुलभतेने करू शकता, कारण तुम्हाला पुण्य देण्यापासून परमेश्वर कंटाळणार नाही पण तुम्ही नमाज पढण्यास कंटाळाल, परमेश्वरास तेच पसंत आहे जे तुम्ही सहजतेने आणि सातत्याने करू शकता. (बुखारी, मुस्लिम)

  अर्थात आपण नेहमीच सुलभता आणि मध्यम मार्ग (Middle Path) पसंत करत.

- हजरत मुहम्मद (स.अ.) नमूद करतात, जे स्वतः धर्मास कठीण बनवतात त्यांचा विनाश होवो. (मुस्लिम, रियाजूल स्वालेहीन)

**हजरत मुहम्मद (स.अ.) आणि त्यांचे कुटुंबिय अत्यंत दानशूर होते.**

- हजरत सोहेल (रजि.) नमूद करतात, हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी स्वतःच्या शरीराभोवती लपेटलेली चादर आपल्या एका अनुयायाने मागणी करताच आपण त्यांना ती चादर काढून दिली. हजरत मुहम्मद (स.अ.) तेथून गेल्यानंतर उपस्थित असणा-यांनी त्या अनुयायास नाराजीने विचारणा केली, हजरत मुहम्मद (स.अ.) यांना चादरीची आवश्यकता असताना तुम्ही ती चादर का मागितली? यावर ते अनुयायी उत्तरले, ही पवित्र चादर

माझ्या कफनसाठी मागून घेतली आहे. (सही बुखारी, मारूफूल हदिस, Vol-2, Page-194 ).

- मदीना आणि खैबर या परिसरामध्ये हजरत मुहम्मद (स.अ.) यांची काही शेतजमीन होती, ज्यापासून आपणास वर्षभर पुरेल एवढ्या धान्याचे उत्पादन होत असे. तथापि आपण आणि आपल्या पत्नी एवढ्या दानशूर होत्या की ते सर्व धान्य गरीब याचकांना देत आणि स्वतः खजूर आणि पाण्यावर गुजराण करत.

**आपण कोणत्याही याचकास विन्मुख पाठवत नसत.**

- एखाद्या गरिबाने आपणाकडे काही मागितल्यास आणि आपणाकडे देण्यासाठी काही नसल्यास इतराकडून उसने घेऊन त्याची गरज भागवत. हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे जेव्हा निर्वाण झाले तेव्हा आपले चिलखत याच कारणासाठी एका ज्यु व्यक्तीकडे गहाण होते.

**हजरत मुहम्मद (स.अ.) अत्यंत न्यायप्रिय होते.**

- हजरत मुहम्मद (स.अ.) अत्यंत न्यायी होते, त्यामुळे ज्यु आणि मुस्लिमेतर देखील आपपसांतील तंट्यांचा न्यायपूर्ण निवाडा होण्यासाठी आपणाकडे घेऊन येत. अनेकवेळा आपण मुस्लिमाविरूध्द निष्पक्षपणे तंट्यांचे निर्णय दिले आहेत. अशाच एका निवाड्याचे वर्णन पवित्र कुरआन मध्ये आहे. (पवित्र कुरआन ४:६२).

प्राचीन काळी स्थापित शासनव्यवस्था आणि कारागृह नव्हते. यामुळे इस्लामी शरियतमध्ये गुन्हा सिद्ध होताच विनाविलंब शिक्षा देण्याचे प्रयोजन आहे. इस्लामिक कायद्यानुसार चोरीच्या अपराधास हात कलम करण्याची तरतूद आहे. एकदा एका प्रतिष्ठित घराण्यातील फातिमा नामक महिलेने चोरी केली आणि ती पकडली गेली. न्यायालयाने कायद्याप्रमाणे तिचे हात कलम करण्याची शिक्षा सुनावली. या प्रसंगी काहींनी हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्याकडे ती महिला प्रतिष्ठित घराण्यातील असल्यामुळे माफी देण्याची शिफारस केली. या आर्जवामुळे हजरत मुहम्मद (स.अ.) नाराज झाले आणि म्हणाले असे कृत्य माझी मुलगी फातिमा (रजि.) व्दारे घडले असते तरीही हीच शिक्षा देण्यात आली असती.

**हजरत मुहम्मद (स.अ.) अत्यंत शूर होते.**

- मक्का शहरामध्ये 'रकाना' नावाचा एक खूप मोठा मल्ल होता. त्याने हजरत मुहम्मद (स.अ.) यांना आव्हान दिले आणि म्हणाला जर आपण मला पराभूत केले तर मी इस्लामचा स्वीकार करेन. हा प्रस्ताव हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या स्वभावाच्या विपरित होता. तथापि वारंवार आपणांस विचारणा करून मजबूर केल्यामुळे त्याला आपण तीन वेळेस पराभूत केले. (सिरते मुज्तबा).

- हजरत बरा बिन आजीब (रजि.) नमूद करतात, युध्दात आपण सर्वात पुढे रहात. आपणावर युध्दात सर्वात जास्त हल्ले होत. त्यामुळे जे धुरंधर योध्दे होते तेच आपणा समीप रहात. आणि घनघोर युद्धात कोणत्याही जखमी मुस्लिमास वाचवण्यासाठी हजरत मुहम्मद (स.अ.) यांचा आडोसा घेई.

- हुनैन येथील युध्दामध्ये शत्रूसेनेने बाणांचा अक्षरशः वर्षाव केला तेव्हा मुस्लिम सेनेस बचावासाठी थोडेसे मागे हटावे लागले. अशा गंभीर परिस्थितीमध्ये हजरत मुहम्मद (स.अ.) आणि त्यांचे आठ-दहा अनुयायी मागे न हटता चाल करून पुढेच जात होते. हजरत अब्बास (रजि.) यांनी उमरा यात्रा करणा-या चौदाशे यात्रेकरूंना आवाहन करून प्रोत्साहीत केले तेव्हा ते माघारी फिरल्याने मुस्लिम सेना स्थिरावली आणि विजयी झाली. (सीरते मुज्तबा).

- एकदा मदीना शहराच्या एका दिशेने अत्यंत मोठा आवाज आला तेव्हा लोकांना वाटले की शत्रूने हल्ला केला आहे. युध्द सज्ज होऊन लोक आपल्या घराबाहेर पडण्यापूर्वीच हजरत मुहम्मद (स.अ.) शस्त्रसज्ज होऊन हजरत तलहा (रजि.) यांच्या घोड्यावर स्वार झाले, त्या दिशेला व्यवस्थित पाहणी करून परतले आणि चिंतेचे कोणतेही कारण नाही असे सांगून लोकांना निश्चिंत केले.

**हजरत मुहम्मद (स.अ.) अन्नाचा खूप आदर करीत.**

- हजरत अबू हुरैरा (रजि.) नमूद करतात, आपल्या समोर जेव्हा भोजन ठेवण्यात येत असे, जर ते आपल्या पसंतिचे असेल तर आपण त्याचा आस्वाद घेत अन्यथा शांतपणे ताटावरून उठत, अन्नास कधीही नावे ठेवत नसत. (बुखारी)

- हजरत आएशा (रजि.) नमूद करतात, एकदा हजरत मुहम्मद (स.अ.) माझ्या कक्षात आल्यानंतर जमिनीवर पडलेला रोटीचा तुकडा पाहिला, तो आपण उचलला, साफ करून खाल्ला आणि म्हणाले, हजरत आएशा (रजि.) चांगल्या गोष्टींचा आदर करा (ईश्वराच्या या प्रसादाचे अवमुल्यन केल्यास) त्या (चांगल्या गोष्टी) ज्या समुदायास लाभल्या आहेत, त्यांच्यापासून गेल्यानंतर पुनःश्च परत मिळत नाहीत. (इब्ने माजा) (अर्थात अन्नाची अवहेलना केल्यामुळे जे निर्धन झाले आहेत, पुनःश्च ते सधन बनले नाहीत.)

**हजरत मुहम्मद (स.अ.) हसमुख होते.**

- पवित्र कुरआन मध्ये परमेश्वर म्हणतो, मी मानवासाठी सुलभता इच्छितो, कठिणता नाही. (पवित्र कुरआन २:१८५)

- हजरत मुहम्मद (स.अ.) अत्यंत प्रसन्न व्यक्तिमत्वाचे आणि हसतमुख होते. हजरत अबू हुरैरा (रजि.) नमूद करतात, काही जणांनी आपणास आश्चर्याने विचारणा केली, आपण परमेश्वराचे प्रेषित असूनसुध्दा नर्मविनोद कसे काय करता? यावर प्रेषित उत्तरले, होय, पण "मी कोणतेही गैरशब्द अथवा धर्माविरूध्द कोणतीही गोष्ट करत नाही." (तिरमिजी, जादे राह ३२०)

- हजरत आएशा (रजि) म्हणतात की, मी आपणास कधी इतक्या जोरात हसताना पाहिले नाही की, त्यांच्या मुखातील अंतर्भाग दिसू लागेल. (बुखारी, मुस्लिम)

- हजरत अब्दुल्ला बिन हारिस (रजि.) नमूद करतात, त्यांनी हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्यापेक्षा कोणासही जास्त स्मित करताना पाहिले नाही. (तिरमीजी, मुन्तखब अबवाब ८२७)

- हजरत अबू जर (रजि.) हे हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे वचन प्रस्तुत करतात की, आपल्या बंधूंना प्रेमाने भेटताना केलेले स्मित हे दान देण्यासारखे पुण्य कर्म आहे. (तिरमीजी १९५६, हदीसे नबवी ११०)

- हजरत मुहम्मद (स.अ.) केवळ स्मितहास्य करत.

**हजरत मुहम्मद (स.अ.) स्वतःचा आदर सत्कार करवून घेण्याचे इच्छुक नव्हते.**

- हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे सोबती इराक, इजिप्त येथे व्यापारासाठी जात. तेथे त्यांनी धर्मगुरूंचा आदर करण्यासाठी तेथील जनतेला 'सजदा' (डोके झुकवून नमन करणे) करताना पाहिले. आपल्या सोबत्यांनी सुध्दा आदरासाठी आपणास 'सजदा' करण्याची परवानगी मागितली. तेव्हा आपण याचा कसोशीने विरोध केला आणि परवानगी नाकारली.

आपले आगमन झाल्यानंतर आदरासाठी लोकांनी उभे राहणे हजरत मुहम्मद (स.अ.) यांना पसंत नव्हते. (तिरमीजी, मुन्तखब अबवाब

Vol-1, No-778)

- हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी विधान केले, जो व्यक्ती आपला आदर करवून घेऊ इच्छितो त्याचे ठिकाण नरकात आहे. (तिरमीजी)

- हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी पक्की कबर बांधण्यास आणि कोणाच्याही कबरीस 'सजदा' करण्यास मनाई केली आहे.

  हजरत मुहम्मद (स.अ.) नमूद करतात, एका मर्यादेपेक्षा जास्त माझी प्रशंसा करू नका, जशी ख्रिश्चनांनी हजरत ईसा (अ.स.) यांची केली आहे. (हजरत ईसा (अ.स.) यांना ख्रिस्ती लोकांनी परमेश्वराचा पुत्र बनवले). मी परमेश्वराचा बंदा (दास) आहे, मला परमेश्वराचा बंदा अथवा पैगंबर (प्रेषित) असे म्हणा. (बुखारी, मुस्लिम, मुन्तखब अबवाब, Vol-1, No-965)

**हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी समाजामध्ये प्रेम आणि शांती रूजविली.**

- परमेश्वराने पवित्र कुरआनमध्ये परमेश्वरास मानणा-यांना उद्देशून म्हटले आहे, **हे लोकहो, ज्यांनी श्रद्धा ठेवली आहे, पुरुषांनी दुसऱ्या पुरुषांची टिंगल उडवू नये, शक्य आहे की ते त्यांच्यापेक्षा उत्तम असतील, आणि स्त्रियांनीसुद्धा दुसऱ्या स्त्रियांची टिंगल उडवू नये, शक्य आहे की त्या त्यांच्यापेक्षा उत्तम असतील. आपापसांत एकमेकांना टोमणे मारू नका आणि एकमेकांचा उल्लेख वाईट नावानेही करू नका. श्रद्धा ठेवल्यानंतर दुराचारांत नाव मिळविणे फार वाईट गोष्ट आहे. जे लोक या वर्तनापासून परावृत्त होत नसतील ते अत्याचारी होत.** (सुरे हुजूरात, आयत क्र.११)

- हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी कोणाचीही निंदा आपणाजवळ करण्यास सक्त मनाई केली होती. आपण म्हणालात, माझ्या सोबत्यांसाठी माझे अंतःकरण एकदम स्वच्छ रहावे.

- हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी इतरांचे दोष जाणून घेण्याच्या प्रयत्नास देखील सक्त मनाई केली आहे. (सुरे हुजुरात, आयत क्र.११)

- हजरत मुहम्मद (स.अ.) म्हणाले, प्रत्येक व्यक्तीचे जीवन, त्याचे धन आणि आत्मसन्मान इतरांसाठी सन्माननीयच आहे. प्रत्येक व्यक्तीने इतर प्रत्येकाच्या जीवनाचे तसेच धनाचे रक्षण करणे अनिवार्य आहे आणि कोणीही कोणास अपमानित करू नये. (खुत्बा हज्जतुल विदा)

- हजरत आएशा (रजि.) नमूद करतात जेव्हा एखाद्याचे दोष हजरत मुहम्मद (स.अ.) यांना ज्ञात होत, आपण त्याला सर्वांसमोर रागावत नसत. त्याचे नाव न घेता मशिदीमध्ये त्या दोषापासून दूर राहण्याबाबत सर्वांना उपदेश करत जेणेकरून ती व्यक्ती त्या दोषापासून स्वतःस मुक्त करून घेऊ शकेल (शिफा ५२)

- हजरत हन्जला (रजि.) नमूद करतात, प्रत्येक व्यक्तीला उमद्या आणि आवडत्या नावाने संबोधण्यात यावे अशी हजरत मुहम्मद (स.अ.) यांची नेहमीच इच्छा असे. (आदाबुल मुफरद)

- समाजामध्ये प्रेम आणि सद्भावना वृध्दिंगत करण्यासाठी हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी एक दुस-यास सलाम करण्याचा आदेश प्रत्येक व्यक्तीस दिला आहे. (मुस्लिम, मुन्तखब अबवाब Vol-2, No-391)

- हजरत मुहम्मद (स.अ.) महिलांना आणि मुलांना देखील सलाम करत. (अहमद, मुन्तखब अबवाब Vol-1, No-402)

- हजरत मुहम्मद (स.अ.) स्वतः प्रथम सलाम करत आणि म्हणत जो प्रथम सलाम करतो तो गर्विष्ठ नसतो. (बैहकी, मुस्लिम मुन्तखब अबवाब, Vol-1, No-403)

### हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या प्रति आम्हा सर्वांचे कर्तव्य

- हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी स्वतःचे आणि आपल्या कुटुंबीयांचे पूर्ण जीवन इश्वराचा खरा संदेश आम्हा पर्यंत पोहोचवण्यासाठी कुर्बान केले आहे. याच्या मोबदल्यात हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी आम्हाकडून स्वतःसाठी आणि आपल्या परिवारासाठी कशाचीही अपेक्षा केली नाही. निश्चितच आम्ही, हजरत मुहम्मद (स.अ.) यांना आणि आपल्या कुटुंबीयांना काहीच देऊ शकत नाही. यासाठी जेव्हा जेव्हा आम्ही हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे नाव ऐकू, तेव्हा तेव्हा, ईश्वराजवळ हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्यासाठी प्रार्थना करावी, "हे ईश्वरा, हजरत मुहम्मद (स.अ.) आणि त्यांच्या कुटुंबीयांवर कृपा कर".

- हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्यासाठी अशा प्रकारे करण्यात येणा-या प्रार्थनेला अरबी भाषेत ' दरूद 'असे म्हणतात.

- परमेश्वराने पवित्र कुरआनमध्ये आम्हा सर्वांना हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्यासाठी 'दरूद' पाठवण्याचा आदेश दिला आहे. (पवित्र कुरआन ३३:५६).

- देवदूतांचे सरदार हजरत जिब्रील (अ.स.) यांनी, हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे आभार न मानणा-या आणि आपले नाव ऐकल्यानंतर प्रार्थना न करता म्हणजेच दरूदचा उच्चार न करता शांत राहणा-या कृतघ्न व्यक्तीस शाप दिला आहे.

- हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्यासाठी अत्यंत छोटी प्रार्थना "सल्लल्लाहु अलैहीवस्सल्लम" अशी आहे. याचा अर्थ, परमेश्वर हजरत मुहम्मद (स.अ.) आणि आपले कुटुंबीय यांच्यावर कृपा करो, असा आहे.

- सबब हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे नाव ऐकताक्षणी दरूदचा उच्चार करण्यात यावा.

- परमेश्वराने पवित्र कुरआनमध्ये हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्यासोबत संवाद साधताना अत्यंत आदरपूर्वक आणि नम्र स्वरात संवाद साधण्याचा आदेश दिला आहे. अन्यथा सत्कर्म नष्ट करण्यात येतील. (पवित्र कुरआन ४९:२-३)

  यामुळे आजदेखील आम्ही हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे नाव अत्यंत आदरपूर्वक घेणे आवश्यक आहे.

### हजरत मुहम्मद (स.अ.) सर्वश्रेष्ठ शिक्षक होते.

- मायकेल हार्ट यांचे विश्वप्रसिध्द पुस्तक "The 100 most influencial persons" मध्ये लेखकाने स्वतः ख्रिश्चन धर्मीय असताना विश्वातील सर्वात प्रभावशाली व्यक्तीमध्ये हजरत मुहम्मद (स.अ.) यांना अग्रक्रम दिला आहे. त्यांच्या धार्मिक श्रध्दानुसार हजरत इसा (अ.स.) यांना ते प्राथमिकता देऊ शकले असते, तथापि असे न करण्याचे कारण देताना नमूद करतात, हजरत मुहम्मद (स.अ.), धन, सत्ता, सेना इ. काहीही जवळ नसताना केवळ तेवीस वर्षाच्या संघर्षमय जीवनात मानवजातीवर जो असीम प्रभाव आपणाव्दारे पडला आहे तो स्तिमित करणारा आहे.

- हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या शब्दामध्ये मोठा प्रभाव होता. लोक हजरत मुहम्मद (स.अ.) यांचा उपदेश आणि आदेश ऐकताक्षणी लगोलग अंमलात आणत कारण आपण स्वतः त्या उपदेशानुसार तंतोतंत आचरण करत. हजरत मुहम्मद (स.अ.) यांच्या वक्तव्यामध्ये आणि आचरणामध्ये काडीचेही अंतर नसल्याने आपला उपदेश अत्यंत परिणामकारक होता, संदर्भासाठी खाली काही उदाहरणे दिली आहेत.

- हजरत मुहम्मद (स.अ.) दिवसात पाच

वेळेस नमाज पढण्याचा उपदेश करत तथापि आपण स्वतः आठ वेळेस नमाज पढत असत. तहज्जुद, इशराक आणि चाश्त या तीन अतिरिक्त नमाज आपण पढत.

- इतरांना दान देण्याचा उपदेश करताना स्वतःसाठी काही शिल्लक ठेवण्याचा आपण सल्ला देत. तथापि आपण स्वतःजवळ असणारे सर्व काही दान करत.
- रमजान या महिन्यामध्ये उपवास करण्याचा उपदेश आपण करत. तथापि आपण स्वतः रमजान या महिन्यासोबतच शाबान या महिन्याचे उपवास करत. तसेच प्रत्येक महिन्यात तीन दिवस हमखास उपवास करत.
- मदीना येथील मशिदीच्या बांधकामात आपण स्वतः दगड-माती वाहिली आहे.
- बदर येथील प्रथम युध्दास जात असताना मुस्लिम सेनेकडे वाहतुकीच्या उंटांची कमतरता असल्यामुळे तीन व्यक्तीमध्ये एका उंटाची तजवीज करण्यात आली होती. एक व्यक्ती क्रमाक्रमाने उंटावर बसत असे आणि इतर दोघे सोबत चालत असत. हजरत मुहम्मद (स.अ.) या प्रवासामध्ये इतराप्रमाणेच क्रमाने उंटावर स्वार होत आणि नंतर पायी चालत. आपल्या सोबत्यांच्या आग्रहानंतरही आपण एकट्याने उंटावर स्वार होऊन संपूर्ण प्रवास करणे पसंत केले नाही.(मिश्कात, जादे राह Page-235 )
- सन ६२७ मध्ये लढलेल्या खंदकच्या युध्दात, हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी सामान्य मुस्लिमाप्रमाणे स्वतः खंदक खणली. हे युध्द एक महिना निरंतर लढले गेले. या कालावधीमध्ये अन्न आणि पाण्याचा गंभीर तुटवडा होता. सामान्य मुस्लिम सैन्याप्रमाणे आपण स्वतः उपाशी रहात.
- हजरत मुहम्मद (स.अ.) यांनी जो मानवजातीस जो उपदेश केला प्रथम तो स्वतःच्या आचरणामध्ये आणून लोकांपुढे एक आदर्श ठेवला आहे.

**हजरत मुहम्मद (स.अ.) यांचे व्यक्तिमत्व कसे होते**

- हजरत मुहम्मद (स.अ.) जास्त उंचही नव्हते आणि ठेंगणेही नव्हते. तथापि आपण आपल्या सोबत्यांमध्ये सर्वात उंच असल्याचे दिसून येत असे. (तिरमीजी, Vol-1)
- हजरत मुहम्मद (स.अ.) गहूवर्णीय होते.
- ह.अबू हुरैरा (रजि.) विषद करतात, ह.मुहम्मद (स.अ.) यांचा वर्ण गौरवर्णा समीप होता (आपला वर्ण अगदी श्वेतवर्णीय नव्हता). (मस्नद इमाम हुमद नं ९४४)
- ह.अली (रजि.) नमूद करतात ह.मुहम्मद (स.अ.) यांचा वर्ण लाल आणि गो-या रंगाचा सुदर मिलाफ होता. (मस्नद इमाम हुमद नं ९४४)
- ह.मुहम्मद (स.अ.) यांचे केस अगदी सरळ नव्हते किंवा अगदी कुरळे नव्हते. तथापि आपले केस थोडेसे कुरळे होते आणि कानाच्या पाळीपर्यंत आपण केस राखत, आपण केसांना तेल लावत. (तिरमीजी)
- ६३ वर्षांच्या आयुष्यात ह.मुहम्मद (स.अ.) यांचे केवळ वीस केस पांढरे झाले होते.
- ह.मुहम्मद (स.अ.) यांचे डोळे मोठे होते. आपल्या भुवया लांब होत्या. आपण डोळ्यात सुरमा लावत. (तिरमीजी)
- ह.मुहम्मद (स.अ.) यांचे हात आणि पाय भरीव आणि रेशमाप्रमाणे मृदू होते. (तिरमीजी)
- ह.मुहम्मद (स.अ.) यांचा चेहरा एकदम गोल नव्हता. तथापि थोडाफार गोलाकार होता. (तिरमीजी)
- ह.मुहम्मद (स.अ.) यांची छाती रूंद आणि खांदे भरीव होते. आपले पोट छातीबरोबर होते. (पोट सुटलेले नव्हते)

## प्रकरण-७

# ह.मुहम्मद (स.अ.) यांचा उपदेश

- हजरत मुहम्मद (स.) यांनी जी शिकवण दिली आणि त्यांनी जी जीवनशैली स्विकारली होती त्या सर्वांचा पाठपूरावा विद्वानांनी केला होता आणि त्या सर्व गोष्टींचा उल्लेख त्यांनी आपल्या पुस्तकांत जशाच्या तसा केला आहे त्यांनी जी पुस्तके लिहिली ती त्या विद्वानांच्या नावाने प्रसिद्ध आहेत. जसे की बुखारी, मुस्लिम, इब्ने माजा, तिरमिजी, अबू दाऊद इत्यादि। हजरत मुहम्मद यांनी सांगितलेली शिकवणीला हदीस म्हटले जाते. आम्ही येथे वाचकांसाठी हदीसचा सारांश आणि भावार्थ देत आहोत आणि जिथून ही हदीस आम्ही घेतली आहे त्या पुस्तकांचा संदर्भ देत आहोत.

**वैयक्तिक जीवनासाठी उपदेश**

- विवाह करणे शक्य असल्यास युवकांनी विनाविलंब विवाह करावा. विवाह नजर खाली ठेवतो आणि व्यभिचार व अश्लितेपासून बचाव करतो. (इब्ने माजा Vol-2, Page 20)
- ज्या विवाहामध्ये खर्च कमी करण्यात येतो तो विवाह शुभविवाह आहे. (मस्नद अहमद, २४५२९)
- जो जाणून-बुजून ज्या प्रकारची जीवनशैली आत्मसात करतो त्यास त्याच जीवनशैलीमध्ये मृत्यू येईल. (तिर्मिजी).

(एखादी व्यक्ती दुराचारी जीवन व्यतीत करीत असेल आणि वार्धक्यामध्ये सदाचारी होण्याचा विचार करत असेल तर असे मुळीच होणार नाही. त्या व्यक्तीचा मृत्यू दुराचार करता-करता होईल. यास्तव दुराचारापासून दूर जाण्यास मुळीच विलंब करू नये.)

- पुरूषांनी आपली नजर झुकलेली ठेवणे आवश्यक आहे. (परस्त्रीवर कटाक्ष टाकू नये) (पवित्र कुरआन २४:३०)
- ऐशआरामी जीवनापासून स्वतःस दूर ठेवा, कारण ईश्वराचे आवडते भक्त, ऐशआरामी जीवन व्यतीत करत नाहीत. (मुन्तखब अबवाब Vol-2, Page 1317).
- नशा येणा-या अथवा बुध्दी भ्रष्ट करणा-या पदार्थांचे सेवन मुळीच करू नये. (अबु दाऊद, ३६८६).
- नेहमीच खरे बोला, यामुळे तुमचे कितीही नुकसान झाले तरीही बेहत्तर, कारण खरे बोलण्यातच जीवनाचे साफल्य आहे. (कन्जुल आमाल, ६९५६)
- ईश्वराचे नाव घेऊन एकत्र बसून भोजन करा, यामध्ये तुम्हासाठी समृध्दी आहे. (अबू दाऊद, ३७६४)
- सगळ्यात मोठा धोका जिभेमार्फत आहे. (तिर्मिजी, २४१०)

(अपशब्दांचा आणि कटु भाषेचा वापर केल्यामुळे अधिकतर लोक नरकात जातील यास्तव शब्दांचा वापर अत्यंत काटेकोरपणे करावा.)

- ऐकीव गोष्ट पारखण्याआधीच इतरांना कथन करणारी व्यक्ती खोटी आणि अविश्वसनीय असते. (मुस्लिम-८)
- पाप म्हणजे अशी गोष्ट जी स्वतःच्या मनाला बोचते आणि या गोष्टीची जाणीव इतरांस होऊ नये असे वाटते. (मुस्लिम-६६८०)
- जी व्यक्ती सत्य ज्ञान प्राप्तीच्या वाटेवर चालते, परमेश्वर अशा व्यक्तीचा स्वर्ग प्राप्तीचा मार्ग सुलभ करतो. (मुस्लिम-६८५३)

- तुम्हाला स्वतःसाठी जे पसंत आहे तेच इतरासाठी तुम्हाला पसंत असेल, तर तुम्ही खरेखुरे मुस्लिम बनाल. (मस्नद अहमद, तिर्मिजी, मारूफूल हदीस Vol-2, Page-148)

**सामाजिक जीवनाशी संबंधीत उपदेश**

- हे विश्व, ईश्वराचा परिवार आहे. जो मानवजातीची सेवा करतो त्याच्यावर परमेश्वर प्रेम करतो. (मिश्कात तर्जुमाने हदीस Vol-2, 239)

- परमेश्वर काही व्यक्तींना इतरांची सेवा करण्यासाठीच निर्माण करतो. इतरांना जेव्हा त्यांची आवश्यकता भासते, तेव्हा ते सर्व अशा व्यक्तीकडे धाव घेतात. जनतेची अशा प्रकारे सेवा करणा-यांना प्रलयदिनी कोणतीही चिंता असणार नाही. (तिबरानी कबीरः १३३३४ अब्दुल्लाह बिन उमर)

- ह.मुहम्मद (स.अ.) नमूद करतात, तुम्ही धरतीवर राहणा-यांवर प्रेम आणि दया करा. अशा व्यक्तीवर परमेश्वर सदोदित दया करेल. (अबू दाऊद तिर्मिजी)

- ज्या व्यक्तीचा शेजारी त्याच्यामुळे त्रस्त आहे, अशी व्यक्ती मुस्लिम होऊ शकत नाही. (बुखारी)

- ईश्वर, प्रेषित आणि तत्कालिन शासक यांच्या आदेशाचे पालन करा. (पवित्र कुरआन ४:५९)

  (अर्थात तत्कालिन शासकाचे आदेश जर धर्मविरोधी अथवा गैर असतील तर मानता येणार नाहीत).

- कोणतीही व्यक्ती निकटतम मित्राच्या आचरणाने प्रभावित होते यास्तव आपण कोणाबरोबर मैत्री करत आहोत हे पाहणे अत्यंत आवश्यक आहे. (अबू दाऊद, तिर्मिजी)

  (अर्थात दुष्ट आणि अपराध्यांसोबत मैत्री करू नये)

- जो समाज न्यायी नसेल त्या समाजामध्ये हिंसा मोठ्या प्रमाणात वाढेल. (मुअत्ता १६७०)

- तुमचे कर्म हेच तुमचे शासक आहेत. तुमचे कर्म ज्या प्रकारचे असतील त्याच प्रकारचे शासक तुमच्यावर राज्य करतील. (जवाहिरे हिकमत)

- सर्व जनता ही जणू कंगव्याच्या दाताप्रमाणे आहे. (जवाहिरे हिकमत) (अर्थात सर्व व्यक्ती समान आहेत, त्यांच्यामध्ये जात-पात यासारखा कोणताही भेदभाव नाही).

- लोकहो, ईश्वराची प्रार्थना कसोशीने करा. जेणेकरून परमेश्वर तुम्हास कोणत्याही अडचणीविना सुलभ आणि पवित्र जीवन देईल आणि परमेश्वर तुमचे हृदय व्यापक बनवेल आणि जर तुम्ही बेपर्वाई कराल तर परमेश्वर तुमची व्यस्तता आणि कठिणाई कमी करणार नाही. तसेच तुमची आर्थिक चणचण दूर करणार नाही. (इब्ने माजा ४१०, तिर्मिजी २४६६)

  (ईश्वराची भक्ती जे लोक करत नाहीत त्यांना कामामधून कधीच सवड मिळत नाही. तसेच सुबत्ता असताना देखील दानधर्म अथवा राजी खुशीने कधीच खर्च करू शकत नाहीत.)

- ह.मुहम्मद (स.अ.) नमूद करतात, "प्रेषितामध्ये मी अंतिम प्रेषित आहे. माझ्यानंतर प्रेषित येणार नाही आणि या युगानंतर मला अंतिम प्रेषित मानणा-यांना आणि एकाच ईश्वरास मानणा-यांनाच मुक्ती मिळेल." (मुस्लिम, मुन्तखब अबवाब Vol-1, Page 26)

- समुद्रामध्ये बोट बुडविल्यास, त्या बोटास लागणा-या पाण्याची समुद्रामधील पाण्याशी तुलना केली असता, बोटावरील पाणी ज्याप्रमाणे नगण्य आहे, अगदी त्याचप्रमाणे इहलोकातील जीवन मृत्यूपश्चात जीवनाच्या तुलनेत नगण्य आहे. (मुस्लिम, तिर्मिजी, तर्जुमाने हदीस, Vol-1, Page 80) (अर्थात मृत्यू पश्चात

जीवन अनंत आहे.)

- इस्लामचा स्वीकार केल्यानंतर पुर्वी करण्यात आलेले पाप परमेश्वराव्दारे माफ करण्यात येतात. (मुस्लिम, मुन्तखब अबवाब, Vol-2, Page 80)

(अर्थात नंतर गुन्हा घडल्यास त्याचा निवाडा निश्चितच करण्यात येईल)

**व्यवसायाशी संबंधीत उपदेश**

- सदोदित सकारात्मक विचार करा. तुमचा विश्वास एवढा सकारात्मक हवा, की जर तुम्हास प्रलयदिन लगोलग येणार आहे हे ज्ञात झाले आणि तुमच्या हातात एखादे रोपटे असले तर ते रोपटे थोडा अवधी असला तरी त्वरीत लावा. (आदाबे मुफ़ारद उर्दू ४७९)

- ईश्वराची अनिवार्य भक्ती केल्यानंतर, आपल्या परिवाराच्या पालनपोषणासाठी रोजगार कमावणे सुध्दा अनिवार्य आहे. (तिबरानी कबीर ९७५१)

(अर्थात नमाज, रोजा, जकात आणि हज करणे अनिवार्य आहे, याचसोबत चरितार्थासाठी उचित आणि रास्त प्रकारे धन मिळवणे अनिवार्य आहे. भोंदूगिरीने धन मिळवणे चुकीचे आहे.)

- जी व्यक्ती पवित्र जीवन जगण्यासाठी, आपल्या मातापित्यांची सेवा करण्यासाठी आणि आपल्या पत्नी, मुलाबाळांचे संगोपन करण्यासाठी उचित मार्गाने धन संपादित करते, त्याचे हे कार्यदेखील ईश्वराची भक्ती आहे. (तिबरानी)

- परमेश्वराने समृध्दीचे २० भाग केले आहेत. त्यापैकी १९ भाग व्यापार-उदिम करणा-यांना आणि केवळ एक भाग नोकरी करणा-यांना दिला आहे. (कन्जुल आमाल, १६१४, रकमुल हदीस ९३५४)

- परमेश्वराने ज्या माध्यमाव्दारे (Source of Income) तुमची उपजिवीका चालविली आहे, त्या माध्यमाचा तोपर्यंत त्याग करू नका, जोपर्यंत त्यापासून उपजिवीका (Income) मिळणे बंद होत नाही अथवा एखादी समस्या उद्भवत नाही. (इब्ने माजा कन्जुल आमाल ९२६६)

(नवा व्यवसाय शोधा पण चालू असणारा व्यवसाय बंद करू नका)

- तुमच्याकडे कामास असणारे नोकर, तुमचे बंधू आहेत, त्यांना ईश्वराने तुमच्या सेवेसाठी नियुक्त केले आहे. परमेश्वर एका बंधूस दुस-या बंधूच्या सेवेत नियुक्त करत असेल, तर धनाढ्य बंधूने आपल्या सेवकाशी अत्यंत आपुलकीने व्यवहार केला पाहिजे. त्यांना तेच खाणे द्या जे तुम्ही स्वतः खाता, त्यांना तेच वस्त्र द्या जे तुम्ही परिधान करता आणि त्यांच्याकडून कठिण काम घ्यायचे असेल तर तुम्ही स्वतः त्या कामास हातभार लावा. (बुखारी, मुस्लिम, अबू दाऊद तिर्मिजी)

- शक्यतो भुगर्भातुन प्राप्त होणा-या खनिजांचा व्यापार करा आणि धन प्राप्त करा. (कन्जुल आमाल, Vol-2, Page-197)

- कामगारांना मेहनताना त्याचा घाम सुकण्या आधी द्या. (इब्ने माजा)

- तुम्ही जे काम कराल ते उत्तम प्रकारे करा. (मुस्लिम, हदीसे नबवी नं ३६५)

- रास्त आणि कायदेशिरपणे रोजगार कमवा. (मुस्तदरक हाकीम-२१४)

- कोणासही धोका देऊ नका. (इब्ने माजा २२५०)

- एकदा फसल्यानंतर दुस-या वेळेस त्याचप्रकारे फसू नका. (बुखारी, मुस्लिम)

- खोटे बोलू नका. (बुखारी, मुस्लिम)

- विकलेल्या वस्तूची गॅरंटी दया. (इब्ने माजा २२६५)

- कोणाचेही शोषण करू नका. (इब्ने माजा, २२५३)
- आपल्या दिलेल्या वचनाची पूर्तता करा. (पवित्र कुरआन, ५:१)
- तराजूमध्ये जेव्हा वस्तू वजन कराल तेव्हा झुकते माप दया. (तिर्मिजी २३०५)
- भाव वाढविण्यासाठी वस्तूंची साठेबाजी करू नका. (इब्ने माजा २२२९)
- व्याज घेऊही नका आणि देऊही नका तसेच व्याज बट्टयाच्या व्यवसायामध्ये कोणासही मदत करू नका. (मिश्कात)
- आपल्या व्यवहाराचे लिखीत दस्ताऐवज ठेवा. (तिर्मिजी) (पवित्र कुरआन, २:२९२)
- वृक्षावर पूर्ण फळे येण्याआधी आगाऊ (Advance) सौदा करू नका. (इब्ने माजा, २२६५/२२९४)
- वस्तुंची विक्री करताना किंमत कायम (Fixed Rate) ठेवण्याच्या नितीचा अवलंब करा. (इब्ने माजा, २२८१)
- एखाद्याच्या असाहाय्यतेचा फायदा उठवू नका. (इब्ने माजा, २२६९)
- ज्या वस्तू तुमच्या कब्जात आहेत, केवळ त्यांचाच सौदा करा. (इब्ने माजा)
- नाभिकाचा व्यवसाय करू नका. (इब्ने माजा, २२४२)
- चित्रकार बनू नका. (इब्ने माजा २२२७)
- अभिनेता बनू नका. (तिर्मिजी सफीना निजात-२३७)
- लैंगिकतेशी संबंधीत कोणताही व्यवसाय करू नका. (मुताफिका अलैह)
- दारू, जुगार आणि ज्योतिषविषयक कोणतेही व्यवसाय करू नका. (मुताफिका अलैह)
- नाचगाण्याशी संबंधीत कोणताही व्यवसाय करू नका. (मुताफिका अलैह)
- ज्ञात असून सुध्दा एखाद्याने चोरीचा माल विकत घेतला तर तो त्या चोरीमध्ये भागीदार आहे. (मुसतदाक २२५३)
- व्यवसायामध्ये आकंठ बुडून जाऊ नका. (तिर्मिजी)

  (परिवार, समाज तसेच धर्मासाठी वेळ राखून ठेवा)
- पापी आचरणामुळे परमेश्वर उपजिवीकेचे साधन हिरावून घेतो. (मुस्लिम ३७२१) (इब्ने माजा मुस्नद अहमद २१८८१)
- सकाळी उशिरापर्यंत झोपण्यामुळे परमेश्वर समृध्दी कमी करतो. (मस्नद अहमद, Vol-1, 73)
- ज्या धनामधून जकात (निर्धारीत दान) देण्यात येत नाही, असे धन नष्ट होते. (मिश्कात, सफीना निजात-६०)
- कर्ज घेऊ नका, कर्ज रात्रीची चिंता आणि दिवसामधील अपमानाचे कारण आहे. (जवाहिरे हिकमत)
- ज्या व्यक्तीने कर्ज घेतले आणि तो कर्ज परत करू इच्छितो, अशा व्यक्तीस कर्जमुक्त होण्यासाठी परमेश्वर मदत करतो. तसेच ज्या व्यक्तीची नियत सुरूवातीपासून कर्ज बुडविण्याची आहे, अशा व्यक्तीचा नाश परमेश्वर करतो. (बुखारी, मारूफुल हदीस, Vol-2, Page-99)
- ह.मुहम्मद (स.अ.) यांनी लाच घेणारा आणि लाच देणारा या दोहोंना शाप दिला आहे. (अबू दाऊद, तर्जुमाने हदीस, Vol-1, Page-299 )

### महिलांविषयी ह.मुहम्मद (स.अ.) यांचा उपदेश

- ह.मुहम्मद (स.अ.) यांनी म्हटले आहे मुलींचा तिरस्कार करू नका, कारण त्या अत्यंत प्रेमळ आणि शुभ असतात. (मुस्नद अहमद १७३७३)
- ह.मुहम्मद (स.अ.) यांनी नमूद केले आहे, तुमच्या मध्ये तो सर्वात उत्तम आहे, जो आपल्या पत्नीसोबत उत्तम व्यवहार करतो. (तिर्मिजी, ११६२)
- ह.मुहम्मद (स.अ.) यांनी नमूद केले आहे, ज्याने दोन मुलींचे पालनपोषण उत्तमरित्या केले, स्वर्गामध्ये तो माझ्यासोबत असेल. (इब्ने माजा, ३६७०)
- ह.अब्दुल बिन अब्बास नमूद करतात, ह.मुहम्मद (स.अ.) म्हणाले, ज्या व्यक्तीची कोणी मुलगी अथवा बहिण असेल आणि त्याने त्यांच्यासोबत मुलासारखा व्यवहार केला (अर्थात मुलगा आणि मुलगी यांमध्ये फरक केला नाही), तर परमेश्वर त्याला स्वर्गात जागा देईल. (अबू दाऊद, ५१४६)
- ह.मुहम्मद (स.अ.) यांनी म्हटले आहे, तुमच्या पत्नीस उत्तम भोजन आणि पोशाखाची व्यवस्था करणे तुम्हावर बंधनकारक आहे. (मुस्लिम, ३७२१)
- पुरूषांना आकर्षित करण्यासाठी आभुषणे परिधान करून आणि सुगंध लावून स्त्रियांनी बाहेर पडणे पापकर्म आहे. (अबू दाऊद, तिर्मिजी)
- महिलांनी आपली नजर झुकलेली ठेवणे आवश्यक आहे. आपल्या आभुषणांचे प्रदर्शन करू नये तसेच आपला उरोभाग ओढणीने व्यवस्थित आच्छादून आपल्या शिलाची रक्षा करावी. (पवित्र कुरआन २४:३१)
- घराबाहेर पडल्यानंतर महिलांनी चादर स्वतःवर पांघरून घ्यावी, जेणेकरून कोणी त्यांना ओळखणार नाही आणि त्रासही देणार नाही. (पवित्र कुरआन ३३:५९)

आपल्या समाजामधील विधवांचा पुनर्विवाह करा. (पवित्र कुरआन २४:३२)

### संपूर्ण मानवजातीसाठी हजरत मुहम्मद यांचा अखेरचा संदेश

ह.मुहम्मद (स.अ.) यांनी आपल्या अंतिम हज यात्रेमध्ये जो संदेश संपूर्ण मानवजातीस दिला त्याचे मुख्य अंश खालीलप्रमाणे आहेत.

- परमेश्वर एकच आहे आणि त्याच्या शिवाय कोणीही पूजनीय नाही. परमेश्वराचा कोणीही साथी नाही. परमेश्वराने आपले वचन पूर्ण केले आणि अधर्मी शक्तींना पराजित केले आहे. (आणि इस्लाम धर्माचा प्रसार केला आहे.)
- लोकहो, परमेश्वराने तुम्हास एकाच स्त्री आणि एकाच पुरुषापासून जन्माला घातले आणि तुम्हास वेवगवेगळ्या वंशामध्ये वर्गीकृत केले, जेणेकरुन तुम्हास ओळख मिळेल. तुमच्यामध्ये सर्वात आदरणीय तो आहे, जो परमेश्वराचा जास्त आदर आणि भक्ती करतो. कोणतीही अरब व्यक्ती, अरबेतरापेक्षा मोठा नाही आणि कोणतीही अरबेतर व्यक्ती अरब व्यक्तीपेक्षा मोठी नाही. कोणतीही काळी व्यक्ती, गो-या व्यक्तीपेक्षा मोठी नाही आणि कोणतीही गोरी व्यक्ती, कोणत्याही काळ्या व्यक्तीपेक्षा मोठी नाही. (जातपात, प्रांत, रंगभेद, वंश, इत्यादी भेदभावांना इस्लामी समाजामध्ये कोणतेही स्थान नाही.) व्यक्तीचा मोठेपणा फक्त त्याची ईश्वरभक्ती आणि आचरणातील पावित्र्य यावर अवलंबुन आहे.
- लोकहो, आजचा (हजचा) दिवस, हा (हजचा) महिना आणि हे मक्का शहर

ज्याप्रमाणे आदरणीय आहे, अगदी त्याचप्रमाणे प्रत्यके माणसाचा जिव, धन आणि सन्मान आदरणीय आहे. (अर्थात कोणीही दुस-याच्या जीवितास, संपत्तीस अथवा सन्मानास कदापिही हानी पोहचवु नये.)

- लोकहो, माझ्या नंतर पथभ्रष्ट होऊ नका. आपापसात युध्द करु नका. सर्व मुस्लिम एक दुस-याचे बंधू आहेत. आपल्या दासांची (तुमच्यावर अवलंबुन असणा-या व्यक्तींची) काळजी घ्या, त्यांना तेच खाऊ घाला जे तुम्ही स्वतः खाता आणि त्यांना तेच वस्त्र द्या जे तुम्ही स्वतः परिधान करता.
- मुस्लिम होण्यापुर्वीचे जे काही वैर होते, ते मी आज संपवत आहे. माझ्या खानदानातर्फे एका हत्येचा जो बदला घ्यायचा आहे, तो देखील मी आज माफ करत आहे.
- मुस्लिम होण्यापूर्विचे जे कर्ज होते, त्याचे व्याज मी माफ करत आहे. माझे चुलते ह. अब्बास (रजि.) यांनी जे कर्ज दिले आहे, त्याचे व्याज मी माफ करत आहे. आता कोणीही व्याज घेऊ नये आणि देऊ नये.
- लोकहो, परमेश्वराने प्रत्येक वारसाचा हक्क प्रस्थापित केला आहे. आता कोणीही आपल्या वारसांसाठी मृत्युपत्र करु नये. (संपत्तीमध्ये प्रत्येक वारसास किती हक्क मिळणार आहे, हे परमेश्वराने पवित्र कुरआनमध्ये नमुद केले आहे. आता आपल्या मर्जीने कोणीही मृत्यूसमयी आपल्या वारसाचा हक्क कमी अथवा जास्त करु नये.)
- जे मूल, ज्याचा घरी जन्मले त्याचेच ते मूल आहे. व्यभिचाराची शिक्षा दगड मारुन मृत्युदंड देण्याची आहे. परमेश्वरापाशी न्याय करण्यात येईल. जो कोणी आपल्या खानदानाविषयी खोटे बोलेल, त्याच्यावर परमेश्वराची अवकृपा असेल.
- जे कर्ज घ्याल ते अवश्य परत करा.
- एखादी वस्तू वापरण्यासाठी उसनी घेतली असेल तर ती परत करा.
- भेट अथवा उपहार एखाद्याकडून स्वीकारला असेल तर तुम्हीदेखील त्यास कटाक्षाने भेट अथवा उपहार द्या.
- तुम्ही एखाद्याची जबाबदारी घेतली असेल तर तुमचे वचन पूर्ण करा (त्याच्यावतीने तुम्ही दंड भरा)
- जबरदस्तीने कोणाकडूनही कोणतीही वस्तू घेऊ नका.
- स्वतःबरोबर तसेच इतरांसोबत अन्याय करु नका.
- एखादा काळा हबशी व्यक्ती तुमचा शासक बनला आणि तो ईश्वर आदेशाविरुध्द आज्ञा देत नसेल, तर त्याचे आदेश मानणे तुमच्यासाठी अनिवार्य आहे.
- आता माझ्या नंतर कोणीही प्रेषित येणार नाही आणि तुम्ही अंतिम समुदाय आहात.
- पतीच्या अनुमतीशिवाय पत्नीने तिचे धन इतरांस देणे योग्य नाही.
- पती पत्नीचे एक दुस-यावर अधिकार आहेत. व्यभिचार न करता सदाचारी वर्तन करणे पत्नीचे कर्तव्य आहे. पतीस नापसंद असणा-या व्यक्तीस पत्नीने घरामध्ये प्रवेश देऊ नये.
- पत्नीने व्यभिचार केला तर तिला सौम्य शिक्षा द्या, जेणेकरुन तिचे वर्तन सदाराची बनेल, तदनंतर तिच्याशी सौहार्दपूर्ण आणि प्रेमळ संबध ठेवा. पत्नीचे पालनपोषण उत्तमरित्या करा कारण ती सर्वस्वी तुम्हावर अवलंबुन आहे.
- पती पत्नीचे शारीरिक संबध फक्त

विवाहानंतरच प्रस्थापित होतील त्यामुळे आपल्या वैवाहिक जीवनात ईश्वरीय आदेशांचे कटाक्षाने पालन करा.

- ज्याने अपराध केला तोच शिक्षा भोगेल, पित्याच्या अपराधासाठी पुत्रास शिक्षा होणार नाही तसेच पुत्राच्या अपराधासाठी पित्यास शिक्षा होणार नाही.

- हजरत मुहम्मद (स.) यांनी फर्माविले, तीन मुद्दे मानवी हृदय साफ करतात. (परस्परांत वैरभाव निर्माण करत नाहीत.)

  प्रत्येक कार्याचा उद्देश शुध्द असणे,

  मानवजातीच्या हितासाठी सदोदित कार्यरत असणे,

  आपापसात सामंजस्य वृध्दिंगत करणे.

- लोकहो, महिन्यांना मागे-पुढे करु नका (वर्षात बारा महिने आहेत ते तेवढेच ठेवा. काही दिवस व महिने जोडून Lunar महिन्यांना Solar Calender सोबत जोडू नका.)

- लोकहो परमेश्वराचा आदेश मी तुम्हापर्यंत पोहचवला आहे. तुमच्यामध्ये मी दोन गोष्टी सोडून जात आहे आणि तुम्ही त्या गोष्टींना धरुन रहाल तर तुम्ही पथभ्रष्ट होणार नाही, त्या गोष्टी अल्लाहचा पवित्र ग्रंथ कुरआन आणि माझी सुन्नत (प्रेषितांची जीवनी) आहेत.

- लोकहो परमेश्वराची सातत्याने स्तुती करा. पाचवेळेस नमाज अदा करा, महिन्याचे रोजे करा, शरियतप्रमाणे जकात (कर) द्या, हज यात्रा करा आणि आपल्या शासकाची आज्ञा माना. याप्रमाणे तुम्ही जीवन व्यतित कराल तर तुम्हास अवश्य स्वर्ग प्राप्ति होइल.

  लोकहो, ज्यांनी माझे बोल येथे ऐकले आहेत त्यांनी ते बोल त्यांच्यापर्यंत पोहोचवावेत जे येथे उपस्थित नाहीत कारण संभव आहे जो येथे उपस्थित नाही कदाचित तो तुम्हापेक्षा जास्त समझदार आणि लक्षात ठेवणारा असेल. (खुतबा हज्जतुल विदा)

*********

## प्रकरण क्रमांक-८

# एक ईश्वराचे अस्तित्व आहे याचा पुरावा

आपण एकेश्वरवादी आहात काय ?

नाही?

काही हरकत नाही.

मी आपणास काही प्रश्न विचारत आहे. कृपया त्या प्रश्नांची उत्तरे आपण द्याल ही अपेक्षा.

विसाव्या शतकात (१९०० AD) मध्ये वैज्ञानिकांना या गोष्टीचा शोध लागला की सुरवातीला एक छोटी गरम वस्तू होती ती एका विस्फोटानंतर विस्तारण्यास सुरूवात झाली आणि विस्तारत-विस्तारत सा-या ब्रम्हांडामध्ये पसरली. यास "Big bang Theory" म्हटले जाते. जेव्हा ती काही प्रमाणात थंड झाली तेव्हा तप्त धुक्यासमान झाली नंतर आणखी थंड झाल्यानंतर आकाशाची निर्मिती झाली. जमिनीच्या सर्व भागांत पाणीच पाणी झाले कालांतराने जमीन पाण्याखालून वर आली आणि पाण्यापासून सर्व जीवांची निर्मिती झाली.

पवित्र कुरआन, जो चौदाशे वर्षांपूर्वी (१९०० AD ते ६३२ AD पर्यंत) अवतरित झाला आहे त्यानुसार प्रारंभी पृथ्वी, आकाश इत्यादी सर्व उष्ण धुके होते आणि परमेश्वराने त्यापासून पृथ्वी आणि आकाशाची निर्मिती केली. (पवित्र कुरआन ४१:११)

जे सत्य शास्त्रज्ञांना विसाव्या शतकात उमगले त्याच सत्याचा पवित्र कुरआनमध्ये चौदाशे वर्षांपूर्वी कसा बरे उल्लेख करण्यात आला आहे?

अशा प्रकारची आणखी काही सत्य आणि तथ्य खाली दिले आहेत.

संपूर्ण प्राणि-मात्रांचा जन्म पाण्यापासून झाला आहे हा निष्कर्ष शास्त्रज्ञांनी अठराव्या शतकात काढला. तथापि कुरआन (२१:३०) मध्ये १४०० वर्षांपूर्वी ईश्वराने म्हटले आहे की त्याने सजीवांना पाण्यापासून जन्माला घातले आहे.

प्राचिनकाळी सूर्य आणि चंद्र जणु काही पेटलेल्या मशाली आहेत आणि त्यांच्यापासून आपणास प्रकाश मिळतो अशी लोकांची धारणा होती. एकोणिसाव्या शतकात सूर्य स्वतःमध्ये असणा-या इंधनाचे ज्वलन करून प्रकाश देतो आणि चंद्र केवळ सूर्याचा प्रकाश परावर्तित करतो हा शोध वैज्ञानिकांनी लावला. हेच तथ्य पवित्र कुरआन (२५:६) मध्ये चौदाशे वर्षांपूर्वी नमूद करण्यात आले आहे.

प्राचीन काळी लोकांचा हा विश्वास होता की, धरती स्थिर आहे आणि सूर्य, चंद्र संपूर्ण ब्रम्हांड या पृथ्वीच्या सभोवताली प्रदक्षिणा घालतात.

१६०९ मध्ये जर्मन खगोलशास्त्रज्ञ Johanannas Kepler यांनी सूर्यमालेतील ग्रह स्वतःभोवती फिरत असताना सूर्याभोवती प्रदक्षिणा घालतात आणि आपल्या कक्षेत Axis फिरत असतात. हा सिध्दांत मांडला. २० व्या शतकात सूर्य स्थिर नसून तो स्वतःच्या कक्षेत फिरत असताना संपूर्ण सूर्यमालेसह १५० मैल प्रतिसेकंद या वेगाने (Solar Apex) भोवती फिरत असल्याचे स्पष्ट झाले आणि या एका प्रदक्षिणेस दोनशे दशलक्ष वर्ष लागतात.

पवित्र कुरआन मध्ये हेच तथ्य चौदाशे वर्षांपूर्वी नमूद करण्यात आले आहे की, सूर्य, चंद्र इत्यादी आपापल्या कक्षांमधून मार्गक्रमण करीत आहेत. (पवित्र कुरआन २१:३३)

सूर्यापासून मिळणारा प्रकाश आणि उर्जा ही त्यामध्ये असणा-या हेलियम या वायूवर प्रक्रिया झाल्याने मिळते. हा वायू जेव्हा संपुष्टात येईल तेव्हा ही प्रक्रिया थांबेल आणि सूर्य थंड होण्यास सुरूवात होईल. या टप्प्यावर सूर्य गुलाबी रंगाचा एक विस्तारणारा गोलक बनेल आणि पृथ्वीला आपल्यात सामावून घेईल, त्यावेळेस पृथ्वीवर फक्त दिवस असेल आणि आकाशाचा रंग गुलाबी असेल.

हे तथ्य शास्त्रज्ञांनी केवळ पन्नास वर्षांपूर्वी शोधून काढले आणि हेच तथ्य चौदाशे वर्षांपूर्वी पवित्र कुरआनमध्ये उध्दृत करण्यात आले आहे. (पवित्र कुरआन, ५५:३७)

(आणि हा दिवस प्रलयदिन असेल.)

प्राचीन काळी अवकाशातील दोन ता-यांच्या दरम्यान काहीही नसून केवळ निर्वात पोकळी आहे अशी जनतेची धारणा होती. मागील काही वर्षांत अवकाशातील दोन ता-यांमधील पोकळी “प्लाझ्मा” या पदार्थाच्या चौथ्या अवस्थेने व्यापलेली असल्याचे निष्पन्न झाले आहे. (Plasma is fourth state of matter)

हेच तथ्य पवित्र कुरआनमध्ये निर्देशित करण्यात आले आहे की दोन ता-यांमधील अवकाश विशिष्ट अवस्थेने व्यापलेले आहे. (पवित्र कुरआन, २५:५९)

Edwin Hubble यांनी १९२५ मध्ये या विश्वात जेवढ्या आकाशगंगा Galaxy आहेत त्या एकमेकापासून दूर जात आहेत आणि या विश्वाचा विस्तार होत आहे हा महत्त्वाचा शोध लावला.

सर्व शक्तिमान परमेश्वर पवित्र कुरआन मध्ये नमूद करतो की, मी या विश्वाचा विस्तार करीत आहे. (पवित्र कुरआन, ५१:४७)

पदार्थांच्या सर्वात लहान कणाला अणु (Atom) म्हणतात. प्राचीन काळी याला इतर नावाने संबोधित असत. काही वर्षांपूर्वी या अणुपेक्षाही लहान कण असतात हा शोध लागला आणि त्यांना आण्विक कण (Subatomic Particles) असे म्हणतात.

अणुपेक्षादेखील लहान कण असल्याचा उल्लेख परमेश्वराने पवित्र कुरआनमध्ये चौदाशे वर्षापूर्वी केला आहे. (पवित्र कुरआन, ३४:३)

समुद्रात अनेक ठिकाणं अशी आहेत जिथे एका बाजूस गोड पाणी आणि दुस-या बाजूस खारे पाणी समोरासमोर अस्तित्वात असूनही त्यांची सरमिसळ होत नाही. अशी ठिकाणं भूमध्य आणि अटलांटिक समुद्रात असल्याचे केवळ १०० वर्षांपूर्वी ज्ञात झाले. परमेश्वराने याचा उल्लेख पवित्र कुरआनमध्ये चौदाशे वर्षापूर्वी केला आहे. (पवित्र कुरआन, २५:५३)

आपले ज्या जमिनीवर वास्तव्य आहे तिची जाडी सुमारे १०० किमी असून त्याखाली अतिउष्ण लाव्हा आहे. ही जमीन अनेक प्लेटसनी बनलेली आहे आणि जेव्हा यातील कोणत्याही दोन प्लेटसमध्ये हालचाल होते तेव्हा भूकंप होतो. पृथ्वीवर जे पर्वत विराजमान आहेत त्यांचा उपयोग पाचरीसारखा (Wedge) होतो आणि ते दोन प्लेटसमध्ये होणा-या हालचालींना प्रतिबंध करतात. याचा शोध वैज्ञानिकांनी विसाव्या शतकात लागला हे तथ्य परमेश्वराने चौदाशे वर्षापूर्वी पवित्र कुरआन (७९:३२) मध्ये नमूद केले आहे.

जन्माला येणारे मूल, मुलगा असेल की मुलगी हे सर्वथा पुरूषामार्फत संक्रमित होणा-या वीर्यावर अवलंबुन असते क्रोमोझमच्या २३ व्या जोडीमध्ये जर पुरूषाच्या वीर्यामधून XX अशी जोडी जुळली की मुलीचा जन्म होतो आणि XY अशी जोडी जुळली की मुलाचा जन्म होतो.

जन्माला येणारे मूल मुलगा असेल किंवा मुलगी हे मातेवर नाही तर पित्यावर अवलंबुन असते.

हे तथ्य २० व्या शतकात शास्त्रज्ञांना ज्ञात झाले, पवित्र कुरआन मध्ये हेच तथ्य १४०० वर्षांपूर्वी नमूद करण्यात आले आहे. (पवित्र कुरआन, ७५:३५-३९, ५३:४५-४६)

याच प्रकारे पाणी, हवा, पर्वत, पक्षी, प्राणी, कीटक, मानवी, शरीर, मानवाचा जन्म इ. विषयी जे सत्य संशोधकांनी अगदी अलिकडच्या शतकात शोधून काढले त्याबाबत भाष्य परमेश्वराने चौदाशे वर्षांपूर्वी पवित्र कुरआनमध्ये केले आहे.

अशा प्रकारची ८० पेक्षा अधिक तथ्ये पवित्र कुरआनमध्ये उध्दृत केली आहेत. याचे संकलन हारून याहया यांनी “Allah's Miracles in the Quran” या पुस्तकात केले आहेत. डॉ.झाकिर नाईक यांचे “The Quran & Modern Science” हे पुस्तक याच विषयावर आहे.

पवित्र कुरआनमध्ये जे नमूद केले आहे ते वैज्ञानिक कसोटीस कशा प्रकारे उतरते हे जाणून घेण्यासाठी आपण कृपया उपरोक्त पुस्तके प्रथम अभ्यासावीत आणि तद्नंतर पवित्र कुरआन या ग्रंथाचे अध्ययन करावे जेणेकरून पवित्र कुरआनचे आकलन सहजरित्या होईल.

वैज्ञानिक शोध, आधुनिक आणि प्रगत साधनांव्दारे आज घडीला लागत आहेत. अशा तथ्यांचा उल्लेख पवित्र कुरआनमध्ये चौदाशे वर्षांपूर्वी कसा बरे करण्यात आला? याचे उत्तर जे एकाच परमेश्वरास मानत नाहीत त्यांनी द्यावे.

या सर्व तथ्यांना तोच जाणू शकतो ज्याने त्यांची निर्मिती केली आहे. परमेश्वरानेच या तथ्यांची निर्मिती केली असल्याने ती त्याला पूर्णतः ज्ञात आहेत आणि हाच केवळ एकमेव ईश्वराच्या अस्तित्वाचा पुरावा आहे.

परमेश्वरानेच पवित्र कुरआन अवतरित केला आहे आणि यामुळेच वर नमूद केलेली सत्य आणि तथ्ये चौदाशे वर्षांपासून पवित्र कुरआनमध्ये नमूद आहेत. या तथ्यांची ओळख अगदी अलिकडच्या काळामध्ये वैज्ञानिकांना झाली आहे.

परमेश्वर अनादी अनंत काळापासून आहे आणि तो चिरकाल राहणार आहे. या विश्वाची निर्मिती आपोआप झाली नसून सर्वशक्तीमान परमेश्वराने केली आहे.

परमेश्वर हेच सत्य आहे आणि त्याने अवतरित केलेला पवित्र कुरआनदेखील सत्य आहे आणि हे पुस्तक ज्यांच्यावर अवतरित करण्यात आले तेसुध्दा सत्य आहेत आणि परमेश्वराचे अंतिम प्रेषित आहेत.

*********

# प्रकरण क्रमांक-९
# प्रेषित कोण?

**प्रेषित कोण निर्माण करतो?**

- पवित्र कुरआन मध्ये परमेश्वर उध्दृत करतो - प्रथम आम्ही तुम्हास बनविले आणि त्यानंतर तुमचे चेहरे तयार केले" (पवित्र कुरआन ७:११)

  विद्वान याचे विश्लेषण असे करतात, परमेश्वराने प्रथम संपूर्ण मानवजातीचे आत्मे निर्माण केले आणि त्यानंतर त्या आत्म्यांसाठी शरीरांची निर्मिती केली.

- सर्व शक्तिमान परमेश्वराने पवित्र कुरआन मध्ये विषद केले "पैगंबर आदम (अ.स.) यांच्या पाठीपासून जेव्हा त्यांचे संतान (संपूर्ण मानवजात) निर्माण केले आणि त्यांनाच त्यांचे साक्षीदार बनवून विचारले की, काय मी तुमचा ईश्वर नाही? त्यावेळेस त्यांनी साक्ष दिली की तुच आमचा ईश्वर आहेस आणि हे वचन अथवा साक्ष यासाठी घेण्यात आली की, प्रलयदिनी हे मनुष्य असे म्हणु नयेत की, हे परमेश्वरा! आम्ही तुला ओळखतच नव्हतो आणि असं होऊ नये की ते (मानवजात) म्हणतील, परमेश्वरा सोबतच आमचे पुर्वज देवी देवतांना पूजत असत, आम्ही तर केवळ त्यांची संतान असून त्यांच्या नंतर जन्मलो आहोत, ज्या पापाची परंपरा त्यांनी (पूर्वजांनी) स्थापित केली त्याची शिक्षा आम्हांस कशासाठी? (पवित्र कुरआन, ७:१७३ सारांश)

  विद्वानांचे म्हणने आहे की वचन अथवा साक्ष घेण्याची ही प्रक्रिया तेव्हाची आहे जेव्हा मानवाचे केवळ आत्मे होते आणि त्याचे शरीर उत्पन्न झाले नव्हते.

- ईश्वराने संपूर्ण मानवजातीचे आत्मे त्यांचे शरीर बनविण्यापूर्वी उत्पन्न केले, त्याचप्रमाणे परमेश्वराने मानवाच्या जन्मापूर्वीचा प्रेषित अथवा पैगंबर यांची निर्मिती केली आहे. याचे प्रमाण खाली दिलेल्या पवित्र कुरआन मधील काही वचनात मिळते .

- आणि जेव्हा आम्ही पैगंबरांकडून वचन घेतले आणि (हे मुहम्मद (स)), तुम्हांकडून आणि नूहकडून आणि इब्राहीमकडून आणि मूसाकडून आणि हे वचनदेखील पक्के घेतले. (पवित्र कुरआन, ३३:७)

- पृथ्वी आणि आकाश निर्माण करण्यापूर्वीच परमेश्वराने या भूतलावर प्रलयदिनापर्यंत जन्मणा-या सर्व मानवांचे आत्मे निर्माण केले. याच वेळेस भूतलावर येणा-या प्रेषितांचे आत्मेदेखील निर्माण केले. काळाबरोबरच मनुष्य पृथ्वीतलावर जन्मास येत गेले आणि त्यांच्या मार्गदर्शनासाठी प्रेषित अवतीर्ण झाले.

- मानव घोर तपस्येव्दारे संत, महापुरूष बनू शकतो. तथापि कोणीही घोर तपस्येव्दारे परमेश्वराचा प्रेषित बनू शकत नाही, कारण प्रेषितांची नियुक्ती परमेश्वर स्वतः करतो. एकूणएक प्रेषितांची नेमणूक परमेश्वराने करोडो वर्षांपूर्वीच केली आहे. परमेश्वराच्या या प्रेषित नियुक्तीच्या प्रक्रियेत मानवाचा मुळीच सहभाग नसून तो परमेश्वराचा एकतर्फी निर्णय आहे.

- परमेश्वर ज्या आत्म्यांची नियुक्ती प्रेषित म्हणून करतो त्यांना सर्वोत्तम आणि सन्मानित खानदान, सर्वोत्तम व्यक्तिमत्व, सर्वोत्तम आचरण, अत्यंत पवित्र विचार आणि परिपूर्ण ज्ञान देतो. याचे कारण, भले मानवजात प्रेषितांचे आदेश आणि शिकवण आपल्या हटधर्मामुळे नाकारेल पण हलक्या जातीचा अथवा चारित्र्यहिन म्हणून कोणाही

प्रेषितास ते नाकारू शकत नाहीत, अथवा ते प्रेषितास समज आणि विचार नाहीत, असे म्हणु शकत नाहीत. एकूणएक प्रेषित सर्वोत्तम वंशाचे, उच्च कोटीचे चारित्र्य असणारे, उत्तुंग व्यक्तिमत्वाचे आणि बुद्धिमान होते.

या तथ्याचा उल्लेख परमेश्वराने पवित्र कुरआन मध्ये अनेक ठिकाणी केला आहे.

**पापांपासून प्रेषितांची ईश्वराव्दारे रक्षा**

- परमेश्वर प्रेषितांस अत्यंत खास प्रकारे निर्माण करतो, जन्मास घालतो, त्याचबरोबर या भूतलावर त्यांची प्रत्येक प्रकारच्या पापांपासून आणि चुकांपासून रक्षा करतो.

याचा पुरावा पवित्र कुरआन मध्ये उध्दृत केलेल्या हजरत युसूफ (अलैही सलाम) जे स्वतः एक प्रेषित होते, याच्या जीवन गाथेपासून प्राप्त होतो.

- हजरत युसूफ (अ.स.) यांचा जन्म कनान येथे झाला आणि त्यांना गुलाम बनवून विकण्यात आले. इजिप्तच्या एका मोठ्या सरदाराने त्यांना विकत घेतले व त्यांचा सांभाळ स्वतःच्या मुलाप्रमाणे केला. तारूण्यात त्यांचे व्यक्तिमत्व पराकोटीचे उमदे आणि आकर्षक बनले. ज्यांनी त्यांचा सांभाळ केला त्या सरदाराची पत्नी जुलेखा, ह. युसूफ (अ.स.) यांच्यावर अनुरक्त झाली. एके दिवशी, जुलेखाने ह. युसूफ (अ.स.) यांना दालनात बोलावून घेतले, दारे खिडक्या बंद केल्या आणि संबंधाची मागणी केली. तथापि ह. युसूफ (अ.स.) जुलेखाच्या तावडीतून स्वतःची सुटका करून घेण्यात यशस्वी झाले, ही परमेश्वराची त्यांच्यावर असिम कृपाच होती, याचा उल्लेख पवित्र कुरआन मध्ये खालीलप्रमाणे करण्यात आला आहे.

आणि जेव्हा (ह. युसूफ अ.स.) यांनी तारूण्यात पदार्पण केले तेव्हा आम्ही त्यांना ज्ञान आणि निर्णय क्षमता प्रदान केली, (आणि) आम्ही उत्तम मनुष्यास याच प्रकारे बदला देत असतो.

ज्या स्त्रीच्या घरात ते रहात होते ती स्त्री त्यांच्यावर मायाजाल पसरवू लागली आणि म्हणू लागली (माझ्याकडे) या, तेव्हा ह. युसूफ (अ.स.) उत्तरले, मी अल्लाहची शरण मागतो, माझ्या परमेश्वराने आपल्या पतीच्या घरात मला उत्तम निवारा प्रदान केला आहे, निश्चितपणे असा जघन्य अपराध करणारे सफल होत नाहीत.

त्या स्त्रीने निश्चय केलाच होता आणि जर आमचे एक प्रमाण (निशाणी) ह. युसूफ (अ.स.) यांच्या समोर आले नसते तर ह. युसूफ (अ.स.) तिच्याकडे आकर्षित झाले असते. त्यांच्या समोर आमचे प्रमाण आले जेणेकरून ह. युसूफ (अ.स.) यांना कुकर्म आणि अश्लिलतेपासून दूर ठेवण्यात आले. निःसंशय ते आमचे निवडण्यात आलेल्या पापभिरू भक्तांपैकी एक होत". (पवित्र कुरआन, १२:२३-२५)

(परमेश्वराने ठामपणे ह. युसूफ (अ.स.) यांची अश्लिलतेपासून रक्षा केली)

- साधारण मानवाच्या हातून एखादी चूक झाल्यास मानवासोबत कायम असणारे दोन देवदूत (फरिश्ते) ती लिहितात, या ११ लिखाणाव्दारे प्रलयदिनी पाप-पुण्याचा हिशोब करण्यात येणार आहे.

तथापि प्रेषितासोबत असे होत नाही, परमेश्वर क्षणोक्षणी त्यांना मार्गदर्शन करतो आणि प्रेषितांकडून एखादी गंभीर चूक झाल्यास तत्क्षणी त्यांना शिक्षा दिली जाते.

**प्रेषितांचे मार्गदर्शन**

प्रेषितांचे मार्गदर्शन आणि त्यांना दिलेला दंड यांची काही उदाहरणे खाली दिली आहेत.

- समाजावर श्रीमंतांची घट्ट पकड असते आणि त्यांच्या शब्दांना तसेच कृतीला मोठा

मान असतो. एखाद्या समुहाच्या सरदाराने इस्लामचा स्वीकार केल्यास तो संपूर्ण समुदाय इस्लाममध्ये दाखल होत असे. या कारणामुळे एखादा सरदार ह.मुहम्मद (स.अ.) पैगंबर यांना भेटण्यास आल्यास आपण त्यांचा मोठ्या प्रमाणात आदर-सत्कार करीत आणि त्यांना धार्मिक ज्ञान अत्यंत एकाग्रतेने देत असत.

- एकदा काही सरदार ह.मुहम्मद (स.अ.) यांना भेटण्यास आले आणि आपण त्यांचे प्रबोधन करीत असताना एक अंध गरिब मुस्लिम, अब्दुल्ला बिन उम्मेमकतूम (रजि.) तेथे आले आणि काही धार्मिक प्रश्नांची विचारणा केली. ह.मुहम्मद (स.अ.) यांनी प्रथम सरदारांशी बोलणी पूर्ण करावी आणि तद्नंतर त्या अंध सहका-याच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत असा विचार केला. त्या सरदारांना धर्म शिकण्याची एवढी उत्कंठा नव्हती जेवढी त्या अंध सहका-यास होती. ईश्वरापुढे सरदार आणि गरीब सर्व समान आहेत आणि ईश्वरेच्छा ही आहे की ज्याला धर्म शिकण्याची जास्त आवड आहे त्याला प्रथम ज्ञान देण्यात यावे. या प्रसंगी परमेश्वराने पवित्र कुरआन (८०:१-११) अवतरित करून ह.मुहम्मद (स.अ.) पैगंबर यांना अचुक मार्ग दाखविला. (तिरमीजी)

**प्रेषितांना परमेश्वराव्दारे दंड**

प्रेषितांना दंड देण्यात आल्याची उदाहरणे खाली दिली आहेत.

- हजरत युनूस (अ.स.) बगदादपासून २५० कि.मी. अंतरावर असणा-या निनेवाह नावाच्या समुदायाचे प्रेषित होते. या समुदायाचे ह.युनूस (अ.स.) यांनी मोठ्या प्रमाणावर प्रबोधन केले, तथापि त्या समुदायाने त्यांचे म्हणणे मुळीच ऐकले नाही.

अंततः ह.युनूस (अ.स.) यांनी त्या समुदायास शाप दिला आणि दुस-या देशाकडे रवाना झाले. ईश्वराने त्यांना दुस-या देशांत स्थलांतरीत होण्याचा आदेश दिला नव्हता, त्यांचे हे आचरण ईश्वराच्या इच्छेविरूध्द होते. त्यामुळे ईश्वराने त्यांना शिक्षा देण्याचा निश्चय केला. ह.युनूस (अ.स.) नावेत बसून दुस-या शहराकडे रवाना होत असताना एक मोठे वादळ समुद्रात आले आणि नाव बुडण्याचा धोका निर्माण झाला, नावाड्याने धोका टाळण्यासाठी ह.युनूस (अ.स.) यांना समुद्रात फेकून दिले, एका मोठ्या माश्याने ह.युनूस (अ.स.) यांना गिळंकृत केले. अशा त-हेने परमेश्वराने त्यांना एका माश्याच्या पोटात कैद केले. ह.युनूस (अ.स.) यांना चूक उमगल्यानंतर पश्चात्तापदग्ध होऊन क्षमा याचना केल्यानंतर परमेश्वराने त्यांना माफ केले, अन्यथा प्रलयदिनापर्यंत ह.युनूस (अ.स.) त्या माश्याच्या पोटात कैद राहिले असते. (पवित्र कुरआन (२१:८७) याचा सारांश)

- परमेश्वराने ज्या धर्माची देण देऊन ह.मुहम्मद (स.अ.) यांना पृथ्वीतलावर पाठवले त्याचे सार पुढीलप्रमाणे आहे.

  - परमेश्वर एक आहे आणि कोणीही त्याचा सहाय्यक नाही. या विश्वाच्या निर्मितीसाठी, विश्वाचा सांभाळ करण्यासाठी आणि विश्वाच्या परिचलनासाठी ईश्वराला कोणत्याही सहाय्यकाची गरज नाही. ईश्वर एकच आहे. तथापि असंख्य देवी-देवता त्याला सहाय्य करतात अशी मक्कावासियांची धारणा होती. मुस्लिम धर्मियात आणि मक्कावासियांच्यात हाच मोठा मूलभूत फरक होता.

- कोणत्याही मुस्लिमच्या मनात ईश्वराचा कोणी सहाय्यक आहे असा विचार ज्या क्षणी निर्माण होतो त्यानंतर तो मुस्लिम रहात नाही. याचा आधार घेऊन मक्का शहरातील सरदारांनी एक षडयंत्र रचले. ईश्वराचा कोणी सहाय्यक आहे यावर मुस्लिमांनी श्रध्दा

ठेवावी ही त्यांची इच्छा होती. यासाठी ते शांती आणि सद्‌भावनेचे प्रलोभन दाखवित आणि म्हणत आम्ही काही तुमच्या तत्त्वांचा अंगीकार करतो, तुम्ही आमच्या काही तत्त्वांचा स्वीकार करा, देवी देवतांना काही महत्त्व द्या. पवित्र कुरआन मध्ये या घटनेचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

- हे मुहम्मद (स.) आम्ही जो खरा संदेश तुमच्यावर अवतरित केला आहे. त्यापासून तुम्हाला विन्मुख करण्यासाठी (मक्कावासिय मुस्लिमेतर) प्रयत्नशिल होते. आणि तुम्ही आमचा असा संदेश द्या की जो आम्ही कदापिही तुमच्यावर अवतरित केलेला नाही (असा त्यांचा आग्रह होता). तुम्ही त्यांची ही मनिषा पूर्ण केली असती तर त्यांनी तुम्हाला घनिष्ठ मित्र बनविले असते. आम्ही तुम्हाला (त्या वेळेस) सांभाळले नसते तर तुमचा कल त्यांच्याकडे काही अंशी झुकला असता. (आणि असे घडले असते तर) आम्ही तुम्हास या जीवनामध्ये दुप्पट दंड दिला असता आणि मृत्युनंतरदेखील दुप्पट दंड दिला असता. त्यावेळेस तुमचा कोणताही समर्थक आमच्या विरूध्द (तुमच्या समर्थनास) उभा राहिलेला तुम्हास आढळला नसता. (पवित्र कुरआन १७:७३-७५)

**सारांश :-**

या पाठाचा सारांश हा आहे.

ईश्वराने मनुष्यजन्माच्या आधिच प्रेषितांची नियुक्ती केली आहे. ईश्वराने प्रेषितांना सर्वोत्तम वंश, व्यक्तिमत्व, आचरण आणि बुद्धी दिली.

प्रेषितांना जीवनभर ईश्वर मार्गदर्शन करत असतो आणि हरेक प्रकारच्या पापांपासून प्रेषितांची रक्षा करतो.

एखाद्या प्रेषिताने समजून उमजून ईश्वराचा आदेश पाळला नाही अथवा दुराचार केला तर त्यांना ईश्वर त्वरीत दंड देतो.

भुतलावर असे कधीही घडले नाही की एखादे प्रेषित आयुष्यभर दुराचार करीत राहिले आणि प्रेषित म्हणून कार्यरत राहिले.

या भुतलावर सुमारे १,२४,००० प्रेषित आले आणि त्यापैकी एकानेही दुराचार केला नाही.

धार्मिक ग्रंथ कितीही पवित्र असो, जर त्यात प्रेषिताने गैरकृत्य अथवा पाप केले असे नमूद करण्यात आले असेल तर तो ग्रंथ चुकीचा असू शकतो, पण प्रेषित कदापिही पाप करू शकत नाहीत.

*********

# प्रकरण-१०
# प्रेषितांचे शत्रू कोण?

- **ह.जकरिया (अ.स.)**

ह.जकरिया (अ.स.) एक महान प्रेषित होते, त्यांची एकेश्वरत्वाची शिकवण न रूचल्याने त्यांना ठार मारण्याचा लोकांनी निश्चय केला. मारेक-यांपासून स्वतःला वाचवत ह.जकरिया (अ.स.) अशा ठिकाणी पोहचले जेथे लपण्यासाठी कोणतीही जागा नव्हती. तेथे असणा-या एका मोठ्या वृक्षाकडे त्यांनी आश्रय मागितला, वृक्ष प्रेषितांची विनंती नाकारू शकत नव्हता, वृक्षाचे खोड दुभंगले आणि त्या खोडामध्ये ह.जकरिया (अ.स.) यांनी आश्रय घेताच तो वृक्ष पूर्ववत झाला. सैतान हे पहात होता, शत्रू तेथे पोहोचताच त्याने खुणेने ह.जकरिया (अ.स.) यांची लपण्याची जागा दाखवली. मारेक-यांनी मोठ्या करवतीने त्या वृक्षाचे खोड वरून मुळापर्यंत कापले आणि ह.जकरिया (अ.स.) यांचा वध केला.

- **ह.याहया (अ.स.)**

ह.याहया (अ.स.) हे देखील एक महान पैगंबर होते. ज्या प्रदेशात ह.याहया (अ.स.) यांनी एकेश्वरत्वाची शिकवण दिली, तेथील राजा (Hairo Antipass) आपल्या पुतणीसोबत विवाह करू इच्छित होता. तथापि या दुष्कर्मास ह.याहया (अ.स.) यांनी विरोध केला, पुतणी आणि तिची आई (Hairo Dias) प्रक्षुब्ध झाल्या आणि त्यांनी राजाकडे उपहार स्वरूप ह.याहया (अ.स.) यांच्या शिराची मागणी केली. राजाने ह.याहया (अ.स.) यांचे शिर कलम करून तो नजराणा दोघींस दिला. अशा प्रकारे एक प्रेषित दुष्कर्मास विरोध करताना शहिद झाले.

- **ह.इसा (अ.स.) (येशू खिस्त)**

ह.इसा (अ.स.) एक महान पैगंबर होते, ज्यांना परमेश्वराने पित्याविना जन्मास घातले होते. ह.इसा (अ.स.) पाळण्यात असल्यापासूनच लोकांना ईश्वराचा संदेश पोहोचवत होते. परमेश्वराने ह.इसा (अ.स.) यांना चमत्कारी शक्ती दिल्या होत्या. ह.इसा (अ.स.) अधांना, कुष्ठरूग्णांना बरे करत, मातीची चिमणी तयार करून त्यात प्राण फुंकत, इतकेच नव्हे तर मृत व्यक्तीस परमेश्वराच्या आज्ञेने पुनःश्च जीवित करत.

बायबलमध्ये ह.इसा (अ.स.) नमूद करतात, मी जुन्या धर्मास नष्ट करण्यास अवतीर्ण झालो नसून तोच धर्म पुनर्जिवीत करण्यास आलो आहे. (सेंट मॅथ्यूज ५:१७)

ह.इसा (अ.स.) यांच्या आधी ह.मूसा (अ.स.) यांनी ज्या धर्माची शिकवण दिली होती, त्याच धर्माची शिकवण ह. इसा (अ.स.) यांनी दिली आणि त्याचबरोबर धर्मात दाखल झालेले बिघाड दूर केले. वयाच्या ३२ व्या वर्षापर्यंत ह.इसा (अ.स.) अविरतपणे धर्माची शिकवण देत होते, पण लोकांना त्यांची शिकवण रूचली नाही. त्यांनी एक षडयंत्र रचले आणि विद्रोहाच्या खोट्या आरोपाखाली ह. इसा (अ.स.) यांना अटक करून त्यांचा वध करण्याचा प्रयत्न केला.

**लोक प्रेषितांशी शत्रुत्व का करतात?**

- येथे फक्त तीन प्रेषितांचा उल्लेख करण्यात आला आहे पण प्रत्यक्षात हजारो प्रेषितांचा वध लोकांनी केला आहे.

प्रेषितांची हत्या का करण्यात येते ?

या महान आणि पवित्र प्रेषितांनी कोणते पाप केले होते?

या प्रश्नांची उकल खाली दिली आहे.

- राजकारणाला सध्या जसे व्यवसायाचे रूप

आले आहे, केवळ सत्तासंपादन आणि संपत्तिची लुटमार करण्यासाठी लोक नेते बनतात, अगदी त्याचप्रमाणे बेइमान आणि चतुर लोक, धर्माचे व्यवसायात रूपांतर करून स्वतःस धर्मगुरू म्हणवून घेतात. हा प्रकार प्राचिन काळापासून अव्याहतपणे सुरू आहे आणि याव्दारे मानसन्मान आणि संपत्ती मोठ्या प्रमाणात कमवता येते.

पोप यांचे युरोपवर एक हजार वर्षे निरंकुश राज्य होते आणि युरोपमधील कोणताही सत्ताधिश पोप विरूध्द ब्र काढू शकत नव्हता. हीच अवस्था प्रत्येक प्रदेशात धर्माची आणि तथाकथित धर्मगुरूंची आहे.

प्रेषितांच्या आगमनाबरोबर अशा धार्मिक ठेकेदारांची दुकानदारी एकदम बंद पडत असे, त्यामुळेच अशा लोकांचा प्रेषितांना कट्टर विरोध असे.

- समाजातील अनेक धनाढ्य व्यक्ती गरिबांचे शोषण करूनच संपत्ती संचय करतात. प्रेषितांच्या आगमनाबरोबर गरिबांचे शोषण थांबते, अत्याचार समूळ नष्ट होतो, सर्वत्र शांतता प्रस्थापित होते आणि सर्वात महत्त्वाचे, मनुष्य मनुष्याच्या गुलामगिरीतून मुक्त होतो व परमेश्वराचा उपासक बनतो. शोषक मात्र आपली सत्ता अणि संपत्ती शोषणाव्दारे कमावण्याचे उद्योग बंद करू इच्छित नाही. त्यामुळे हा वर्ग सातत्याने प्रेषितांचा हाडवैरी राहिला आहे.

- प्रेषितांच्या शिकवणीवरील विश्वास आणि श्रध्दा नष्ट करण्यासाठी त्यांच्या बदनामीचे षडयंत्र प्रेषितांच्या निधनानंतर सुध्दा अविरतपणे कार्यरत असे.

- प्रेषितांना दोन प्रकारे बदनाम करण्यात येत असे, प्रेषितांवर अवतरित झालेल्या ग्रंथामध्ये अथवा संदेशामध्ये खोटऱ्या आणि कपोलकल्पित गोष्टी बेमालूमपणे सामिल करण्यात येत आणि दुस-या प्रकारात प्रेषितांच्या चारित्र्य हननाचा प्रयत्न होत असे.

- ह.मूसा (अ.स.) यांच्या शिकवणीचे पालन ह.इसा (अ.स.) यांनी स्वतः केले, तसेच लोकांना त्याच शिकवणीचे पालन करण्याचा उपदेश केला.

ह.मूसा (अ.स.) यांनी विवाह केला अणि त्यांचे वैवाहिक जीवन त्यांच्या शिकवणीचा एक महत्त्वाचा पैलू आहे. ह.इसा (अ.स.) यांनी विवाह केला असता तर तो ह.मूसा (अ.स.) यांच्या शिकवणीचा एक भाग होता, यामध्ये बदनामीकारक काही नव्हते तथापि ह.इसा (अ.स.) स्वतःला धर्माच्या पुर्नस्थापनेसाठी वाहून घेतल्याने वयाच्या ३२ वर्षापर्यंत ते अविवाहित राहिले आणि शत्रूंनी त्यांचा वध करण्याचा प्रयत्न केल्यानंतर परमेश्वराने त्यांना सदेह आकाशात उचलुन घेतले.

ह.इसा (अ.स.) यांच्या धरतीवरून जाण्यास २००० वर्ष पूर्ण झाली आहेत, तरी देखील आजही त्यांची बदनामी आणि असत्य गोष्टींची गुंफण निरंतर चालू आहे. ह.इसा (अ.स.) यांची St. Mary Magdalene नावाची एक गुप्त पत्नी आणि St. Michael नावाचे एक गुप्त पुत्र होते असा अपप्रचार करण्यात येत आहे.

या विषयावर Dan Brown यांनी The Da Vinci Code नावाचे एक पुस्तक लिहिले आहे आणि या पुस्तकावर आधारित एक चित्रपट सुध्दा निर्माण करण्यात आला आहे.

कॅथलिक चर्चने हा चित्रपट पाहण्यास मनाई केली आहे. तथापि ज्यापासून लोकांना परावृत्त करण्याचा प्रयत्न होतो, लोक तेच कृत्य मोठ्या प्रमाणात करतात.

अशा प्रकारे ह.इसा (अ.स.) यांची शिकवण बदलण्याचा प्रयत्न त्यांच्या शत्रूंनी मोठ्या प्रमाणात केला. ह.इसा (अ.स.) या पृथ्वीतलावरून गेल्यानंतर १०० वर्षाच्या कालावधीनंतर बायबल लिहिण्यात आले आहे. बायबलला पुस्तकी रूप देताना,

त्यामध्ये अशा गोष्टी सामिल करण्यात आल्या, ज्यांची पापभिरू माणूस कल्पना देखील करू शकत नाही.

उदाहरणार्थ ह. लूत (अ.स.) हे सोडोम या शहरामध्ये प्रेषित होते. सोडोम शहराची अधिकतर जनता समलिंगी संबंध ठेवणारी होती. त्यांच्या या कुकर्मामुळे प्रक्षुब्ध झालेल्या परमेश्वराने, दोन फरिश्ते पाठवले, ज्यांनी तप्त गंधकाचा वर्षाव करून, ह.लूत (अ.स.) यांच्या परिवारा ऐवजी सर्वांना जाळुन टाकले. यामध्ये ह.लूत (अ.स.) यांच्या पत्नीचा समावेश होता.

या घटनेनंतर ह.लूत (अ.स.), त्यांच्या दोन मुलींसह जंगलात राहू लागले. लग्नासाठी कोणीही पुरूष जिवंत नसल्याचे जेव्हा त्यांच्या मुलींच्या लक्षात आले, तेव्हा त्यांनी ह. लूत (अ.स.) यांना भरपूर दारू पाजली, त्यांच्यासोबत सहवास केला आणि त्या गर्भवती झाल्या. (बायबल, Genesis, Chp. 19, Verses 30)

अशा प्रकारे बायबलमध्ये जे लिहिण्यात आले आहे, ते संभव आहे काय?

मुळीच नाही.

कारण केवळ एक शहर नष्ट करण्यात आले होते, पूर्ण विश्व नाही, त्यामुळे इतर शहरातील पुरूषांसोबत, ह.लूत (अ.स.) यांच्या मुलींचा विवाह होऊ शकला असता. तसेच प्रत्येक धर्मात मद्य पिणे निषिध्द आहे, कोणतेही प्रेषित कदापिही मद्यपान करत नाहीत.

- अशाच प्रकारे बायबलमध्ये, ह.दाऊद (अ.स.) या प्रेषिताविषयी अत्यंत घाणेरडे लिहिण्यात आले आहे. ह. दाऊद (अ.स.) यांना एका सैनिकाची पत्नी खूप आवडली, तेव्हा त्यांनी त्या सैनिकास युध्दभूमीवर पाठवले आणि तिच्या बरोबर संबंध प्रस्थापित केले. (सॅम्युएल २.११)

ह.दाऊद (अ.स.) एक महान प्रेषित होते, त्यांच्यावर जबुर नावाचा ग्रंथ परमेश्वराने अवतरित केला होता. ह.दाऊद (अ.स.) एक दिवस जेवत आणि दुस-या दिवशी रोजा (उपवास) करत, त्यांचा आवाज अत्यंत मधूर होता, ते जेव्हा जबुर या ग्रंथाचे पठण करत, तेव्हा पर्वत सुध्दा डोलत असत. ह.दाऊद (अ.स.), पॅलेस्टाइनचे राजे होते, त्यांचे पुत्र, ह.सुलैमान (अ.स.) हे देखील अत्यंत शक्तिशाली सत्ताधीश होते, त्यांच्या ९९ पत्नी होत्या. ह.दाऊद (अ.स.) यांनी इच्छिले असते तर, त्यांनी देखील जास्त विवाह केले असते. एक सत्ताधीश, जो तपस्वी आहे, त्याला एका सैनिकाला धोका देण्याची गरजच काय, पण अशा गोष्टी बायबलमध्ये लिहिल्या आहेत.

याचे कारण काय आहे?

याचे कारण आहे, सलमान रश्दी सारख्यांची समाजात असणारी किड. सलमान रश्दी यांचे वैशिष्ट्य काय आहे? त्यांच्या विचारात केवळ सेक्सचे आकर्षण आणि धर्माचा तिरस्कार ओतप्रोत भरला आहे. यामुळे ज्यांना सेक्सचे आकर्षण आणि धर्माचा तिरस्कार आहे अशा लोकांचे ते हिरो आहेत. याच रश्दीला ब्रिटीश सरकारने 'सर' ही उपाधी दिली आहे. याच रश्दीने जर ह.मुहम्मद (स.अ.) यांची स्तुती केली तर त्यास त्वरित आतंकवादी ठरविण्यात येईल.

सलमान रश्दी सारख्यांनी मोठ्या प्रमाणावर धादांत खोट्या गोष्टी लिहिल्या आहेत. समाजातील या घटकाने, आपल्या स्वार्थापोटी, सत्याला बदलण्याचा कसोशीने प्रयत्न केला आणि सत्य शिकवणीची मोडतोड स्वतःच्या अभद्र चरित्रानुसार केली. सत्ताधा-यांनी जाणिवपूर्वक याचा स्वीकार केला आणि पवित्र ग्रंथात अशा धादांत खोट्या गोष्टींचा समावेश करण्यात आला.

ह.इसा (अ.स.) यांची बदनामी करून

लोकांना काय साध्य होणार?

ह.इसा (अ.स.), यांच्या चारित्र्याबाबत लोकांच्या मनात संदेह निर्माण झाला तर लोकांची इसाई धर्माबद्दल श्रद्धा नष्ट होईल.

मनुष्य जेव्हा परमेश्वरावर श्रद्धा ठेवतो, तेव्हा त्याचे नितीधैर्य वाढते आणि अन्यायाला विरोध करण्यास तो मुळीच घाबरत नाही. मनुष्यामध्ये, मृत्यूपश्चात परमेश्वराला पाप-पुण्याचा हिशोब द्यावा लागणार आहे असा ठाम विश्वास निर्माण होतो, तेव्हा तो पाप करत नाही तसेच ऐषोआरामी जीवन जगण्याची त्याची लालसा कमी होते.

नास्तिक भित्रा आणि मरणास घाबरणारा असतो. मृत्यूपश्चात येणा-या आयुष्यावर त्यांचा विश्वास नसल्याने, इहलोकातच सर्व प्रकारची सुखे, कोणताही विधीनिषेध न बाळगता, प्राप्त करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो, यामुळेच एक प्रकारचे पशुतुल्य आयुष्य ते जगतात.

ज्यु समुदाय पूर्ण जगावर राज्य करू इच्छितो, यासाठी त्यांची एक गुप्त आणि दिर्घकालीन योजना आहे, ज्यास Protocol असे संबोधण्यात येते.

याच Protocol मध्ये, जगावर तुम्हाला राज्य करावयाचे असेल तर लोकांचा धर्मावरील विश्वास नष्ट करा, असे नमुद करण्यात आले आहे. या योजनेनुसार जगातील काही संस्था तसेच प्रगतिशील देश कार्यरत आहेत.

अधर्मी, पशूतुल्य आणि भयभीत असतो, त्यामुळे त्यावर राज्य करणे सोपे असते. ईश्वरावर श्रध्दा असणारा दरिद्री अवस्थेतही अन्याय आणि जुलूमाविरूध्द खंबिरपणे उभा रहातो.

प्रेषितांना बदनाम करण्याचे षडयंत्र, जगावर राज्य तसेच इतर धर्मियांना नष्ट करू इच्छिणा-यांनी रचले आहे.

याच षडयंत्राचे बळी ह.मुहम्मद (स.अ.) आणि मुस्लिम जगत आहे. याचे कारण, ख्रिश्चनानंतर मुस्लिमांचीच संख्या जगात सर्वात जास्त आहे.

सदर पुस्तक ह.मुहम्मद (स.अ.) यांचा परिचय करून देण्यासाठी लिहिले आहे. तथापि ह.मुहम्मद (स.अ.) यांच्याविषयी असणारे गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न देखील यात करण्यात आला आहे.

मुख्यतः दोन प्रकारे ह.मुहम्मद (स.अ.) यांना बदनाम करण्याचा डाव रचण्यात आला आहे, त्यांचे वैवाहिक जीवन आणि शत्रूसोबत युध्दाची शिक्षा, हे ते दोन मुद्दे आहेत. पुढील प्रकरणात या दोन्ही विषयांचा उहापोह करण्यात आला आहे.

********

Protocol हे पुस्तक आपण खालील पत्त्यावरून प्राप्त करू शकता.

अर्रहमान प्रिंटर व पब्लीशर्स, १८, जकरिया स्ट्रीट, कोलकता-७०००७३

# प्रकरण-११
# ह.मुहम्मद (स.अ.) हिंसेचे समर्थक होते का?

ह.मुहम्मद (स.अ.) यांनी हिंसेची शिकवण दिली हा आरोप सातत्याने करण्यात येतो. ह.मुहम्मद (स.अ.) यांनी हिंसेची शिकवण दिली अथवा ते स्वतः हिंसेचे बळी ठरत असताना अहिंसेचे समर्थन सातत्याने करत, याचा परामर्ष घेऊ या.

- ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या वयाच्या ४० व्या वर्षी परमेश्वराने त्याचा संदेश लोकापर्यंत पोहोचवण्याचा आदेश दिला. ह.मुहम्मद (स.अ.) यांना ६३ वर्षांचे आयुष्य लाभले. वयाच्या ५५ वर्षापर्यंत म्हणजेच प्रेषित बनल्यानंतर सुरवातीच्या १५ वर्षांच्या कालावधीमध्ये इस्लाम विरोधकांच्या अत्याचारांना हाताने अथवा शस्त्राने प्रतिकार करण्याची मुभा अथवा कोणत्याही प्रकारे बदला घेण्याची आज्ञा, परमेश्वराने प्रेषितांना अथवा त्यांच्या अनुयायांना दिली नव्हती. प्रेषित स्वतः आणि त्यांचे अनुयायी, विरोधकांचे भीषण अत्याचार सहन करत किंवा अगदीच असह्य झाल्यास, मक्का शहर सोडून इतरत्र निघून जात.

ह.मुहम्मद (स.अ.) यांनी सहन केलेल्या अत्याचारांची उदाहरणे खाली देण्यात येत आहेत.

- ह.मुहम्मद (स.अ.) प्रेषित बनल्यानंतर सुरूवातीची तीन वर्षे, केवळ व्यक्तिगत स्तरावर धर्मप्रचार करण्याचा आदेश होता. चौथ्या वर्षी सार्वजनिक ठिकाणी भाषणाव्दारे धर्मप्रचाराचा आदेश प्राप्त झाला. हा आदेश मिळताच, ह.मुहम्मद (स.अ.) यांनी काबा शरीफ समिप लोकांना परमेश्वराचा संदेश दिला, लगोलग समुदायाने त्यांना घेरले. या प्रसंगी, ह.मुहम्मद (स.अ.) यांचे रक्षण करताना ह.खदीजा (रजि.) यांचे ज्येष्ठ पुत्र ह. हारिस बिन अबि हाले (रजि.) मृत्युमुखी पडले.

- अबू लहब आणि उक्बा बिन अबी मुईत, ह.मुहम्मद (स.अ.) यांचे शेजारी होते, हे दोघे सतत ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या घरात घाण टाकत.

ह.मुहम्मद (स.अ.) नमाज पडण्यासाठी पहाटे काबा शरीफ मध्ये जात. येण्या-जाण्याच्या रस्त्यावर अबू लहब यांची पत्नी ह.मुहम्मद (स.अ.) यांना त्रास देण्यासाठी काटे अंथरत असे.

- अबू लहब हा प्रेषितांचा सख्खा चुलता होता, त्याच्या मुलांसोबत प्रेषितांच्या दोन मुलींचे लग्न झाले होते, पण मुलींची पाठवणी झाली नव्हती. अबू लहब याने दोन्ही मुलांवर दबाव आणून प्रेषितांच्या मुलींना घटस्फोट देण्यास भाग पाडले. हे कृत्य अरब जगतामध्ये अत्यंत निंदनिय समजण्यात येत असे.

- प्रेषित बनल्यानंतर ५ व्या वर्षी, एके दिवशी ह.मुहम्मद (स.अ.) काबा शरीफ मध्ये नमाज पडत होते. नमाज दरम्यान सजदा करताना उक्बा बिन अबी मुईत याने प्रेषितांच्या मानेवर, उंटांच्या पोटातील आतडे इ. घाण ठेवून दिली, या मोठ्या भारामुळे, ह.मुहम्मद (स.अ.) उठून उभे राहू शकले नाहीत. या घटनेची माहिती आपल्या घरी कळताच, ह. फातिमा (रजि.), प्रेषितांच्या कन्या धावत आल्या आणि उंटाची घाण आपल्या मानेवरून हटवली.

- ह.मुहम्मद (स.अ.) एके दिवशी काबा शरीफ मध्ये नमाज पडत असताना उक्बा बिन अबी मुईत याने चादरीचा दोर त्यांच्या गळ्यात घातला आणि फास देऊ लागला,

प्रेषितांचा श्वास गुदमरला आणि डोळे पांढरे पडले. ह.अबू बकर (रजि.) यांनी मोठ्या प्रयासाने या फासातून प्रेषितांची सुटका केली, याची किंमत ह. अबू बकर (रजि.) यांना भीषण मारहाणीच्या रूपात मोजावी लागली.

- ह.मुहम्मद (स.अ.) यांचे अनुयायी इस्लाम स्वीकारण्यापूर्वीची एक घटना नमूद करतात, त्यांनी मक्का शहरामध्ये एका सुंदर आणि उमद्या तरूणास इस्लामची शिकवण देताना पाहिले. त्या तरूणाविषयी विचारणा केल्यानंतर तो कुरैश खानदानातील मुहम्मद नावाचा तरूण आहे व तो अधर्मी झाला आहे, अशी माहिती त्यांना मिळाली. मध्यान्ह झाली तरीही तो तरूण लोकांना उपदेश करतच होता. तेवढ्यात एक जण तेथे आला आणि त्या तरूणाच्या तोंडावर थुंकला, दुस-याने त्याचा पोशाख फाडला, तिस-याने त्याच्या डोक्यावर माती ओतली आणि चौथ्याने थप्पड मारली. त्या तरूणाने तोंडातून कोणताही शब्द न काढता हा अत्याचार सहन केला. हा प्रकार घडल्यानंतर एक मुलगी ओक्साबोक्शी रडत पाण्याचे भांडे घेऊन तेथे आली. त्या मुलीला रडताना पाहून त्या तरूणाचे डोळे भरून आले आणि तो उद्‌गारला, "मुली आपल्या पित्याबद्दल वाईट वाटून घेऊ नकोस. तुझ्या पित्याचे रक्षण परमेश्वर स्वतः करतो आणि प्रत्येक कच्च्या आणि पक्क्या घरामध्ये इस्लाम निश्चितपणे दाखल होईल". पाणी आणणारी त्यांची मुलगी जैनब (रजि.) आहे, असे त्या अनुयायाला समजले. (बसीरत अफरोज वाक्यात, सफा नं २२)

- प्रेषितांच्या जेष्ठ कन्या ह.जैनब (रजि.) या घटनेनंतर काही वर्षांनी मक्काहून मदीनेस जात होत्या. अकरमा बिन अबू जहल आणि त्याच्या साथिदारांनी ह.जैनब (रजि.) यांचा रस्ता रोखून त्या ज्या उंटावर स्वार झाल्या होत्या, त्यास जखमी केले, परिणामी ह.जैनब (रजि.) उंटावरून खाली पडल्या. यावेळी ह.जैनब (रजि.) गर्भवती होत्या, या अपघातात त्यांच गर्भपात झाला आणि याच दुखण्यामुळे काही वर्षानंतर त्यांचे निधन झाले.

- ह.मुहम्मद (स.अ.) प्रेषित बनल्यानंतर ७ व्या वर्षात, इस्लामचा प्रसार मोठ्या गतीने होत होता. मक्कास्थित सरदारांना इस्लामचा प्रसार रोखणे अशक्य आहे याची जाणीव होताच, त्यांनी ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या संपूर्ण कबिल्यावर बहिष्कार टाकला. या कबिल्याला शहराबाहेर, दोन पर्वतामधील दरीत राहण्यास भाग पाडण्यात आले.

  या बहिष्कारामुळे सर्व व्यवहार ठप्प झाले, धान्य संपल्याने संपूर्ण कबिल्याची उपासमार होऊ लागली. भुकेने व्याकुळ होऊन रडणा-या लहान मुलांचा आर्त स्वर दूरवर ऐकू येत असे. भुक शमविण्यासाठी तरूण, जुने कातडेदेखील उकळून खात. ह.मुहम्मद (स.अ.) आणि संपूर्ण कबिला तीन वर्षापर्यंत, बहिष्काराचा अतोनात जुलूम सहन करत होता. प्रेषितांच्या ६५ वर्षांच्या पत्नी ह.खदीजा (रजि.) आणि ८० वर्षांचे चुलते अबू तालिब, या बहिष्काराच्या असह्य त्रासामुळे गलितगात्र झाले होते आणि बहिष्कार संपुष्टात आल्यानंतर केवळ एका वर्षाच्या आतच दोघांचे निधन झाले.

- प्रेषित बनल्यानंतर १० व्या वर्षी, ह.मुहम्मद (स.अ.) यांनी ताएफ नामक ठिकाणी इस्लामचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. अब्दिया लैल, मसउद आणि हबिब या ताएफच्या तीन सरदारांनी प्रेषितांना अत्यंत अपमानास्पद वागणूक दिली. हे सरदार स्वतः काही ऐकू इच्छित नव्हते तसेच तेथील जनतेनेही काही ऐकू नये अशी त्यांची धारणा होती. या तिघांनी ताएफ मधील काही गुंड आणि बदमाषांना ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या

पाठीमागे पाठवले आणि ते जेथे जेथे जातील तेथे तेथे या बदमाषांना प्रेषितांची टवाळी, निंदा करण्यास आणि दगड गोटे मारण्यास सांगितले. सुमारे दहा ते वीस दिवस हा भीषण अत्याचार सहन करत, ह.मुहम्मद (स.अ.) लोकांना उपदेश करतच होते.

शेवटच्या दिवशी ताएफमधील लोकांनी जुलूमाचा कहर केला. आपल्या हातात दगड गोटे घेऊन ते रांगेत उभे राहिले, त्यांच्या समोरून चालत जाताना, ह.मुहम्मद (स.अ.) जमिनीवर पाय टेकवताच, त्यांच्या घोट्यावर दगड मारण्यास सुरूवात केली. या लोकांचा, प्रेषितांचा वध न करता केवळ प्रचंड यातना द्यायचा निश्चय होता, यासाठी, तीन मैल अशा प्रकारचा पाठलाग आणि दगडांचा वर्षाव त्यांनी केला. त्यांच्या वस्तीमधून बाहेर पडताना, जखमा आणि वेदनामुळे जेव्हा प्रेषित खाली बसत, तेव्हा हे लोक प्रेषितांना धरून उठवत, शिवीगाळ करत, टाळ्या वाजवत, चालण्यास भाग पाडत आणि पुन्हा दगडांचा वर्षाव करत. दगडाच्या मा-यामुळे प्रेषितांना मोठ्या प्रमाणावर जखमा झाल्या, प्रेषितांचे संपूर्ण शरीर रक्तबंबाळ झाले, जखमामधून वाहणा-या रक्ताने प्रेषितांचे जोडे भरले आणि प्रेषित बेशुध्द होऊन खाली पडले. ह.जैद (रजि.) यांनी ह.मुहम्मद (स.अ.) यांना पाठीवर घेतले आणि ताएफच्या वस्तीबाहेर आणले.

या अपार छळानंतर देखील, प्रेषित ह.मुहम्मद (स.अ.) यांनी ताएफच्या लोकांना कोणताही शाप दिला नाही तर त्यांचे वंशज इस्लामचा स्वीकार करतील असा आशावाद व्यक्त केला.

- मक्का शहरामध्ये १३ वर्षे, ह.मुहम्मद (स.अ.) यांनी अन्वनित अत्याचार सहन केले. लोक अत्यंत नीच वर्तन करत, गुंडांच्या टोळ्या टवाळी करत, रस्त्यावरून जात असताना घाण अंगावर टाकण्यात येत असे, शिवीगाळ करण्यात येत असे, डोक्यावर माती ओतण्यात येत असे, रस्त्यामध्ये काटे अंथरण्यात येत असत, यातना देण्याच्या अनेक प्रकारात कोणतीही कमतरता ठेवण्यात येत नसे. अबू लहबने स्वतः एकदा दगडाने आपला वध करण्याचा प्रयत्न केला.

अशा प्रकारच्या हजारो प्रसंगी यातना, त्रास प्रेषितांनी मक्का शहरामध्ये सहन केला आहे. प्रेषित बनल्यानंतर १३ व्या वर्षी, मक्का शहरातील चाळीस मारेक-यांनी एके रात्री आपणास ठार कारण्याच्या उद्देशाने आपल्या घरास वेढा टाकला होता. परमेश्वराच्या असिम कृपेमुळे त्या रात्री सुरक्षितपणे घराबाहेर पडण्यात प्रेषित यशस्वी झाले आणि आपण मक्का सोडून मदीनेस हिजरत केली.

- ओहदच्या युद्धा दरम्यान अब्दुल्ला इब्ने कुमैय्या याने जोरदार हल्ला केला, ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या चेह-यावर मोठ्या जखमा झाल्या. शिरस्त्राणाच्या दोन कड्या चेह-यामध्ये रुतून बसल्या. उत्बा अबी वकास याने, ह.मुहम्मद (स.अ.) यांना दगड त्वेषाने फेकुन मारला. हा आघात एवढा मोठा होता, ज्यामुळे प्रेषितांचे दात तुटले आणि खालचा ओठ क्षतिग्रस्त झाला. अब्दुल्लाह बिन शहब जौहरी याने दगड मारून प्रेषितांचे कपाळ रक्तबंबाळ केले.

प्रेषितांच्या चेह-यामध्ये खोलवर रूतलेल्या शिरस्त्राणाच्या कड्या काढण्यासाठी, ह.अबू उबैद इब्ने जर्राह (रजि.) यांनी अथक प्रयत्न केले, शेवटी त्यांनी स्वतःच्या दातांनी या कड्या ओढल्या. या प्रयत्नात त्यांचा स्वतःचा दात तुटला, प्रचंड बळ लावल्यामुळे दात तुटताच ते स्वतः पाठीमागे जोरात आदळले. याचप्रमाणे दुसरी कडी काढण्याच्या प्रयत्नात त्यांचा दुसरा दातसुध्दा तुटला. ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या जखमांमधून होणारा रक्तस्त्राव थांबत नव्हता, तेव्हा प्रेषितांना

सुरक्षित स्थळी नेण्याच्या प्रयत्नात, आमिर फासिक याने खोदलेल्या आणि पाना फांद्यांनी झाकलेल्या खड्डयामध्ये प्रेषित पडले. ह. अली (रजि.) आणि ह. तलहा बिन अब्दुल्लाह (रजि.) यांनी महत्प्रयासाने प्रेषितांना बाहेर काढले आणि सुरक्षित ठिकाणी पोहचवले. (सि-सबे अहमद मुजनबा)

- एवढ्या मोठ्या प्रमाणात अन्वनित अत्याचार सहन करून सुध्दा प्रेषितांनी कोणालाही शाप दिला नाही की वैरही केले नाही.

ज्या शहरातील जनतेने २१ वर्षे अव्याहतपणे भीषण अत्याचार, राक्षसी जुलूम केला होता, ते मक्का शहर आपल्या ताब्यात घेतल्यानंतर, प्रेषितांनी सर्वांनी जाहीर माफी दिली, कोणाबरोंबर कसलाही हिशोब चुकता केला नाही. इतिहासामध्ये अशा पराकोटीच्या क्षमाशिलतेचे केवळ एक उदाहरण मिळते का?

मुळीच नाही !

**इस्लामची अहिंसेची शिकवण.**

उपरोक्त उदाहरणे ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या असिम सहनशिलतेची आणि दयाळूपणाची आहेत. आता आपण ह.मुहम्मद (स.अ.) यांनी अहिंसेविषयी दिलेल्या इस्लामी शिकवणीचा परामर्ष घेऊ.

- परमेश्वर पवित्र कुरआन मध्ये नमूद करतो, ज्याने एखाद्या मनुष्याला खुनाबद्दल अथवा पृथ्वीतलावर उपद्रव पसरविण्याच्या गुन्ह्या व्यतिरिक्त ठार केले (एवढा मोठा अपराध केला) तर त्याने जणू काही सर्व मानवजातीस ठार केले आणि एखाद्याने निरपराध्याचे प्राण वाचवले तर त्याने तमाम मानवजातीस जीवदान दिले. (पवित्र कुरआन - सुरे माईदा — ३२)

- परमेश्वर पवित्र कुरआन च्या सुरे कसस च्या आयत क्र.७७ चा सारांश पुढील प्रमाणे आहे, देशामध्ये दंग्याधोप्यांची अपेक्षा करू नका, कारण परमेश्वर दंगेखोरास नापसंत करतो. (पवित्र कुरआन सूरे कसस-७७)

- ह.मुहम्मद (स.अ.) म्हणाले, तुम्ही पृथ्वीतलावर राहणा-यांवर प्रेम आणि उपकार करा, आकाशात असणारा (परमेश्वर) तुम्हांवर प्रेम आणि उपकार करेल. (अबू दाऊद, तिरमीजी)

- ज्या व्यक्तीचा शेजारी त्रस्त आहे, अशी व्यक्ती मुस्लिम होऊ शकत नाही. (बुखारी)

**ह.मुहम्मद (स.अ.) यांचे आदेश**

- अबू हुरैरा (रजि.) नमूद करतात, ह.मुहम्मद (स.अ.) यांनी फर्मावले, शत्रूबरोबर युध्दाची अपेक्षा (इच्छा) करू नका आणि युध्द सुरू झाल्यास सोशिकपणा दाखवा. (बुखारी, किताबुल जिहाद ५३)

- ह.अब्दुल्ला बिन अफी (रजि.) एक प्रसंग विषद करतात, एकदा रणांगणावर ह.मुहम्मद (स.अ.) यांनी सूर्यास्तापर्यंत शत्रूच्या हल्ल्याची वाट पाहिली, तथापि शत्रूने आक्रमण केले नाही (आणि ह.मुहम्मद (स.अ.) यांनीही स्वतः प्रथम आक्रमण केले नाही). सूर्यास्तानंतर, ह.मुहम्मद (स.अ.) यांनी स्वतःच्या फौजेस संबोधित करताना जे म्हटले, त्याचा भावार्थ पुढीलप्रमाणे आहे, युध्दाची इच्छा करू नका आणि शांती व समृध्दीची प्रार्थना करा, तथापि तुम्हावर आक्रमण झालेच तर त्याचा धैर्याने मुकाबला करा आणि सोशिकपणा दाखवा. (बुखारी १५६)

- ह.अबू सईद (रजि.) नमूद करतात, ह.मुहम्मद (स.अ.) यांना विचारणा करण्यात आली, कोणती व्यक्ती सर्वोत्तम आहे आणि कोणाचा दर्जा परमेश्वरापाशी मोठा आहे? आपण म्हणालात ''परमेश्वराची सातत्याने आठवण करणारे (परमेश्वराचा जप करणारे)

पुरूष आणि स्त्रिया". पुनःश्च ह.मुहम्मद (स.अ.) यांना विचारणा करण्यात आली, " हे परमेश्वराचे प्रेषित, परमेश्वराचा जप हा परमेश्वराच्या धर्मासाठी बलिदान करणा-या शहिदापेक्षा मोठा दर्जा मिळवून देणारा आहे का? ". या प्रश्नावर ह.मुहम्मद (स.अ.) यांनी उत्तर दिले, "परमेश्वराच्या शत्रुवर एखाद्या व्यक्तीने तलवार सातत्याने चालवली, ज्यामुळे त्याच्या तलवारीचे तुकडे झाले आणि तो स्वतः रक्ताने न्हाऊन निघाला (त्याने एवढा मोठा लढा दिला), तरीही परमेश्वराचे नामस्मरण करणा-याचा दर्जा, परमेश्वरापाशी शहिदापेक्षा श्रेष्ठ आहे . (अहमद तिरमीजी Vol-1, मुन्तखब अबवाब, हदीस ४२९).

- ह. अबू बकर सिद्दीक (रजि.) नमूद करतात, ह.मुहम्मद (स.अ.) यांना विचारणा करण्यात आली. "सर्वात सन्माननीय व्यक्ती कोण आहे?" (अर्थात प्रलयदिनी कोणती व्यक्ती सफल आणि सन्मानित असेल) ह.मुहम्मद (स.अ.) यांनी उत्तर दिले, "ज्या व्यक्तीस दिर्घायुष्य लाभले आणि त्या व्यक्तीने आयुष्यभर पुण्यकर्म केले". पुन्हा त्याच व्यक्तीने विचारले, "सगळ्यात मोठा दुर्जन कोण आह?".(भावार्थ - प्रलयदिनी असफल ठरल्यामुळे कोणाला नरकात जावे लागेल? ) ह.मुहम्मद (स.अ.) यांनी उत्तर दिले, " ज्याला दिर्घायुष्य लाभले आणि त्याने कुकर्म केले ". (मुस्नद अहमद, मारूफूल हदिस)

- ह.उबेद बिन खालिद (रजि.) यांनी पुढील एक घटना विषद केली आहे. दोन व्यक्ती मदीना येथे आल्या व त्यांनी इस्लामचा स्वीकार केला, एका स्थानिक मुस्लिम व्यक्तीकडे त्यांची व्यवस्था प्रेषितांनी केली. यातील एका व्यक्तीचे निधन युध्दात झाले आणि काही दिवसानंतर दुस-या व्यक्तीचे निधन राहत्या घरी झाले. दुस-या व्यक्तीचा दफनविधी करणा-यांना ह.मुहम्मद (स.अ.) यांनी विचारले, या मृत व्यक्तीसाठी तुम्ही परमेश्वरापाशी काय मागितले? (मृतासाठी काय प्रार्थना केली). लोकांनी उत्तर दिले, परमेश्वर यांना मुक्ती देवो आणि यांचे जे साथी युध्दामध्ये शहीद झाले आहेत, त्यांच्यासोबत यांना स्वर्गामध्ये ठेव, अशी मागणी आम्ही परमेश्वरापाशी केली आहे. हे उत्तर ऐकून ह.मुहम्मद (स.अ.) म्हणाले, ज्यांचे नंतर निधन झाले आहे, त्यांनी निधन झालेल्या शहीदापेक्षा जास्त नमाज आणि सत्कार्य केले आहे, त्याचे काय? (नंतर निधन झालेल्या व्यक्तीचे नमाज पठण आणि सत्कार्य अधिक आहे) त्यानंतर ह.मुहम्मद (स.अ.) म्हणाले, या दोघांच्या दर्जात एवढे अंतर आहे जसे धरती आणि आकाशाच्या दरम्यान आहे. (अबू दाउद, निसाई, मारूफुल हदीस जिल्द-२, हदीस-३)

ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या उपरोक्त उद्‌गारांचा अभ्यास करा. शहीदापेक्षा ज्याने परमेश्वराची आराधना जास्त केली आहे, त्याचा दर्जा मोठा होतो, अर्थात युध्दास गौण स्थान देण्यात आले आहे. धर्मासाठी केवळ जीव देणे अथवा घेणे हे पवित्र कार्य आहे, ही इस्लामची शिकवण मुळीच नाही. दिर्घायुष्य लाभले आणि आपण परमेश्वराची आराधना सातत्याने केली, तर आपला दर्जा उत्तुंग असेल आणि स्वर्ग प्राप्ती विनासायास होईल, हीच इस्लामची शिकवण आहे.

- ह.इब्ने मसउद (रजि.) नमूद करतात, प्रेषितांनी फर्मावले, संपूर्ण विश्वातील प्राणीजगत, परमेश्वराचा परिवार आहे. जो कोणी यांच्या बरोबर श्रेष्ठ व्यवहार करतो, परमेश्वर त्याला अधिक पसंत करतो. (मिश्कात, तुर्जूमानत हदीस, जिल्द-२, हदीस २३९)

- ह.अबू हुरैरा (रजि.) नमूद करतात, ह.मुहम्मद (स.अ.) म्हणाले, प्रलयदिनी परमेश्वर एका व्यक्तीस विचारेल, "हे आदमच्या मुला, मी आजारी होतो, तहानलेला, भुकेलेला होतो, पण तू माझी

देखभाल केली नाहीस की खाऊ घातले नाही की पाणी पाजले नाही''. या प्रश्नावर आश्चर्याने ती व्यक्ती म्हणेल, '' हे परमेश्वरा तू तर सगळ्या विश्वाचा निर्माणकर्ता आहेस, मी भले तुझी देखभाल कशी करू शकतो? ''. परमेश्वर त्या व्यक्तीस उत्तर देईल, '' माझा अमुक अमुक भक्त आजारी होता, भुकेलेला होता, हे तू जाणत नव्हतास काय? जर तू त्याची सेवा केली असती, त्याला खाऊ-पिऊ घातले असते, तर मी तुला त्याच्या जवळच भेटलो असतो''. (तर्जुमाने हदिस Vol-2, हदीस २४५)

- ह.मुहम्मद (स.अ.) यांनी एक घटना विषद केली आहे, तहानलेल्या प्रवाशाने विहिरीत उतरून आपली तहान भागवली. बाहेर आल्यानंतर त्याने एक तहानलेला कुत्रा, ओली माती चाटत आहे, हे पाहिले. त्याने मनोमन विचार केला, तहानेमुळे मी जसा व्याकुळ झालो होतो तसाच हा मुका प्राणी व्याकुळ झाला आहें. तो मनुष्य पुनःश्च विहिरीत उतरला, आपल्या जोड्यात पाणी भरून, तो जोडा दातात धरून विहिरीच्या बाहेर आला आणि कुत्र्यास पाणी पाजले. त्याचे हे कृत्य आवडल्याने, परमेश्वराने त्याचे पूर्वीचे अपराध माफ केले. ही घटना ऐकल्यानंतर लोकांनी विचारले, ''हे परमेश्वराचे प्रेषित, प्राणीमात्रांच्या सेवेमुळे आम्हास पुण्य मिळेल काय?'' प्रेषितांनी उत्तर दिले, ''प्रत्येक सजिवाच्या सेवेमुळे तुम्हास पुण्य मिळेल''. (बुखारी जिल्द ३, किताब ६४६ नं/४३)

- ह.अनस (रजि.) नमूद करतात, ह.मुहम्मद (स.अ.) मला म्हणाले, '' माझ्या मूला, शक्य असल्यास, तुझ्या ह्रदयात कोणतीही अमंगल भावना न बाळगता, आयुष्य व्यतीत कर आणि माझा जीवन व्यतीत करण्याचा मार्ग हाच आहे. जो माझ्यावर निस्सीम प्रेम करतो, तो माझ्या प्रमाणेच जीवन जगतो, यामध्ये तिळमात्र संशय नाही आणि जो माझ्यावर प्रेम करतो, तो माझ्याबरोबर स्वर्गात असेल''. (मुस्लिम)

- ह.मुहम्मद (स.अ.) फर्मावतात, मुस्लिम शासनामध्ये, मुस्लिमेतर जनतेच्या जीविताचे, संपत्तीचे आणि सन्मानाचे रक्षण करणे, मुस्लिम शासकाचे परम कर्तव्य आहे. एखादा मुस्लिम, एखादया मुस्लिमेतराची मालमत्ता जबरदस्तीने हस्तगत करेल अथवा त्याचे शोषण करेल अथवा त्यांना त्रास देत असेल, तर प्रलयदिनी सर्व मानवजातीस, आपल्या पाप-पुण्याचा हिशोब परमेश्वराच्या दरबारात द्यावा लागेल, त्या दिवशी, मी स्वतः, त्या मुस्लिमा विरूध्द परमेश्वराच्या दरबारात, मुस्लिमेतराच्या बाजूने खटला लढवेन. (अबू दाउद, सफीना निजात १५१)

### पवित्र कुरआन मध्ये युध्दाची शिकवण कशासाठी?

उपरोक्त उदाहरणात, प्रेषितांच्या आज्ञेमध्ये हिंसेला प्रोत्साहन अथवा हिंसेची शिकवण कोठेच नाही, हे आपण पाहिले आहे, तर मग पवित्र कुरआन मध्ये काही आयत मध्ये, ईश्वराच्या शत्रू विरूध्द युध्दाचा आदेश का देण्यात आला आहे? याची चार प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

### १) <u>न्याय :</u> (Justice)

- ह.मुहम्मद (स.अ.) यांनी ईश्वराचा संदेश लोकांपर्यंत पोहचविण्यास सुरूवात केल्यानंतर, ह. सुमैया (रजि.) या वृध्देने आणि त्यांच्या परिवाराने इस्लामचा स्वीकार केला.

मक्का शहरातील लोक, खास करून धनाढ्यांना, एकानेही इस्लामचा स्वीकार करावा असे वाटत नव्हते. एवढे अडथळे आणुनही जो मुसलमान बनत असे, त्यास प्रचंड यातना देण्यात येत.

याच लोकांनी, ह.सुमैय्या (रजि.), त्यांचे पती ह.यासर बिन आमिर आणि एका मुलाचा अन्वनित अत्याचार करून वध केला.

- याच लोकांनी, ह.खब्बाब (रजि.) यांना वाळवंटातील तीव्र उन्हात आगिच्या निखा-यावर झोपवून, त्यांच्या छातिवर मोठा दगड ठेवला. निखा-यांच्या धगीमुळे, त्याच्या कंबरेतील चरबी वितळली आणि निखारे विझले. उर्वरित आयुष्यभर, त्यांच्या पाठीवर केवळ त्वचा आणि हाडे शिल्लक होती, मांस जळाले होते.

- मक्का शहरातील लोक, सामान्य जनतेने ईश्वराच्या संदेशानुसार जीवन व्यतित करावे, असे मुळीच इच्छित नव्हते. या लोकांनी एका महिला अनुयायीला उंटाच्या चामड्याच्या पिशवीमध्ये बंद केले आणि ही पिशवी वाळवंटात उन्हामध्ये फेकून दिली. त्या महिला तीन दिवस अन्न पाण्याविना पिशवीमध्ये तडफडत होत्या, शेवटी मृत्यूने त्यांची या भिषण अत्याचारामधून सुटका केली.

- अशा प्रकारे हजारोंना नरक यातना देण्यात आल्या. या अन्यायग्रस्तांविषयी परमेश्वराने पवित्र कुरआन मध्ये खालीलप्रमाणे म्हटले आहे.

- "आणि ज्या लोकांनी आपणांवर झालेल्या अत्याचाराचा बदला घेतला, तर अशा लोकांना दोषी ठरवता येणार नाही, दोषी तर ते आहेत, जे लोकांवर जुलूम करतात, पृथ्वीवर उपद्रव निर्माण करतात आणि अशा लोकांसाठी नरकामध्ये आत्यंतिक दुःखदायी यातना आहेत, आणि जे (अन्यायग्रस्त) सहन करतील आणि क्षमा करतील, निःसंशयपणे, हे अत्यंत साहसाचे काम आहे." (पवित्र कुरआन ४२:४१-४३)

पवित्र कुरआन मधील उपरोक्त आयत चा पुनःश्च अभ्यास करा, यामध्ये कोठेही, तुम्ही अन्यायाचा बदला घ्या असे म्हटलेले नाही. एखादयाने त्याच्यावर झालेल्या अन्यायाचा बदला घेतला, तर त्याला दोष दिला जाऊ शकत नाही, हे तर्कसंगत आहे. तथापि व्यक्तिगत पातळीवर क्षमा केल्यास, त्याने अत्यंत साहसी काम केले, अशा शब्दात क्षमाशील बनण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले आहे.

### २) <u>आत्मसंरक्षण :</u> (Self-Defence)

ह.मुहम्मद (स.अ.), मक्का सोडून मदीनेस गेल्यानंतर, मक्का शहरातील लोकांनी दोन वेळेस मदीना शहरावर हल्ला केला आणि तिस-या वेळेस १० हजार सैन्यानिशी मदीनेवर आक्रमण केले. मुस्लिमांची संख्या केवळ तीन हजार होती, एवढ्या मोठ्या फौजेचा समोरासमोर मुकाबला करणे शक्य नसल्यामुळे त्यांनी मदीना शहराच्या सिमेवर खंदक खोदून स्वतःचा बचाव केला. हे आक्रमण ज्या कबिल्यांनी एकत्र येऊन केले होते, त्यांना एक एक करून पराभूत केले नसते तर, मदीना शहरावर पूर्वीपेक्षा मोठ्या आक्रमणाची भीती होती, यास्तव परमेश्वराने मुस्लिमांना स्वतःच्या आत्मसंरक्षणासाठी लढण्याचा आदेश खालीलप्रमाणे दिला.

- "हे एका परमेश्वराचे भक्ती करणारे लोकहो, ईश्वराच्या त्या शत्रूंशी लढा जे तुमच्या सभोवताली आहेत आणि तुमचा कणखर बाणा, त्यांनी पाहणे अपेक्षित आहे आणि परमेश्वर आज्ञा मानणा-यांसोबत सदोदित आहे, यावर ठाम विश्वास ठेवा." (पवित्र कुरआन ९-१२३)

- मुस्लिम समाजास कणखर समजण्यात यावे आणि त्यांना यातना देण्याचे धारिष्ट्य, शत्रूने दाखवू नये यासाठी परमेश्वराने शत्रूसोबत लढण्याचा आदेश या आयत मध्ये दिला आहे. स्वतःचे संरक्षण करण्याचा हा एक अनुभवसिध्द मार्ग आहे. मुस्लिमेतरावर सर्वसमावेशक हल्ला करण्याचा हा मुळीच

परवाना नाही, यासोबतच खालील आदेश देण्यात आलेले आहेत.

- "ज्या मुस्लिमेतरांनी तुमच्यासोबत संधी केली, यानंतर संधीशी त्यांनी प्रतारणा केली नाही आणि तुमच्या विरूध्द कोणाचीही सहाय्यता केली नाही, तर तुम्ही त्या संधीचे पूर्णपणे पालन करा. निःसंशयपणे परमेश्वर त्याची आज्ञा मानणा-यांसोबत प्रेमाने वागतो". (पवित्र कुरआन ९:४)

- "आणि जर एखादा मुस्लिमेतर, तुमच्याकडून शरण मिळण्याची अपेक्षा करत असेल, तर त्याला शरण द्या आणि सुरक्षित ठिकाणी पोहचवा. हे यासाठी की, काही लोक असे आहेत ज्यांना ज्ञान नाही". (पवित्र कुरआन ९:६)

  आणि तुम्ही अल्लाहच्या मार्गात त्या लोकांशी लढा जे तुमच्याशी लढतात परंतु अतिरेक करू नका. अल्लाहला अतिरेक करणारे आवडत नाहीत. (पवित्र कुरआन २:१९०)

- ह.मुहम्मद (स.अ.) यांनी आपल्या अनुयायांना सक्त हुकूम दिला, "जो शस्त्र उचलणार नाही अशा व्यक्तीस, वृध्दांना, स्त्रीयांना आणि मुलांना इजा पोहचवू नका. वृक्षांना तोडू नका, कशालाही जाळू नका". (इब्ने कखीर)

### ३) समाजामध्ये कायदा आणि सुव्यवस्था कायम ठेवणे : (Enforcing Law and order in society)

- देशात जर कोणत्याही भागात दंगल उसळली तर पोलिस सर्वप्रथम तेथे कर्फ्यु लागु करते आणि जेव्हा लोक कर्फ्युला दाद देत नाहीत आणि दंगल चालू ठेवतात, तेव्हा सरकारी यंत्रणा पोलिसांना निर्देश देते कि, दंगेखोरांना पाहता क्षणी गोळी घाला. कोणावरही कोणताच खटला जाहिर न करता गोळ्या घालणे किती भयानक कायदा आहे. परंतु समाजात शांती प्रस्थापित करणासाठी हे अतिआवश्यक आहे. म्हणून विश्वातील सर्वच देशात हा कायदा आहे.

- अरब जगतामध्ये काही कबिले अत्यंत क्रूर (Barbarian) होते, जे कोणत्याही धर्माचे अथवा शांतीसमझोत्याचे पालन करत नसत. हे कबिले सतत मुस्लिम समुदायास ठार मारण्याच्या प्रयत्नात गर्क असत.

  अजल वकारा नामक अशाच प्रकारच्या कबिल्याने एक शिष्टमंडळ ह.मुहम्मद (स.अ.) यांच्याकडे मदीना येथे पाठवले, आम्ही इस्लामचा स्वीकार केला आहे यास्तव इस्लामची शिकवण देण्यासाठी मुस्लिमांचे एक पथक पाठविण्याचे निवेदन दिले. निवेदनावर विश्वास ठेऊन ह.मुहम्मद (स.अ.) यांनी १० मुस्लिमांचे एक पथक त्यांच्यासोबत रवाना केले. राजीया नामक स्थळी, या कबिल्याच्या लोकांनी पथकातील ८ मुस्लिमांना ठार केले आणि दोघांना, मक्कावासियांना विकून टाकले.

  याच पध्दतीचा अवलंब करून, अबू बरा आमिर याने नजद नावाच्या प्रदेशामध्ये इस्लामची शिकवण देण्यासाठी ७० मुस्लिमांचे पथक सोबत नेले. माऊना येथील मुक्कामावर, रिगल आणि जाकूवान, या दोन कबिल्यांच्या साहाय्याने ६९ मुस्लिमांचे शिरकाण करण्यात आले, केवळ १ व्यक्ती कशीबशी परतली.

  यास्तव, ज्यांचा कोणताही धर्म नव्हता, ना कर्मावर विश्वास होता, जे पशुपेक्षाही हीन होते, अशा लोकांना तोंड देण्यासाठी परमेश्वराने खालील आदेश दिले आहेत.

- "तुम्ही अशा लोकांशी लढणार नाही काय ज्यांनी स्वतःच्या प्रतिज्ञेचा भंग केला, ज्यांनी प्रेषितांना देशाबाहेर घालवून देण्याचा निश्चय केला होता आणि ज्यांनी स्वतः अत्याचारास सुरूवात केली? तुम्ही त्यांना घाबरता का?

आणि तुम्ही ईश्वराची आज्ञा पाळणारे असाल तर तुम्ही फक्त परमेश्वरास घाबरावे, कारण तोच यासाठी पात्र आहे." (पवित्र कुरआन ९ : १३)

**मग जेव्हा निषिद्ध महिने लोटतील तेव्हा त्या अनेकेश्वरवादींना ठार करा, जेथे सापडतील तेथे त्यांची नाकेबंदी करा व प्रत्येक पातळीवर त्यांचा समाचार घेण्यासाठी सज्ज रहा. मग जर त्यांनी पश्चात्ताप केला व नमाज कायम केली आणि जकात दिली तर त्यांना सोडून द्या. अल्लाह क्षमाशील आणि दया दाखविणारा आहे.** (पवित्र कुरआन ९ : ५)

उपरोक्त संदेशामध्ये, मुस्लिमेतरांना सदानकदा मारण्याचा आदेश दिलेला नाही तर जोपर्यंत शत्रू आक्रमक बनत नाही, तोपर्यंत त्याच्याशी मुकाबला न करण्याचा आदेश दिलेला आहे. तसेच त्यांच्यात सुधारणा झाल्यास, त्यांच्यासोबत शांततेने राहण्याचा आदेश देण्यात आला आहे.

### ४) लोकहित : (For freedom of Human being)

परमेश्वराने मानवजातीच्या हितासाठीसुध्दा युध्दास परवानगी दिली आहे. यामुळे एका परमेश्वराची उपासना करणा-यांची, जुलमी सत्ताधिशांच्या गुलामगिरीतून मुक्त होऊन, कोणत्याही अडथळ्याविना परमेश्वराची आराधना, शांततामय आयुष्य आणि सन्मानाचे जीवन जगू शकतील. यासाठी परमेश्वराचा आदेश खालीलप्रमाणे आहे.

**''मग काय कारण आहे की तुम्ही अल्लाहच्या मार्गात त्या असहाय पुरुष स्त्रियां आणि मुलांकरिता लढू नये ज्यांचे दुर्बल असल्यामुळे दमन केले गेले आहे आणि धावा करीत आहेत की, हे पालनकर्त्या! आम्हाला या वस्तीतून बाहेर काढ ज्याचे रहिवाशी अत्याचारी आहेत, आणि तुझ्याकडून आमचा एखादा वाली व सहायक निर्माण कर.''** (पवित्र कुरआन ४ : ७६)

उपरोक्त प्रकारचे जे संदेश कुरआन शरीफ मध्ये आहेत, त्यांचे काही सकारात्मक उद्देश आहेत. इस्लामने कदापिही निर्दोष व्यक्तीची हत्या करण्याचा आदेश दिलेला नाही, तर त्याचे सर्वप्रकारे रक्षण करण्याचेच आदेश दिलेले आहेत.

- प्रथम विश्वयुध्दात दोन कोटी लोक मरण पावले तर दुस-या महायुध्दात ६ कोटी लोक ठार झाले. सन २००० मध्ये अमेरिकेने इराकवर केलेल्या हल्ल्यात २० लाख जनता मृत्यूमुखी पडली. महाराष्ट्रात दरवर्षी जवळपास १५०० शेतकरी आत्महत्या करतात तर मुंबईमध्ये ४५० लोक रेल्वे अपघाताचे बळी ठरतात.

ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या आयुष्यामध्ये झालेल्या युध्दात १०१८ लोक मारले गेले आणि यातील अर्धी संख्या मुस्लिमांची आहे. यापेक्षा अधिक शेतकरी दरवर्षी महाराष्ट्रामध्ये आत्महत्या करतात.

अशा परिस्थितीत ह.मुहम्मद (स.अ.) यांनी ज्या लढाया लढल्या त्यांना संहारक युध्दे म्हणता येऊ शकेल काय.

- ह.मुहम्मद (स.अ.) वयाच्या ४० व्या वर्षी प्रेषित बनले आणि पुढील १५ वर्षे स्वतः प्रेषितांना तसेच मुस्लिमांना अत्याचाराविरूध्द हत्यार उचलण्याचा अथवा प्रतिकार करण्याचा मुळीच आदेश नव्हता. प्रेषितांच्या उर्वरित आयुष्यात म्हणजे पुढील ८ वर्षात मुस्लिमांना आत्मरक्षणासाठी हत्यार उचलण्याची परवानगी मिळाली नसती तर या भुतलावर एकाच परमेश्वराची उपासना करणारा एकही व्यक्ती जिवंत राहिली नसती, तसेच ज्या धर्माची शिकवण आदम (अ.स.), इब्राहिम (अ.स.), मूसा (अ.स.) आणि अन्य अनेक प्रेषितांनी मानवजातीस

दिली आहे, ती शिकवण त्याच वेळी नष्ट झाली असती.

**श्रीकृष्ण यांचा आदेश**

- कर्ण हा एक महान योध्दा आणि अर्जुनाचा ज्येष्ठ बंधू होता. कर्णाची दानशूरता सुप्रसिध्द आहे, तसेच तो एक सज्जन आणि पापभिरू मनुष्य होता. कर्णाला श्रीकृष्णाप्रती नितांत आदर होता. दुर्योधन सर्वथा चुकीच्या मार्गावर असतानाही कर्णाने त्याला समर्थन दिले.

कर्ण-अर्जुनाच्या युध्दात, जमिनीमध्ये रूतलेल्या रथाचे चाक बाहेर काढण्याच्या प्रयत्नात असणा-या कर्णावर बाण सोडून त्याचा वध करण्याचा आदेश श्रीकृष्णाने अर्जुनास दिला. कर्णाने अर्जुनास धर्माप्रमाणे वागण्याचे आवाहन केल्यामुळे संभ्रमित झालेल्या अर्जुनास कृष्णाने विचारले, धर्म आणि अधर्म यांचा निर्णय कोण करणार? हा निर्णय ते करू शकत नाहीत, जे स्वतः अधर्माने वागतात, तर तेच करतील, जे स्वतः धर्माचरण करतात आणि सत्यासाठी जगतात. युध्दामध्ये शत्रूची हत्या करणे हेच उचित आहे आणि तू तेच कर. क्षत्रियाचे सर्वात मोठे कर्तव्य सत्यधर्माच्या स्थापनेस मदत करणे आहे. याचा विचार करून तुझ्या कर्तव्यात कसूर करू नकोस. (Geeta Chp.2/ Verses 31)

अर्जुनाने या उपदेशानुसार निशस्त्र मोठ्या भावाचा कर्णाचा वध केला.

'सत्यधर्माची स्थापना करण्यासाठी युध्द करा' असा संदेश बहुतांश धर्मात आहे आणि हा आतंकवादी विचार नाही.

आतंकवाद अन्य कारणामुळे निर्माण होतो आणि फोफावतो. या युगामध्ये आतंकवादाचा सर्वप्रथम उगम स्कॉटलंडमध्ये झाला. स्कॉटीश जनतेची धारणा बनली होती की, इग्लंडचे वर्तन अत्यंत अन्यायी आहे. यानंतर आतंकवादाची लागण पॅलेस्टाईनमध्ये झाली. कारण तेथील जनतेची ठाम धारणा होती की, अमेरिका, इंग्लंड आणि ईस्त्राईल हे देश पराकोटीचा अन्याय करत आहेत. यानंतर श्रीलंकेचा क्रम येतो. तेथील तामिळ जनतेस, श्रीलंकेची वागणूक अन्यायपूर्ण वाटत होती.

- समाजातील प्रत्येक घटकास न्यायपूर्ण वागणूक हा एकच उपाय आतंकवाद नष्ट करण्याचा आहे. स्कॉटलंड मध्ये ख्रिश्चनांना, पॅलेस्टाईन मध्ये मुस्लिमांना अथवा श्रीलंकेमध्ये तमिळ हिंदूंना, त्यांच्या धर्माने आतंकवादाची शिकवण दिलेली नव्हती, धर्म आतंकवाद शिकवत नाही. आतंकवादाची उत्पत्ती, भ्रष्ट राजकारण्यांच्या सत्तापिपासू धोरणामुळे झाली आहे.

**काफीर कोणाला म्हणतात?**

काफीर या शब्दाचा अर्थ न मानणारा अथवा नाकारणारा असा आहे. काफीर कोणतीही व्यक्ती असू शकते, उदाहरणार्थ ह.मुहम्मद (स.अ.) यांनी म्हटले आहे, "माझ्यानंतर कोणीही प्रेषित येणार नाही, मी अंतिम प्रेषित आहे." ह.मुहम्मद (स.अ.) यांच्यानंतर आता सुध्दा प्रेषित अवतीर्ण होऊ शकतो असे मुस्लिम समुदायाने म्हटले, तर तो समुदाय सुध्दा काफीर ठरतो. पाकिस्तानातील काही लोक कादयानीला पैगंबर मानतात ते लोक स्वतःला मुस्लिम समजतात परंतु विश्वातील सर्व मुस्लिम त्यांना काफीर मानतात.

**मुशरीक कोणाला म्हणतात**

परमेश्वरासोबतच इतराला किंवा इतरांना, पूजनीय आणि शक्तिशाली समजणा-या व्यक्तीस मुशरीक म्हणतात, अशी व्यक्ती मुस्लिम समुदायातील सुध्दा असू शकते.

परमेश्वर माझे गा-हाणे ऐकतोच, सोबत प्रेषित, संत, बाबा हे देखील माझे गा-हाणे ऐकून माझी मनोकामना पूर्ण करतात, असे मानणारा मुस्लिम देखील मुशरीक असतो.

पवित्र कुरआन मध्ये ज्यांना काफीर व मुशरीक असे संबोधण्यात आले आहेत, ते हिंदू, ख्रिश्चन अथवा ज्यु नसून, अशी प्रत्येक व्यक्ती आहे, जी परमेश्वरासोबत इतरांची गणना करते. धार्मिकदृष्ट्या असे कृत्य निषिध्द आहे आणि परमेश्वराने यास प्रतिबंध केला आहे.

ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या निधनानंतर ह.अबू बकर (रजि.) आणि उमर (रजि.) यांनी हजारो मुस्लिमांबरोबर युध्द केले जे काफीर अथवा मुशरीक बनले होते.

यास्तव कोणत्याही समुदायाने काफीर आणि मुशरीक हे दोन शब्द म्हणजे त्यांना वापरलेला अपशब्द आहे, असा गैरसमज कृपया करून घेऊ नये.

*********

## प्रकरण-१२

# ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या १२ पत्नी का होत्या?

- आता आपण ह.मुहम्मद (स.अ.) यांच्यावर करण्यात येणा-या दुस-या आरोपाविषयी चर्चा करु, जो त्यांच्या वैवाहिक आयुष्याशी संबधीत आहे.

  ह.मुहम्मद (स.अ.) यांनी बारा विवाह का केले?

- बहुपत्नीत्वाची प्रथा प्रत्येक धर्मात प्रचलीत आहे. सध्या लागु असणारा एक पत्नीत्वाचा कायदा हा कोणत्याही धर्माशी संबधीत नसून राजकारण्यांनी केलेला कायदा आहे.

- हिंदू धर्म ग्रंथानुसार श्री. कृष्ण यांना १६,००० पेक्षा जास्त पत्नी होत्या.

  ह. सुलैमान (अ.स.) यांना ९९ पत्नी होत्या.

  राजा दशरथ यांना ४ पत्नी होत्या.

  अगणित प्रेषित आणि असंख्य राजे महाराजे असे आहेत ज्यांच्या एका पेक्षा अधिक पत्नी होत्या.

- ह. मुहम्मद (स.अ.) यांच्या १२ पत्नी असणार हे त्यांचे भाग्य होते आणि या संदर्भातील भविष्यवाणी ४००० वर्षापूर्वीच अथर्ववेदात करण्यात आली होती. सदर श्लोक खालील प्रमाणे,

  **उष्टा यस्य प्रवाहिणी वधुमन्तों व्दिर्दश।वर्ष्मा रथस्य नि जिहीडते दिव ईषमान उपस्पृशः।**(अथर्ववेद, कुन्ताप सूक्तः २०-२)

  भावार्थ :- ज्यांचे वाहन दोन सुंदर उंट आहेत अथवा जे आपल्या १२ पत्नीसोबत उंटावर स्वार होतात, त्यांचा आदर खुप मोठा आणि महानता अवर्णनीय आहे, जी आपल्या तेजाने आकाशास स्पर्शून धरतीवर येते. (भाषांतर :- डॉ. एम.ए. श्रीवास्तव हजरत मुहम्मद और भारतीय धर्मग्रंथ पेज नं.१५ )

- काही लोकांच्या मनात प्रेषितांच्या एकापेक्षा जास्त विवाहामागे केवळ वैषयिक वासना होत्या असा समज असेल तर तो अत्यंत चुकीचा आहे. कारण अशा व्यक्तीच्या वर्तनामध्ये बालपणापासूनच कामांधता दिसून येते, जी प्रेषितांच्या संपूर्ण आयुष्यामध्ये कोठेही दिसून येत नाही.

  आजघडीला ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या चरित्राचा अभ्यास मुस्लिमेतरांनी अधिक प्रमाणात केला आहे. मुस्लिम वाचक सहसा मुस्लिम लेखकांच्या पुस्तकाचेच वाचन करतात आणि कोणताही मुस्लिम लेखक प्रेषितांविषयी गैर लिहणे सर्वथा अशक्य आहे. पापभिरु ख्रिश्चन अथवा ज्यु लेखक सत्य उध्दृत करेल तर जातीयवादी लेखकाचा प्रयत्न विषारी प्रचार करुन प्रतिमा मलिन करणे एवढाच असेल.

  आजतागायत कोणत्याही लेखकाने, भले तो कोणत्याही धर्माचा असो वा मुस्लिमद्वेष्टा असो, ह.मुहम्मद (स.अ.) प्रेषित बनण्याआधीच्या आयुष्यातील दुर्वतनाचे किंवा विषयासक्त आचरणाचे एकही उदाहरण जगापुढे ठेवू शकले नाहीत. ह.मुहम्मद (स.अ.) यांचे आचरण सदाचारी नव्हते तर त्यांच्या अनैतिक वर्तनाचे एक उदाहरण देखील इतिहासामध्ये नमूद का नाही?

- ह.मुहम्मद (स.अ.) यांना वयाच्या ४० व्या वर्षी परमेश्वराने प्रेषित बनवले, तोपर्यंत ह.मुहम्मद (स.अ.) समाजामध्ये एका सामान्य व्यक्तीच्या रुपातच वावरत होते.या कालावधीमध्ये ह.मुहम्मद (स.अ.) यांना 'मुहम्मद' असे न संबोधता, 'सादिक' (खरा) आणि 'अमिन' (जो कधीही धोका देत नाही) या विशेषणानी संबोधण्यात येत असे.

- वयाच्या २५ व्या वर्षी, ह.मुहम्मद (स.अ.) यांचा विवाह ह.खदीजा (रजि.) यांच्यासोबत झाला आणि पुढील २५ वर्षे या दाम्पत्याने अत्यंत समाधानी संसार केला, परमेश्वर कृपेने या विवाहातुन प्रेषितांना २ मुलगे आणि ४ मुली अशी अपत्ये झाली. (२ मुलांचा मृत्यू अल्पावधीतच झाला.)

- ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या वयाच्या ५० व्या वर्षी ह.खदिजा (रजि.) यांचे निधन झाले,या घटनेनंतर बराच कालावधी आपण दुसरा विवाह न करता व्यतीत केला. या घडीला प्रेषितांच्या ज्येष्ठ कन्येचा (हजरत जैनब (रजि.)) विवाह झाला होता आणि त्या त्यांच्या पतीगृही होत्या. ह.मुहम्मद (स.अ.) यांचे मानसपुत्र, ह.जैद (रजि.) हे देखील विवाहित होते आणि वेगळे रहात होते. ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या ३ किशोरवयीन मुलींचा सांभाळ करण्यास कोणतीही जबाबदार व्यक्ती घरी नव्हती, यातच भर म्हणुन संपूर्ण मक्का शहर प्रेषितांचे वैरी होते. या पार्श्वभुमीवर प्रेषितांच्या सहका-यांनी त्यांना दुसरा विवाह करण्याचा आग्रह केला असता आपण ६५ वर्षे वयाच्या, स्थुल प्रकृतीच्या ह.सौदा (रजि.) यांच्याशी विवाह केला आणि ४ वर्षे त्यांच्यासोबत सुखदरित्या घालविली. या ४ वर्षामध्ये प्रेषितांनी दुसरा विवाह केला नाही.

ह.मुहम्मद (स.अ.) यांच्यावर आरोप करणा-यांना मी विचारु इच्छितो, जर प्रेषितांचे आचरण विषयासक्त होते तर त्यांनी प्रथम पत्नीचे निधन होताच लगोलग दुसरा विवाह का केला नाही? प्रेषितांचा दुसरा विवाह सुध्दा एका वृध्द विधवेशी झाला, त्यांच्यासोबत आयुष्यातील ४ वर्षे का व्यतीत केली?

- प्रेषितांची स्वप्ने परमेश्वराचे आदेश असतात. आपणांस माहित आहेच, ह.इब्राहिम (अ.स.) यांनी स्वप्न पाहून आपल्या पुत्राची कुर्बानी (बळी) द्यायचा प्रयत्न केला होता ज्याचे वर्णन अथर्ववेदामध्ये देण्यात आले आहे. याचप्रमाणे, परमेश्वराने ह.मुहम्मद (स.अ.) यांना स्वप्नामध्ये रेशमी वस्त्रे परिधान केलेल्या वधुच्या रुपात ह.आएशा (रजि.) यांना दाखवले, हा परमेश्वराचा आदेश होता, तो का देण्यात आला याचा परामार्ष आपण पुढे घेऊ.

जेव्हा ह.आएशा (रजि.) यांचे स्थळ ह.मुहम्मद (स.अ.) यांना सुचविण्यात आले तेव्हा त्यांनी नकार दिला नाही. (प्रेषितांनी स्वतः लग्नाचा प्रस्ताव पाठविला नव्हता.)

- ह.मुहम्मद (स.अ.) यांचा विवाह ह.आएशा (रजि.) यांच्यासोबत झाला तेव्हा ह.आएशा (रजि.) जाणत्या होत्या. लग्नानंतर ह.आएशा (रजि.) यांची ताबडतोब पाठवणी न होता त्या पुढील ३ वर्षे आपल्या माहेरीच वास्तव्यास होत्या.

माझा प्रश्न आहे, जर प्रेषित अत्यंत विषयासक्त होते तर त्यांनी आपल्या तरुण पत्नीस ३ वर्षे माहेरी का ठेवले? विवाहानंतर तत्काळ ते घरी घेऊन आले असते कारण घरी जी त्यांची पत्नी होती ती वयस्कर, स्थूल आणि उंच होती.

याचे कारण काय आहे.

- ह.आएशा (रजि.) यांच्याशी झालेल्या विवाहानंतर ह.मुहम्मद (स.अ.) यांनी अत्यंत रास्त कारणामुळे आणखी ९ विवाह केले. केवळ वासनेपोटी हे विवाह करण्याते आले असतील तर प्रेषितांना विपूल प्रमाणात अपत्यप्राप्ती का झाली नाही? ह.खदीजा (रजि.) यांच्या विवाहबंधनातुन प्रेषितांना ६ अपत्ये झाली. ह.आएशा (रजि.) यांच्या व्यतिरिक्त प्रेषितांच्या इतर कोणत्याही पत्नी कुमारिका नव्हत्या तसेच बहुतेकांना पुर्वीच्या विवाहामधुन अपत्ये होती. याचाच अर्थ, प्रेषितामध्ये वा त्यांच्या पत्नींमध्ये कोणतेही शारीरिक दौर्बल्य नव्हते. या पार्श्वभुमीवर

केवळ ह.मारिया (रजि.) यांच्यापासून झालेल्या एका पुत्रा व्यतिरिक्त आपणांस कोणतेही अपत्य नव्हते. ह.मुहम्मद (स.अ.) यांचे पुत्र दगावले तथापि कन्या जिवीत होत्या, असे असताना प्रेषितांना मोठ्या प्रमाणावर अपत्ये का झाली नाहीत?

- आपण माझ्या एकाही प्रश्नाचे उत्तर उदाहरणासह देऊ शकत नाही. ह.मुहम्मद (स.अ.) यांच्यावर करण्यात येणारे सर्व आरोप निराधार आणि निखलास खोटे आहेत. हे आरोप सलमान रश्दी सारख्या चारित्र्यहीन, कामांध आणि धर्मद्वेष्ट्यां लेखकांचे आहेत.

- ह.मुहम्मद (स.अ.) यांच्यावर असाही आरोप करण्यात येतो, लग्नासमयी ह.आएशा (रजि.) यांचे वय ६ वर्षे होते. हा आरोप देखील निराधार आणि असत्य आहे.

ह.आएशा (रजि.) यांचे जेव्हा लग्न झाले तेव्हा त्या 'इल्मे निसाब' या विषयाच्या तज्ञ होत्या, तसेच उच्च कोटीच्या कवयित्री देखील होत्या. 'इल्मे निसाब' हा विषय मानववंश आणि पुर्वजांशी संबंधीत असून यामध्ये हजारो वंशाची वंशावळ मुखोद्‌गत असणे आवश्यक आहे.

६ वर्षाच्या मुलीमध्ये 'इल्मे निसाब' या विषयावर प्रभुत्व आणि उच्च कोटीची साहित्य निर्मिती क्षमता असणे केवळ अशक्य आहे. ह.मुहम्मद (स.अ.) यांनी 'इल्मे निसाब' हा विषय कोणासही शिकवला नाही,तर मग प्रश्न निर्माण होतो,या विषयाचे सखोल ज्ञान ह.आएशा (रजि.) यांना कसे लाभले?

ह.आएशा (रजि.) यांचे विवाहसमयी वय १६ वर्षे होते आणि १९ वर्षी त्यांची पाठवणी झाली. त्यांचे पिता ह.अबू बकर (रजि.) हे एक मोठे विद्वान होते ज्यांनी आपल्या कन्येस या विषयाचे ज्ञान दिले.

ह.आएशा (रजि.) यांच्या सख्या जेष्ठ भगिनी ह.आसमा (रजि.) या १० वर्षांनी मोठ्या होत्या. ह.आसमा (रजि.) यांचे निधन इस्लामी सन ७३ हिजरी मध्ये वयाच्या १०० वर्षी झाले. म्हणजेच ह.मुहम्मद (स.अ.) यांनी ७३ वर्षापूर्वी मक्केहून मदीनेस हिजरत केली होती त्यावेळेस ह.आसमा (रजि.) यांचे वय २७ वर्षे होते. ह.आएशा (रजि.) या ह.आसमा (रजि.) यांच्यापेक्षा १० वर्षांनी लहान होत्या म्हणजेच त्यावेळी ह.आएशा (रजि.) यांचे वय १७ वर्षे होते.

- मौलाना सय्यद सुलैमान नदवी यांनी पुस्तक (सीरते आएशा-पेज नं १५३) मध्ये लिहिले आहे की हजरत आएशा (रजि.) यांचे निधन इस्लामी वर्ष ६७ हिजरी मध्ये झाले. आणि त्या ४० वर्षापर्यंत विधवा होत्या. या आकडेवारीनुसार आम्हाला माहीत होते की आपले वय २७ वर्ष होते यावरून विवाहाप्रसंगी हजरत आएशा यांचे वय १६ वर्ष होते.

- जर आपण हजरत आएशा यांचे वय विवाहप्रसंगी १६ वर्ष मानले तरीही ते कमी आहे. हजरत मुहम्मद (स.) यांचे वय त्यावेळी ५० वर्ष होते तर त्यांनी एका १६ वर्षाच्या कन्येशी का विवाह केला?

- पहिला मुद्दा तर हा आहे की, हजरत मुहम्मद यांनी हा विवाहाचा प्रस्ताव स्वतःतर्फे मांडला नव्हता. लोकांनी हा प्रस्ताव त्यांच्यासमोर ठेवला होता. दुसरा मुद्दा हा आहे की तुम्ही जे स्वप्नात पाहिले की हजरत आएशा सोबत आपला विवाह ही एक ईश्वरी ईच्छा होती. जी तुम्ही टाळू शकला नाही.

- ईश्वराने एका १६ वर्षाच्या कन्येचा विवाह एका ५० वर्षाच्या पैगंबराकाशी विवाह करण्याचा आदेश का दिला?

- लहान मूल ३ वर्षाच्या वयात Jr. KG.

५ वर्षाच्या वयात इयत्ता पहिली मध्ये.

१५ वर्षाच्या वयात इयत्ता १० वी मध्ये.

१७ वर्षाच्या वयात बारावी मध्ये.

२१ वर्षाच्या वयात पदवीधर

२४ वर्षाच्या वयात उच्च पदवीधर

२७ वर्षाच्या वयात पी.एच. डी करतो.

पीएच. डी केल्यानंतर तो आयुष्यभर कोणत्याही विद्यालयात कौशल्याने विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करू शकतो.

- एखाद्या मुलाच्या शिक्षणास तिस-या वर्षी बालवाडीपासून सुरुवात झाल्यास, वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी तो पी.एचडी. पर्यंतचे शिक्षण पुर्ण करुन अत्यंत उत्कृष्ट प्रकारे ज्ञानदान करु शकतो.

- वयाच्या १५ ते २७ वर्षांच्या कालावधीमध्ये ज्ञानार्जन अत्यंत उत्तम प्रकारे होते तसेच या वयात आत्मसात करण्यात आलेले ज्ञान तल्लख लक्षात रहाते.

एखाद्याने वयाच्या ४५ व्या वर्षी अध्ययनास सुरुवात केली तर ज्ञान आत्मसात करणे कठीण आहे परंतु ही व्यक्ती चाळीस वर्षानंतर म्हणजेच वयाच्या ८५ व्या वर्षी ज्ञान दान करणे सर्वथा अशक्य आहे.

- याच कारणामुळे परमेश्वराने १६ वर्षांच्या ह.आएशा (रजि.) यांचा दाखला ज्ञानसागर ह.मुहम्मद (स.अ.) यांच्याकडे केला.

ह.आएशा (रजि.) यांनी वयाच्या सोळा वर्षापासून २७ वर्षापर्यंत, ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या संगतीत परिपूर्ण ज्ञान आत्मसात केले आणि ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या निधनानंतर पुढील ४० वर्षे ज्ञानदानाचे कार्य अविरतपणे केले. अशाप्रकारे ह.मुहम्मद (स.अ.) यांचे दैनंदिन आयुष्य, जे मानवजातीसाठी सर्वोत्तम नमुना आहे, ते आयुष्य प्रेषितांच्या निधनानंतर पुढील ४० वर्षे ह.आएशा (रजि.) यांच्या रुपात जनसामान्यांच्या डोळ्यापुढे होते.

ह.मुहम्मद (स.अ.) यांनी परमेश्वराचा संदेश, स्त्री पुरुष दोहोंसाठी आणला आहे. धर्माचरणात पावित्र्य एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. स्त्रीच्या काही नाजूक समस्या आहेत, ज्या केवळ एक स्त्रीच दुसरीस अवगत करुन निवारण करु शकते. ह.मुहम्मद (स.अ.) पुरुष होते आणि स्त्रियांच्या व्यक्तिगत समस्यांचे निराकरण करण्यासाठी एका स्त्रीची आवश्यकता होती जी हे सर्व ज्ञान आत्मसात करुन काटेकोरपणे समस्त स्त्री वर्गास देऊ शकेल. पत्नीद्वारे हे कार्य अत्यंत व्यवस्थितपणे होणे शक्य असल्यामुळे परमेश्वराने अशी पत्नी प्रदान केली जी दिर्घकाळ त्यांच्यासोबत राहून परिपूर्ण ज्ञान आत्मसात करु शकेल आणि त्याचा लाभ समस्त स्त्री जातीस होईल. आणि हेच कार्य परमेश्वराने ह.आएशा (रजि.) यांच्या मार्फत घेतले.

- इस्लामी पुस्तकामध्ये जेवढे ज्ञान एकत्रित करण्यात आले आहे त्यातील जवळपास ३० टक्के ज्ञान ह.आएशा (रजि.) यांच्या मार्फत प्राप्त झाले आहे.

याच कारणासाठी परमेश्वरानी ह.आएशा (रजि.) यांचा विवाह अल्प वयामध्ये ह.मुहम्मद (स.अ.) यांच्याशी केला.

- मौलाना मु.फारुख खान यांनी त्यांचे पुस्तक ह.आएशा (रजि.) की शादी और असल उमर या पुस्तकामध्ये लग्नासमयी ह.आएशा (रजि.) यांचे वय १६ वर्षांचे होते याचे सबळ पुरावे दिले आहेत.

(Ardaus Publication 1781, Hauz Suiwalan, New Delhi-110002)

- ह.मुहम्मद (स.अ.) यांच्यावर आणखी एक आरोप करण्यात येतो की, त्यांनी जेव्हा अचानकपणे ह.जैद (रजि.) यांच्या पत्नी ह.जैनब (रजि.) यांना पाहिले, प्रेषितांना त्या आवडल्यामुळे ह.जैद (रजि.) यांनी पत्नीस तलाक दिला आणि ह.मुहम्मद (स.अ.) यांनी ह.जैनब (रजि.) यांच्याशी विवाह केला.

इतर आरोपा प्रमाणे हा आरोप देखील बिनबुडाचा आणि खोटा आहे, याची कारणे खाली दिली आहेत.

- ह.जैनब (रजि.) या प्रेषितांच्या आतेबहीण होत्या आणि त्या प्रेषितांपेक्षा २० वर्षांनी लहान होत्या, त्यांचे पालनपोषण प्रेषितासमोरच झाले होते.

- ह.जैद (रजि.) हे प्रेषितांचे गुलाम होते आणि त्यांना बालपणापासून प्रेषितांनी सांभाळले होते. ह.जैद (रजि.) यांना स्वातंत्र्य प्रदान करुन प्रेषितांनी आपला मानसपुत्र बनविले होते. तारुण्यात पदार्पण करताच ह.जैद (रजि.) यांचा विवाह प्रेषितांनी ह.जैनब (रजि.) यांच्याशी करुन दिला, जर ह.जैनब (रजि.) या प्रेषितांना आवडत होत्या तर त्यांचा विवाह ह.जैद (रजि.) यांच्याशी न करता प्रेषितांनी स्वतः त्यांच्याशी विवाह केला असता.

- ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या सर्वोच्च खानदानामध्ये ह.जैनब (रजि.) जन्मल्या होत्या. त्याकाळी गुलामांचा सामाजिक स्तर अत्यंत निम्न होता. या पार्श्वभूमीवर ह.जैद (रजि.) आणि ह.जैनब (रजि.) यांच्यात कायमस्वरुपी तणाव होता ज्याची परिणीती ह.जैद (रजि.) यांनी ह.जैनब (रजि.) यांना तलाक देण्यात झाली.

- अरब जगतामध्ये मानसपुत्रास स्वतःच्या पुत्राप्रमाणे समजण्याची, त्याच्या वडिलाच्या जागी आपले नाव लावण्याची तसेच त्याला संपूर्ण वारसाहक्क देण्याची प्रथा होती.

- परमेश्वरास ही रुढी नापसंत आहे. मनुष्य आपल्या मर्जीप्रमाणे स्वतःच्या अपत्यांना वारसाहक्कापासून वंचीत करु शकत नाही तसेच इतरांच्या अपत्यास स्वतःचे मानून त्यास वारसा हक्क देऊ शकत नाही.

- विवाहासाठी इस्लामी कायद्याप्रमाणे जे औरस नाते आहेत ते देखील मानसपुत्र बनविल्यामुळे अनौरस ठरु शकत नाहीत.

- मानलेल्या नात्यांचे महत्त्व नाही हे समाजाच्या मनावर ठसविण्यासाठी परमेश्वराने ह.मुहम्मद (स.अ.) यांचा विवाह ह.जैनब (रजि.) यांच्याशी करविला, अन्यथा पुत्राच्या पत्नीसोबत पित्याचा विवाह निषिध्द आहे.

- ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या बारा विवाहापैकी केवळ ह.जैनब (रजि.) यांच्यासोबतचा विवाह भुतलावर न होता, स्वर्गात, ह.आदम (अ.स.) आणि ह.हव्वा (अ.स.) यांच्याप्रमाणे झाला आहे, जो परमेश्वराने स्वतः करवुन दिला आहे.

- हे पैगंबर (स.), स्मरण करा तो प्रसंग जेव्हा तुम्ही त्या माणसाला म्हणत होता ज्याच्यावर अल्लाहने आणि तुम्ही उपकार केले होते, ''आपल्या पत्नीला सोडू नको आणि अल्लाहचे भय बाळग.'' त्यावेळी तुम्ही आपल्या मनात ती गोष्ट लपवून ठेवली होती जिला अल्लाह उघड करू इच्छित होता, तुम्ही लोकांना भीत होता, वस्तुतः अल्लाह या गोष्टीचा जादा हक्कदार आहे की तुम्ही त्याच्या कोपाला भ्यावे. मग जेव्हा जैद (रजि.) ने तिचा उपभोग घेतला तेव्हा आम्ही तिचा (घटस्फोटित स्त्रीचा) तुमच्याशी विवाह केला, की जेणेकरून ईमानधारकांवर आपल्या मानलेल्या पुत्रांच्या पत्नींच्या मामल्यात कोणतीही अडचण राहू नये.

- (जेव्हा तुम्हाला माहीत झाले की, घटस्फोटानंतर अल्लाह तआला हजरत जैनब यांच्याशी तुमचा विवाह लावू इच्छित आहे तेव्हा तुम्हाला भीती वाटली की लोक काय म्हणतील आणि बदनामी होईल. तुमची इच्छा होती की घटस्फोट व्हावा आणि

अल्लाहची इच्छा होती की ही प्रथा तुमच्यापासून मोडीत निघावी आणि शेवटी तेच झाले जे अल्लाहने इच्छिले.)

- ह.जैनब (रजि.) यांना प्रेषितांनी अचानकपणे पाहिले हे देखील असत्य असून त्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

- परमेश्वराने पवित्र कुरआन मध्ये आदेश दिला आहे, "कोणाच्याही घरामध्ये परवानगीशिवाय आणि सलाम केल्याशिवाय प्रवेश करु नका". (२४:२६-२७)

- ह.मुहम्मद (स.अ.) यांचे उद्‌गार आहेत, "स्वतःच्या आईच्या कक्षात प्रवेश प्रथम बाहेरुन परवानगी घेऊनच करा". (अबू दाऊद, मुन्तखब अबवाब, Vol-1 Hadis No. 753)

- ह.मुहम्मद (स.अ.) यांनी नमूद केले आहे, "जेव्हा एखाद्याच्या घरी जायचे असेल तर, दाराच्या समोर उभे राहून सलाम करु नका किंवा प्रवेश करण्याची परवानगी मागू नका तर दाराच्या थोडे बाजूस उभे रहा. जेणेकरुन एखाद्या महिलेने दार उघडले तर तुमची दृष्टी तिच्यावर पडणार नाही." (इमाम मालिक, मुन्तखब अबवाब, Vol-1 Hadis No. 754)

- परमेश्वर त्याला नापसंत करतो जो दुस-यांना उपदेश करतो मात्र स्वतः त्यावर अंमल करत नाही. (पवित्र कुरआन-६१:३) म्हणूनच, ह.मुहम्मद (स.अ.) स्वतः आचरण प्रथम करत आणि नंतरच त्याचा उपदेश करत. सबब, ह.मुहम्मद (स.अ.) यांनी एखाद्या महिलेच्या घरात प्रवेश करुन अचानकपणे तिला पाहणे असंभव आहे. तसेच ह.जैनब (रजि.) यांना प्रेषित बालपणापासून पाहत होते, त्यामुळे अचानकपणे पाहण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. प्रेषितांनी स्वतः ह.जैनब (रजि.) यांचा विवाह ह.जैद (रजि.) यांच्याशी करु दिला होता आणि जर प्रेषितांची स्वतःच विवाह करण्याची इच्छा असती तर त्यांनी स्वतः त्यांच्याशी विवाह केला असता.

सबब, हा आरोप देखील शत्रूंद्वारे प्रेषितांना बदनाम करण्यासाठी लावण्यात आला आहे.

**प्रेषितांच्या विवाहाची काही कारणे -**

- ह.उम्मे सलिमा (रजि.) आणि त्यांचे पती मक्कावासियांच्या अन्वनित अत्याचारांना कंटाळून मदीनेस स्थलांतर करण्याचा निश्चय केला. मदीनेस मार्गस्थ झाल्यानंतर, ह.उम्मे सलमा (रजि.) यांच्या कबिल्याने त्यांची वाट अडवून स्थलांतरास मनाई केली तथापि त्यांच्या पतींना जाण्याची मुभा दिली. ह.उम्मे सलमा (रजि.) यांच्या पतीच्या कबिल्यास जेव्हा या घटनेची हकीकत कळाली, तेव्हा ह.उम्मे सलमा (रजि.) यांच्या लहान बाळावर त्याच्या पित्याचा जास्त हक्क आहे असे म्हणून ते बाळ स्वतःच्या कब्ज्यात घेतले.

ह.उम्मे सलमा (रजि.) यांना पतीस तसेच बाळास मुकावे लागले. ज्या ठिकाणी पतीपासून त्यांची ताटातूट झाली होती त्या ठिकाणी दररोज सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्या अश्रू ढाळत. हा प्रकार सुमारे वर्षभर चालू होता. त्यांच्या या करुण स्थितीवर दया येऊन एकदाचे त्यांना त्यांचे मूल देण्यात आले तसेच मदीनेस जाण्याची अनुमती देखील देण्यात आली.

ह.उम्मे सलमा (रजि.) एकट्या ४०० कि.मी.चा पायी प्रवास करुन मदीनेस पोहोचल्या आणि आपल्या पतीसोबत राहू लागल्या. या घटनेस वर्ष पूर्ण होण्याच्या आतच, ह.उम्मे सलमा (रजि.) यांच्या पतीचे निधन झाले आणि त्या पुनःश्च निराधार झाल्या. हा काळ मदीना शहरासाठी अत्यंत कसोटीचा होता कारण यासमयी शत्रूने

मदीना शहरास वेढा घातला होता. शहरातील व्यवहार ठप्प झाले होते, जिवनावश्यक वस्तूंचा तुटवडा झाल्यामुळे जनता अत्यंत हालाखीत जीवन जगत होती. अशा परिस्थितीत एका विधवेस आणि तिच्या लहान मुलास आधार मिळणे सर्वथा अशक्य होते.

ह.मुहम्मद (स.अ.) यांनी ह.उम्मे सलमा (रजि.) यांच्याशी विवाह न करता जर त्यांना आधार दिला असता तर, त्यांना आणखी एका आरोपाचे धनी व्हावे लागले असते. यामुळे ह.उम्मे सलमा (रजि.) यांना एक सन्माननीय जीवन देण्यासाठी प्रेषितांनी त्यांच्यासोबत विवाह केला.

- अबू सुफियान नामक मक्कानिवासी सरदाराच्या ह.उम्मे हबिबा (रजि.) या कन्या होत ज्यांनी पती समवेत इस्लामचा स्वीकार केला होता. अबु सुफियान मुस्लिमांचा कट्टर शत्रू होता, त्याच्या स्वतःच्या मुलीने इस्लामचा स्वीकार केल्यामुळे या दांम्पत्यावर त्याच्या नेतृत्वाखाली पराकोटीचा अत्याचार झाला. ह.उम्मे हबिबा (रजि.) व त्यांचे पती ह.उबेदुल्ला इब्ने जहश (रजि.) यांनी इथिओपिया देशामध्ये स्थलांतर केले. स्थलांतरानंतर काही दिवसातच ह.उम्मे हबिबा (रजि.) यांचे पतीचे इथिओपिया येथे निधन झाले, परक्या मुलखात मक्का शहराची राजकुमारी निराधार झाली. प्रेषितांनी त्यांच्याशी विवाह करुन त्यांना आधार दिलाच तसेच एक सर्वोत्तम सामाजिक स्थान दिले.

- ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या विवाहामागे ठोस उद्देश होते. या उद्देशांना आपण समजु शकू अथवा नाही कारण त्या काळी असणारी सामाजिक परिस्थिती, सुरक्षेची आवश्यकता आणि निराधारांची असहाय्यता यांचे सद्यःस्थितीत आम्हास आकलन होणे कठीण आहे.

या ठिकाणी केवळ एक गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे, प्रेषित आणि पापचारण हे दोन्ही एक साथ राहू शकत नाही. ह.मुहम्मद (स.अ.) हे एक सच्चे आणि महान प्रेषित होते आणि त्यांनी कोणतेही दुष्कृत्य केले नाही.

- जयपूरचे राजे मानसिंग यांनी राज्याच्या स्थैर्यासाठी बारा विवाह केले, पत्नींना एकत्र ठेवणे राज्य चालविण्यापेक्षा किती कठीण आहे याची जाणीव त्यांना झाली. कोणत्याही व्यक्तीस आपल्या दोन पत्नीमध्ये सौख्य, एकोपा ठेवणे आणि त्यांच्याशी समानतेने वागणे अत्यंत कठीण आहे. यामुळे वैवाहिक सौख्य न मिळताच मानसिक त्रासाचे बळीचे ठरावे लागते. या पार्श्वभूमीवर प्रेषितांनी जे विवाह केले त्यामागे उपरोक्त नमूद केलेली कारणे होती.

राजा मानसिंग यांची राजधानी जयपूर येथील आमेर किल्ल्यामध्ये (Amer Fort) त्यांच्या बारा राणींचे महाल आजदेखील सुस्थितीत आहेत, यांची आपण समक्ष पाहणी करु शकता.

*********

## प्रकरण-१३

# अग्नीचे रहस्य काय आहे?

अग्नीचे रहस्य जाणून घेण्यासाठी प्रथम आपण पवित्र वेदांमध्ये नमूद केलेल्या श्लोकांचा आणि नंतर पवित्र कुरआन मधील आयतचा अभ्यास करूयात.

**पवित्र वेदांतील श्लोक**

ऋग्वेदातील प्रथम श्लोकाचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

- संपूर्ण प्रशंसा आणि प्रार्थना अग्नीसाठी आहे. (ऋग्वेद १:१:१)
- हे अग्नी, आपण लोकांची मनोकामना पूर्ण करता. आपणच भक्तीयोग्य आहात. आपण विष्णू, ब्रम्हा आणि बृहस्पती आहात. (ऋग्वेद २:१:३)
- मित्र, वरूण, अग्नी, गुरू, वायू ही नावे एकाच शक्तीची आहेत. जाणकार परमेश्वरास त्याच्या वैशिष्ट्यानुसार वेगवेगळ्या नावाने संबोधतात. (ऋग्वेद १०:११४:५)

अग्नी हे ईश्वराचेच नाव आहे, हे उपरोक्त श्लोकाव्दारे स्पष्ट होते. आता आणखी काही श्लोकांचा अभ्यास करूयात.

- आम्ही अग्नीस दूत (म्हणून) नियुक्त केले आहे. (ऋग्वेद १:१२:१)
- अग्नी तो मानव आहे जो ईश्वराची भक्ती केल्यामुळे प्रसन्न होतो. (ऋग्वेद १:३१:१५)
- जाणकार अथवा बुध्दीजीवीच फक्त अग्नीस ओळखू शकतील. (ऋग्वेद १०:७१:३)
- ज्ञानाचे मंथन केल्यानेच अग्नीचे रहस्य कळेल आणि यावरच तुमची मुक्ती आधारलेली आहे. अग्नीस पथदर्शक मानूनच केवळ तुम्ही विश्वाचे धुरीण बनू शकाल. (ऋग्वेद १:३१:१५)
- अग्नीच्या रहस्याचा शोध वाळवंटात राहणारे घेतील. (ऋग्वेद ३:३:५)
- जेव्हा अंतिम मशाल (पवित्र कुरआन) प्रथम मशालीवर (पवित्र वेद) ठेवण्यात येईल, तेव्हाच अग्नीचे रहस्य कळेल. (ऋग्वेद ३:२९:३)

**पवित्र कुरआन मधील आयत**

- पवित्र कुरआन मधील पहिलीच आयत आहे,

  संपूर्ण प्रशंसा केवळ ईश्वराची आहे जो या पूर्ण विश्वाचा स्वामी आहे. (पवित्र कुरआन १:१)
- ह.ईसा (अ.स.) म्हणाले, "लोकहो! माझ्यानंतर अवतीर्ण होणा-या प्रेषिताची खुशखबर मी तुम्हास देतो ज्याचे नाव अहमद आहे". (पवित्र कुरआन ६१:६)
- हे मुहम्मद, लवकरच आम्ही आपणास महमुद ही पदवी प्रदान करणार आहोत. (पवित्र कुरआन १७:७९)
- प्रत्येक सजीवाची निर्मिती आम्ही पाण्यापासून केली आहे. (पवित्र कुरआन २१:३०)
- ह.मुहम्मद (स.अ.) यांनी म्हटले आहे, जर ह.मुसा (अ.स.) आज जीवित असते तर त्यांना देखील मला प्रेषित मानल्याशिवाय मुक्ती मिळाली नसती. (तिर्मिजी १४१:३, अहमद ३३८-४)

पवित्र कुरआन मधील उपरोक्त आयत

मध्ये परमेश्वराने एकाच महापुरूषास अहमद, मुहम्मद व महमुद या तीन नावांनी संबोधले आहे.

ह.मुहम्मद (स.अ.) यांचे धरतीवर आगमन होण्यापूर्वीचे नाव अहमद आहे, या धरतीवरचे नाव मुहम्मद आहे आणि या जीवनानंतर येणा-या परलोकीय जीवनात प्रेषितांना महमुद ही उपाधी बहाल करण्यात येणार आहे.

**आता आपण पुनःश्च हिंदू धर्मग्रंथांचा अभ्यास करूयात;**

- याच पुस्तकात आपण जाणून घेतले आहे, परमेश्वर आपल्या विशेषतः (Feature) असणा-या नावांनी प्रेषितांना देखील संबोधतो. रहीम आणि गफूर ही परमेश्वराची नावे आहेत आणि याच नावांनी परमेश्वराने पवित्र कुरआन मध्ये ह.मुहम्मद (स.अ.) यांना संबोधले आहे. ब्रम्हा जे ईश्वराचे नाव आहे, या नावाने भविष्यपुराणात ह.आदम (अ.स.) आणि अथर्ववेदामध्ये ह.इब्राहीम (अ.स.) यांना संबोधण्यात आले आहे.
- याचप्रमाणे, अग्नी देखील ईश्वराचे एक वैशिष्ट्य आहे आणि याच नावाने ऋग्वेदामध्ये एका प्रेषितास परमेश्वराने संबोधले आहे. हे प्रेषित कोण आहेत हे जाणून घेण्यासाठी पवित्र वेदांमधील काही श्लोकांचे अध्ययन करूयात.
- हे अग्नी, आम्ही तुमच्या तीन्ही रूपास जाणतो. तुमचे ठिकाण जेथे जेथे आहे ते स्थान देखील आम्ही जाणतो. आम्ही तुमच्या गुप्त नावास आणि जन्मस्थानास देखील जाणतो. आपण कोठून आलात हे देखील जाणतो. (ऋग्वेद १०:४५:२)
- विद्युत रूपात सर्वप्रथम अग्नी स्वर्गलोकात प्रगट झाले. दुस-या वेळेस ते मानवजातीमध्ये प्रकट झाले, तेव्हा त्यांना जातवेद (जन्मापासूनच ज्ञानसंपन्न) म्हणून संबोधण्यात आले, तिस-या वेळेस ते जलामध्ये प्रकट झाले. मानवजातीचा कल्याण करणारे नेहमीच सफल होतात. (ऋग्वेद १०:४५:१)
- ज्या अग्नीचे अनंत रूप कधीच नष्ट होत नाही त्याला आत्मा म्हणतात, जेव्हा ते शरीर धारण करते, तेव्हा असूर (सर्वात शेवटी येणारा) आणि नराशंस म्हणतात. आणि जेव्हा पूर्ण विश्व उज्वलीत करतात, तेव्हा मातरेशवा असतात आणि तेव्हा ते वायू प्रमाणे सर्वांना लाभ देणारे असतात. (ऋग्वेद ३:२९:११)

उपरोक्त श्लोकांचे विश्लेषण केल्यास महापुरूषांच्या चार अवस्थांचा आपणास बोध होतो.

१) प्रथम अवस्थेत ते विद्युत रूपामध्ये जन्म घेतात, तेव्हा त्यांचे नाव अग्नी असते.

२) त्यांची दुसरी अवस्था मनुष्याच्या आत्म्याच्या रूपामध्ये असते आणि त्यावेळी त्यांचे नाव जातवेद असते.

मनुष्य वास्तवामध्ये एक आत्मा आहे, तो पृथ्वीतलावर केवळ शरीर धारण करतो आणि देहांतानंतर परलोकाकडे प्रस्थान करतो. त्यामुळे जेव्हा एखाद्याचे निधन होते, तेव्हा त्याच्या शवास कोणीही तोच आहे असे म्हणत नाही, तर त्या व्यक्तीचे शव आहे असे म्हटले जाते. येथे मनुष्यरूपात येण्याचा अर्थ विद्युत रूपामधून मनुष्याच्या आत्म्याचे रूप धारण करणे असा आहे.

३) महापुरूषाचा तिसरा जन्म पाण्यामध्ये होतो तेव्हा त्याचे नाव असूर आणि नराशंस असते.

पाण्यामध्ये जन्म घेण्याचा अर्थ मानव शरीर धारण करणे असा आहे, कारण प्रत्येक सजीवास परमेश्वराने पाण्यापासून जन्मास घातले आहे. (पवित्र कुरआन २१:३०) प्रत्येक मनुष्याच्या शरीरात पाण्याचे प्रमाण जवळपास ६५ टक्के एवढे असते.

४) महापुरूषाचे चौथे रूप परलोकात प्रकट होणारे आहे आणि त्यावेळेस त्यांचे नाव मातरेशवा असणार आहे, जे सर्वांचे कल्याण करतील.

**आता आपण इस्लामी ग्रंथांचे अध्ययन करूयात**

- ह.अबू हुरैरा (रजि.) नमूद करतात, आम्ही ह.मुहम्मद (स.अ.) यांना विचारले, की आपण प्रेषित कधी बनलात? तेव्हा प्रेषित उत्तरले "मी त्यावेळी देखील पैगंबर होतो जेव्हा ह.आदम (अ.स.) आपल्या आत्मा आणि शरीराच्या अवस्थेच्या दरम्यान होते". (तिर्मिजी)

(अर्थात जेव्हा परमेश्वर, प्रथम मानवाची निर्मिती करत होता, तेव्हा देखील माझे अस्तित्व प्रेषितांच्या रूपात होते.)

- ह.मुहम्मद (स.अ.) म्हणाले, "परमेश्वराने प्रथम माझे तेज (नूर) निर्माण केले". (मरकतब दफ्तर भाग-३)

- पवित्र कुरआन मध्ये परमेश्वर नमूद करतो, "आम्ही ह.मुहम्मद (स.अ.) यांना **रहमतुल लिल आलमीन** या रूपामध्ये अवतीर्ण केले आहे". (पवित्र कुरआन २१:१०७)

**रहमतुल लिल आलमीन** याचा अर्थ अखंड विश्वासाठी परमेश्वराची कृपा, सर्वांचे कल्याण करणारा तसेच मुक्तीचे माध्यम बनणारा असा आहे.

- ह.मुहम्मद (स.अ.) यांनी नमूद केले आहे, प्रलयदिनी सूर्याच्या अतिप्रचंड उष्णतेने जेव्हा लोक कासावीस होतील, तेव्हा हे लोक प्रेषितांनी परमेश्वरास विनंती करून सर्वांना माफ करावे आणि या तीव्र उष्णतेपासून सुटका मिळवून द्यावी असा अनुरोध करतील, तेव्हा कोणतेही प्रेषित याचे धैर्य दाखवू शकणार नाहीत. यानंतर सर्व लोक माझ्याकडे येतील, तेव्हा मी परमेश्वरास सिजदा करेन आणि तोपर्यंत मी सिजदाच्या अवस्थेमध्येच राहिन जोपर्यंत परमेश्वर मला उठण्यास सांगणार नाही. परमेश्वर मला जेव्हा सिजदा मधून उठण्यास सांगेल तेव्हा मी परमेश्वराजवळ सर्वांना मुक्ती देण्याचा आग्रह करेन. यानंतर ज्यांनी शिर्क केले नाही अर्थात एका ईश्वराशिवाय दुस-या कोणाचीही उपासना ज्यांनी केली नाही अशा सर्वांना मुक्ती देण्याचे आश्वासन परमेश्वराकडून मिळेल. (अर्थात प्रलयदिनी ह.मुहम्मद (स.अ.) संपूर्ण मानवजातीच्या मुक्तीचे माध्यम बनतील.(बुखारी))

**आता आपण उपरोक्त कड्यांची शृंखला पूर्ण करू**

- अग्नीचा जन्म सर्वप्रथम विद्युत रूपात झाला, ह.मुहम्मद (स.अ.) यांचा जन्म नूर (तेज) प्रमाणे झाला आहे.

- अग्नीचा दुसरा जन्म मनुष्य आत्म्याप्रमाणे झाला, ज्याचे नाव जातवेद आहे. ह.मुहम्मद (स.अ.) यांचे प्रकटीकरण ह.आदम (अ.स.) यांच्या पूर्वी आत्म्याच्या रूपामध्ये झाले आणि नाव होते, अहमद.

- अग्नीचा तिसरा जन्म पाण्यामध्ये झाला, नाव होते, असूर अथवा नराशंस. परमेश्वराने मानवजातीस पाण्यापासून उत्पन्न केले, अर्थात शरीर निर्माण केले. ह.मुहम्मद (स.अ.) यांचे पृथ्वीतलावर मनुष्यरूपात आगमन झाले आणि नाव होते मुहम्मद.

- अग्नीच्या चौथ्या रूपाचे नाव असेल मातरेशवा, सर्वांचे कल्याण करणारा. ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या चौथ्या रूपातील नाव महमुद असेल, प्रलयदिनी आग्रह करून सर्वांना मुक्ती मिळवून देणारा.

- आपणास या दोहोमध्ये काही समानता दिसून येते काय?

- प्रयाग विश्वविद्यापीठाचे प्रकांडपंडित डॉ.वेदप्रकाश उपाध्याय यांनी वेदाभ्यास

करून वेदांनी ज्यांना नराशंस, कल्की अवतार आणि महान ऋषी म्हटले आहे, ते ह.मुहम्मद (स.अ.) होत असा निष्कर्ष काढला आहे. डॉ.वेदप्रकाश उपाध्याय यांचे पुस्तक 'नराशंस और अंतिम ऋषी' मध्ये याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली आहे. माझे पुस्तक 'पवित्र वेद और इस्लाम धर्म' यामध्ये देखील आपण याबाबत सविस्तर माहिती घेऊ शकता.

वेदामध्ये ज्यांना अग्नी असे संबोधण्यात आले आहे ते ह.मुहम्मद (स.अ.) आहेत.

- अंतिम मशालीस प्रथम मशालीसोबत अभ्यासले असता अग्नीची ओळख होऊ शकेल असे ऋग्वेदामध्ये नमूद करण्यात आले आहे, त्याप्रमाणे आज आपण दोहोंचा अभ्यास करून अग्नीचे रहस्य जाणून घेतले आहे.

- अग्नीस जाणून घेतल्याने आणि त्यांच्या निर्देशानुसार जीवन व्यतीत करण्यामुळेच आम्हास मुक्ती मिळेल आणि आम्ही विश्वाचे नेतृत्व करू शकू असे ऋग्वेदामध्ये नमूद करण्यात आले आहे.

तर चला, आपण आपल्या कल्याणाच्या आणि मुक्तीच्या दिशेने पहिले पाऊल उचलू.

- ऋग्वेदामध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे अग्नीस जाणून घेतल्याशिवाय आणि त्यांच्या आदेशाचे पालन केल्याशिवाय मुक्ती असंभव आहे, चला तर मग आपण ह.मुहम्मद (स.अ.) यांना अंतिम प्रेषित मानून त्यांच्या आदेशाचे पालन करू आणि या जीवनामध्ये तसेच मृत्यूपश्चात येणा-या जीवनामध्येसुध्दा सफलता प्राप्त करूयात.

**ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या आदेशाचे पालन कशा प्रकारे करण्यात यावे?**

- ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या आदेशाचे पालन करण्याची सुरूवात दोन कामाव्दारे करण्यात यावी.

१. परमेश्वराशिवाय कोणीही पूजनीय नाही अशी ठाम श्रध्दा आपण बाळगावी आणि परमेश्वराशिवाय कोणाचीही भक्ती करू नये.

२. आपले कर्म श्रेष्ठतम करण्याचा निरंतर प्रयत्न करण्यात यावा. श्रेष्ठतम कर्म करणे म्हणजे, पापमुक्त जीवन जगणे म्हणजेच हराम संपत्ती न कमावणे. कोणासही धोका देऊ नये. चोरी करू नये. अन्याय कधीच करू नये. नेहमीच सत्य वदावे. इतरांचे भले करण्यासाठी झटावे. सदासर्वदा स्वच्छ आणि पवित्र रहावे (मलमूत्राचा एक थेंबही आपल्या शरीरावर पडता कामा नये). आपल्या परिवारासोबत, मातापित्यासोबत सौहार्दपूर्ण व्यवहार करावा. 'कानुने तरक्की' या माझ्या पुस्तकामध्ये व्यापारउदीम कशाप्रकारे करावा याबाबत विवेचन करण्यात आले आहे. त्याचे अध्ययन करून आपला व्यवहार श्रेष्ठतम करण्यात यावा. ईश्वराचे स्तवन सदोदित करण्यात यावे. परमेश्वराची दोन मुख्य नावे आहेत, हादी आणि रहीम, वेळ मिळेल तेव्हा 'या हादी' आणि 'या रहीम' याचा जप करण्यात यावा.

या प्रकारचे बदल आपल्या जीवनात केल्यानंतर किमान एकदा पवित्र कुरआनचा अनुवाद अभ्यासावा, प्रेषिताच्या वचनांचा अभ्यास करावा. एखाद्या जाणकाराच्या संपर्कात राहून नमाज, रोजा, जकात, हज इत्यादी विषयी अधिक माहिती प्राप्त करावी आणि आपल्या जीवनात त्याचा समावेश करण्याचा प्रयत्न करावा.

*********

## हजरत मुहम्मद (स.) यांचे जीवन एका नजरेतून

| | |
|---|---|
| प्रेषितांचे पिता ह.अब्दुल्ला यांचे निधन | प्रेषितांच्या जन्माआधी सात महिने सन ५६९. |
| प्रेषितांचा जन्म | सन २०/२२ एप्रिल ५७०. |
| दाई हलिमा यांनी प्रेषितांना पालन पोषणासाठी खेड्यात नेले. | सन ५७०, यावेळी प्रेषितांचे वय अवघे चार महिने होते. |
| पुनःश्च आपल्या मातेकडे परतले. | सन ५७५, वय ५ वर्षे |
| प्रेषितांच्या मातेचे निधन | सन ५७६, वय ६ वर्षे. |
| प्रेषितांच्या आजोबांचे निधन | सन ५७८, वय ८ वर्षे |
| ह.खदिजा (रजि.) यांच्याशी विवाह | सन ५९५, वय २५ वर्षे |
| हिरा नामक गुहेमध्ये उपासनेस प्रारंभ | सन ६०७, वय ३७ वर्षे |
| ह.मुंहम्मद (स.अ.) प्रेषित बनले. | सन ६१०, वय ४० वर्षे |
| मित्र आणि नातेवाईकांमध्ये धर्मप्रचार | सन ६१० ते ६१३, वय ४१ वर्षे |
| प्रेषित बनल्याची खुली घोषणा | सन ६१४, वय ४४ वर्षे |
| मुस्लिमांचे इथिओपियामध्ये देशांतर | सन ६१५, वय ४५ वर्षे |
| ह.मुहम्मद (स.अ.) यांच्या कबिल्याचा बहिष्कार | सन ६१६ ते ६१९, वय ४७ वर्षे |
| ह.खदिजा (रजि.) आणि चुलते ह.अबु तालिब यांचे देहावसान. | सन ६१९, वय ५० वर्षे |
| ताएफ शहरास भेट | सन ६१९, वय ५० वर्षे |
| मेअराज ची घटना, पाच वेळेस नमाज पढणे अनिवार्य. | सन ६२०, वय ५० वर्षे |
| ह.आयेशा (रजि.) यांचेशी विवाह | सन ६२१, वय ५१ वर्षे |
| मदिना येथील ७५ व्यक्तींनी इस्लाम स्विकारला | सन ६२२, वय ५२ वर्षे |
| मक्काहून मदिनेस हिजरत | सन ६२२, वय ५२ वर्षे |
| मस्जिदे-नबवी च्या बांधकामास प्रारंभ | सन ६२२, वय ५२ वर्षे |
| येरूशलेम ऐवजी मक्केच्या दिशेने नमाज पढण्याचा आदेश प्राप्त. | सन ६२४, वय ५५ वर्षे |
| बदरचे पहिले युध्द | सन ६२४, वय ५५ वर्षे |
| ओहदचे दुसरे युध्द | सन ६२५, वय ५६ वर्षे |
| खंदकचे तिसरे युध्द | सन ६२७, वय ५८ वर्षे |
| हुदैबिया येथील शांतीसमझोता | सन ६२८, वय ५९ वर्षे |
| खैबरचे युध्द | सन ६२९, वय ६० वर्षे |
| मुअत्ता येथे रोमन सेनेबरोबर युध्द | सन ६२९, वय ६० वर्षे |
| मक्का शहर जिंकले. | सन ६३०, वय ६१ वर्षे |
| हुनैन येथील युध्द | सन ६३०, वय ६१ वर्षे |
| तबुकचा प्रवास | सन ६३१, वय ६२ वर्षे |
| अंतिम हज आणि अंतिम संदेश | सन ६३२, वय ६३ वर्षे |
| आजारपण आणि देहांत | सन ६३२, वय ६३ वर्षे |

**निम्नलिखित पुस्तकांचा संदर्भासाठी उपयोग सदर पुस्तक लिहिताना करण्यात आला आहे. आम्ही संबंधित लेखक आणि प्रकाशकांचे मनःपूर्वक आभारी आहोत.**

**१. पवित्र कुरआन**
(अनुवाद- फातेह मुहम्मद जालंधरी.)

**२. मारूफुल हदीस**
(मौलाना मुहम्मद मंजूर नौमानी.)

**३. अगर अब भी न जागे तो**
(मौलाना शम्स नवीद उस्मानी, सय्यद अब्दुल्ला तारिक जासिन बुक डेपो, उर्दू बाजार, जामा मस्जिद, दिल्ली.)

**४. हजरत मुहम्मद (स.अ.) और भारतीय धर्मग्रंथ**
डॉ.एम.ए.श्रीवास्तव,नॅशनल प्रिंटींग प्रेस, दर्यागंज, दिल्ली

**५. Hazrat Mohammed in World Scriptures-**
A.H.Vidyarthi, Adam Publishers & Distributors, Daryaganj, New Delhi-110002.

**६. पैगंबरे इस्लाम गैरमुस्लिमोंकी नजरमे**
मुहम्मद याहया खान, फरीद बुक डेपो, नई दिल्ली-११०००२

**७. सीरते अहमद मुज्तबा सल्लल्लाहु अलैहि वसल्लम**
शाह मिसबाहुद्दीन शकील, अल् रहमान प्रिंटर्स अँड पब्लीशर्स, १८, जकरिया स्ट्रीट, कोलकता-७०००७३

**८. The Quran & Modern Science**
Dr.Zakir Naik, Islamic Research Foundation, Mumbai-09

**९. सीरते नबी.**
अल्लामा शिबली नोमानी (रह.) सय्यद सुलैमान नदवी.

**१०. संत महात्मा, विचारवंत आणि इस्लाम.**
सोमनाथ देशकर, संदेश प्रकाशन, पुणे-५९